जरी देवाच्या वचनाची तुलना स्वादिष्ट वाटणाऱ्या मधूशी, रोजच्या भाकरीशी, ताजेतवाने करणाऱ्या वृष्टीशी आणि मार्ग दाखविणाऱ्या दिव्याशी करण्यात आलेली आहे, तरीही ते भूस जाळून टाकणाऱ्या अग्नीसारखे, खडकाचा भुगा करणाऱ्या हातोड्यासारखे आणि जीवन व आत्मा यांस भेदून आरपार जाणाऱ्या दुधारी तलवारीसारखे आहे. हातोडा, आग आणि तलवार म्हणून वचनाचा संयुक्त प्रभाव आमच्या जीवनाच्या त्या क्षेत्रांवर इच्छित शुद्धीकरणाचा परिणाम असला पाहिजे ज्यांस शुद्धीकरणाची गरज आहे!

आमच्या जीवनात अशा काही गोष्टी असू शकतात ज्या देवास आमच्यासोबत कार्य करण्याच्या मार्गात अडखळण आणतात. असे असेल तर त्या गोष्टींस तोंड द्यावे लागेल.

स्वार्थ, मत्सर, गर्व आणि वासना ह्या काही नकारात्मक गोष्टी आहेत ज्या आमच्यासोबत काम करण्यापासून देवास अडखळण आणतात. जेव्हा आम्ही देवाला मुळाशी कुऱ्हाड ठेवण्याची आणि आमच्या जीवनाच्या त्या क्षेत्रांत शुद्धीकरणाचे काम करण्याची संधी देऊ, तेव्हा आम्ही केवळ देवासाठीच नव्हे तर एकमेकांसाठी सुद्धा उत्तम लोक ठरू.

आशीष रायचूर

**All Peoples Church & World Outreach**
# 319, 2nd Floor, 7th Main, HRBR Layout,
2nd Block, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA

Phone: +91-80-25452617, +91-80-65970617
Email: contact@apcwo.org
Website: www.apcwo.org

मुळावर कुऱ्हाडीचा वार

आशीष रायचूर

# मुळावर कुऱ्हाडीचा वार



स्वार्थ • मत्सर • गर्व • वासना

आशीष रायचूर

केवळ विनामूल्य वाटपासाठी

ऑल पीपल्स चर्च अँड वर्ल्ड आउटरीच, बैंगलोर, भारत द्वारे मुद्रित आणि वितरित।
प्रथम आवृत्ती मुद्रित, अक्तूबर 2018

**सम्पर्क**
All Peoples Church & World Outreach,
# 319, 2nd Floor, 7th Main, HRBR Layout,
2nd Block, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA

Phone: +91-80-25452617
Email: contact@apcwo.org
Website: www.apcwo.org

विशेष उल्लेख वळगता, पवित्र शास्त्राचे सर्व संदर्भ बायबल सोसायटी ऑफ इंडिया द्वारा प्रकाशित बायबलमधून घेण्यात आले आहेत.

**आर्थिक भागीदारी**
ह्या पुस्तकाचे विनामूल्य वाटप ऑल पीपल्स चर्चच्या सदस्यांच्या, भागिदारांच्या आणि मित्रांच्या आर्थिक मदतीमुळे शक्य झाले आहे. जर आपणास ह्या विनामूल्य प्रकाशनाद्वारे आशीर्वाद प्राप्त झाला असेल, तर आम्ही आपणास ऑल पीपल्स चर्चच्या विनामूल्य प्रकाशनांचे मुद्रण आणि वाटप यात मदत व्हावी म्हणून आर्थिकरित्या सहाय्य करण्यास आपणास निमंत्रित करतो. कृपया apcwo.org/give ह्या संकेतस्थळावर जाऊन आपले दान कसे पाठवावे हे पाहण्यासाठी ह्या पुस्तकाच्या मागे देण्यात आलेले ऑल पीपल्स चर्चसोबत भागिदारी हे पृष्ठ पाहावे. धन्यवाद!

**डाकयादी**
जर आपणास आमची नवीन पुस्तके मिळविण्यासाठी आपले नाव आमच्या डाकयादीत हवे असेल तर कृपया ईमेलद्वारे आपला योग्य पत्ता पाठवावा : contact@apcwo.org

**भारतात विनामूल्य बल्क ऑर्डर**
आपल्या स्थानिक मंडळीत, बायबल अभ्यासगटांत, बायबल कॉलेज, सेमिनार, सभांत, पुस्तकालयांत, व्यापार केन्द्रांत वाटपासाठी आम्ही आनंदाने आपली पुस्तकें विनामूल्य पाठवू इच्छितो. कृपया ईमेलद्वारे पुस्तकांची संख्या आणि प्राप्त करणाऱ्यांचा पत्ता पाठवावा : contact@apcwo.org

(Marati book - Laying the Axe to the Root)

## ऑल पीपल्स चर्च
## बाइबल कॉलेज आणि सेवा प्रशिक्षण केंद्र

ऑल पीपल्स चर्च बाइबल कॉलेज और सेवा प्रशिक्षण केंद्र (एपीसी–बीसी) भारतातील बँगलोर येथे आत्म्याने युक्त, अभिषिक्त, सक्रिय सेवेत सहभागी प्रशिक्षण आणि सिद्धांताच्या दृष्टीने यथार्थ तसेच देवाच्या वचनाच्या बौद्धिक दृष्टीने प्रेरणादायक अभ्यासासोबत पवित्र आत्म्याच्या अलौकिक सामर्थ्यात विश्वासणाऱ्यांस सेवेसाठी तयार करते. सेवेसाठी संपूर्ण व्यक्तिमत्वाचा विकास घडून यावा असा आमचा विश्वास आहे आणि दैवीय चारित्र्य, देवाच्या वचनाचा गंभीर पाया, आणि चिन्ह, चमत्कार व अद्भुत कार्यांवर जोर दिला जातो – सर्वकाही देवाच्या निकट सान्निध्याने साध्य झाले आहे.

एपीसी–बीसीमध्ये यथार्थ शिकवणीव्यतिरिक्त आम्ही प्रत्यक्ष रूपात देवाची प्रीती, पवित्र आत्म्याचा अभिषेक आणि सान्निध्य व देवाचे अलौकिक कार्य यास महत्व देतो. कित्येक तरूण स्त्री आणि पुरुषांनी हे प्रशिक्षण प्राप्त केले आहे आणि त्यांना त्यांच्या जीवनातील पाचारण पूर्ण करण्यासाठी बाहेर पाठविण्यात आले आहे.

खालील तीन पदव्या दिल्या जातात :

Theology and Christian Ministry (C.Th.) या विषयात एकवर्षीय प्रमाणपत्र अभ्यासक्रम
Theology and Christian Ministry (D.Th.) या विषयातं दोन वर्षीय प्रमाणपत्र अभ्यासक्रम
Bachelor in Theologyand Christian Ministry(B.Th.) या विषयात तीन वर्षीय प्रमाणपत्र अभ्यासक्रम

आठवड्याच्या प्रत्येक दिवशी, सोमवार ते शुक्रवारपर्यंत सकाळी 9 ते दुपारी 1 वाजेपर्यंत वर्ग घेतले जातात. विद्यार्थी, नोकरी करणारे, आणि गृहिणी हे सर्वच ह्या वर्गात भाग घेऊ शकतात आणि 1 वाजेनंतर आपल्या कामावर जाऊ शकतात. तेथे राहण्याची इच्छा असणाऱ्या स्त्रीपुरुषांसाठी वेगवेगळी वस्तीगृहे आहेत. विद्यार्थी दर आठवड्यास दोन ते पाच वाजेपर्यंत क्षेत्रीय कार्य, विशेष सेमिनारं, दुपारच्या वेळी प्रार्थना व उपासना यात वेळ घालवितात. दुपारच्या सभा घरून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ऐच्छिक आहेत. सर्व विद्यार्थ्यांस प्रोत्साहन दिले जाते की त्यांनी आठवड्याच्या शेवटी एका किंवा त्यापेक्षा अधिक स्थानिक मंडळीत सेवा करावी.

कॉलेज, विविध कार्यक्रम, अभ्यासक्रम इत्यादींविषयी अधिक माहितीसाठी आणि अर्जडाऊनलोड करण्यासाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्यावी : **apcwo.org/biblecollege**

# मुळावर कुऱ्हाडीचा वार



# अनुक्रमणिका

परिचय .................................................... ०१

स्वार्थाच्या मुळावर कुऱ्हाडीचा वार .......................... ०५

मत्सराच्या मुळावर कुऱ्हाडीचा वार .......................... ३३

गर्वाच्या मुळावर कुऱ्हाडीचा वार .............................. ५५

वासनेच्या मुळावर कुऱ्हाडीचा वार .......................... ८५

# परिचय

**आणि आता जर झाडाच्या मुळाशी कुऱ्हाड ठेवलेली आहे; जे जे झाड चांगले फळ देत नाही ते ते तोडून अग्नीत टाकिले जाते. मी पाण्याने तुमचा बाप्तिस्मा पश्चातापासाठी करतो खरा; परंतु माझ्या मागून जो येत आहे तो माझ्यापेक्षा समर्थ आहे, त्याच्या वाहणा उचलून चालण्याची देखील माझी पात्रता नाही; तो पवित्र आत्म्याने व अग्नीने तुमचा बाप्तिस्मा करणार आहे. त्याच्या हातात त्याचे सूप आहे, तो आपले खळे अगदी स्वच्छ करील व आपले गहू कोठारात साठवील; पण भूस न विझत्या अग्नीने जाळून टाकील (मत्तय ३:१०—१२).**

जगाला येशू ख्रिस्ताच्या सेवेचा परिचय घडवून देत असतांना, बापतिस्मा करणाऱ्या योहानाने म्हटले की येशू शुद्धीकरणाचे कार्य करावयास आला आहे. त्याने कुऱ्हाडीच्या उदाहरणाचा उपयोग केला जी फळ न देणाऱ्या झाडाच्या मुळाशी ठेवलेली असते. योहान गव्हापासून भूस किंवा कोंडा वेगळा करण्याविषयी देखील बोलला. सारांश म्हणजे, दोन्ही उदाहरणे शुद्धीकरणाच्या आणि स्वच्छतेच्या कामाचे वर्णन करतात. झाडाच्या मुळाशी कुऱ्हाड ठेवलेली आहे हे केवळ डहाळ्या व फांद्या तोडण्याचे काम सुचवीत नाही, तर आणखी गंभीर कार्य सूचित करते. त्याचप्रमाणे, ख्रिस्त समस्येचे मूळ दूर करावयास आला. तो केवळ पृष्ठभागांवरील गोष्टींकडे लक्ष देत नाही, तर अशा बाबींकडे लक्ष देतो ज्या सामान्यपणे डोळ्यांस दिसणाऱ्या गोष्टींच्या मागे दडलेल्या असतात.

आपण मत्तय ३:११ मध्ये उल्लेखिलेल्या पवित्र आत्म्याच्या बापतिस्म्यावर जोर देत असतांना, आपण ह्या तथ्याकडे दुर्लक्ष करतो की ११ वे वचन दोन वचनांमध्ये दबलेले आहे जे एका शुद्धीकरणाच्या कार्याविषयी बोलते जे करावयास येशू आला. आमच्यापैकी अनेकांनी ह्या वस्तूस्थितीकडे कानाडोळा केला आहे की त्याचे आगमन त्या वेळेकडे इशारा करीत होते जेव्हा “कुऱ्हाड झाडाच्या मुळाशी ठेवण्यात आली आहे” आणि जेव्हा भूस आगीत जाळून टाकले जाईल. आम्हाला पवित्र आत्म्याच्या बापतिस्म्याविषयी, अन्यान्य भाषा बोलण्याविषयी आणि आमच्या जीवनात पवित्र आत्म्याच्या कृपादानांच्या प्रगट होण्याविषयी आनंद वाटतो आणि आम्ही अत्यंत आनंदित होतो, पण आपण पवित्र आत्म्याच्या शुद्धीकरणाच्या कार्याकडे क्वचितच लक्ष देतो. पवित्र आत्म्याच्या बापतिस्म्यापूर्वी आणि बापतिस्म्यानंतर आमच्या जीवनांत प्रभु येशू ख्रिस्ताचे एक सामर्थ्यवान शुद्धीकरणाचे कार्य होते. ही दु:खाची गोष्ट आहे की आमच्यापैकी बहुतेक जणांनी त्याच्या शुद्धीकरणाच्या कार्यासाठी आपले अंत:करण उघडलेले नाही आणि केवळ पवित्र आत्म्याच्या बापतिस्म्याची निवड केली आहे. हे महत्वाचे आहे की आमच्यात पूर्ण कार्य करण्यासाठी आम्ही प्रभुला मुभा द्यावी.

जरी देवाच्या वचनाची तुलना स्वादिष्ट वाटणाऱ्या मधूशी, रोजच्या भाकरीशी, ताजेतवाने करणाऱ्या वृष्टीशी आणि मार्ग दाखविणाऱ्या दिव्याशी करण्यात आलेली आहे, तरीही ते भूस जाळून टाकणाऱ्या अग्नीसारखे, खडकाचा भुगा करणाऱ्या हातोड्यासारखे आणि जीवन व आत्मा यांस भेदून आरपार जाणाऱ्या दुधारी तलवारीसारखे आहे. हातोडा, आग आणि तलवार म्हणून

वचनाचा संयुक्त प्रभाव आमच्या जीवनाच्या त्या क्षेत्रांवर इच्छित शुद्धीकरणाचा परिणाम असला पाहिजे ज्यांस शुद्धीकरणाची गरज आहे!

बायबल म्हणते, “त्यांनी तेथून निघून जाऊन सर्वत्र घोषणा केली. प्रभु त्यांच्याबरोबर कार्य करीत होता व घडणाऱ्या चिन्हांच्या द्वारे वचनाचे समर्थन करीत होता” (मार्क १६:२०). हे वचन वाचून कधी कधी आपण घाईघाईने असा निष्कर्ष काढतो की परमेश्वर आमच्यासोबत कार्य करील, मग आम्ही कसेही का असेना. जरी हे पूर्णपणे खरे असले की आमच्यासोबत कार्य करण्याची देवाची इच्छा आहे, तरी आमच्या जीवनात अशा काही गोष्टी असतात ज्या आमच्यासोबत कार्य करण्यापासून देवास रोखून धरतात. जर आमच्या जीवनात अशा गोष्टी आहेत ज्या (देवाचे हात बांधतात) त्याला आमच्यासोबत काम करण्याच्या मार्गात अडखळण आणतात, तर त्या क्षेत्रांस तोंड द्यावे लागेल.

स्वार्थ, मत्सर, गर्व आणि वासना काही नकारात्मक गोष्टी आहेत ज्या आमच्यासोबत काम करण्यापासून देवास अडखळण आणतात. जेव्हा आम्ही देवाला मुळाशी कुऱ्हाड ठेवण्याची आणि आमच्या जीवनाच्या त्या क्षेत्रांत शुद्धीकरणाचे काम करण्याची संधी देऊ, तेव्हा आम्ही केवळ देवासाठीच नव्हे तर एकमेकांसाठी सुद्धा उत्तम लोक ठरू.

# मुळावर कुऱ्हाडीचा वार



स्वार्थ • मत्सर • गर्व • वासना

# १

# स्वार्थाच्या मुळावर कुऱ्हाडीचा वार

बरेचदा, ख्रिस्ताचे, आणि केवळ त्याचे मन:पूर्वक गौरव करण्याची आमची इच्छा, आमचे स्वत:चे नाव पुढे करण्याची इच्छा, सत्ता व प्रभावाच्या पदांची इच्छा, अथवा आमच्या कृपादानांस, प्रतिभेस आणि पात्रतेस मान्यता मिळावी ही इच्छा यांनी कलंकित होते. जर आम्ही सावध राहिलो नाही तर जीवनात आम्ही अशा ठिकाणी येऊन पोहोचू जेथे आम्ही आत्म्याऐवजी 'स्व'ने प्रेरित होऊ. पवित्र आत्मा नेहमीच ख्रिस्ताचे गौरव करील (योहान १६:१४), पण 'स्व' म्हणजे आपला स्वार्थ ख्रिस्तास द्यावयाचे गौरव चोरून घेतो.

धोका या गोष्टीत आहे की आमच्यापैकी बहुतेक लोक कधीही हे सार्वजनिकरित्या कबूल करणार नाहीत की आम्हास स्वार्थ प्रेरित करीत आहे. आम्ही चांगले विश्वासणारे असू शकतो जे प्रार्थना करतात, उपवास करतात, उपासना करतात आणि सर्व योग्य गोष्टी करतात. आणि तरीही, जेव्हा आम्ही देवाचा शोधदीप आमच्या अंतर्भागातील कोपऱ्यात चमकविण्याची परवानगी देतो, तेव्हा आम्हास असे आढळून येते की जे काही आम्ही करतो त्यापैकी बऱ्याच गोष्टींचा जन्म आत्म्यामध्ये झालेला नसतो, तर स्वार्थात झालेला असतो. आमच्यापैकी बहुतेकांसाठी स्वचे कार्य ते ओळखण्याच्या आमच्या योग्यतेपेक्षा अधिक सूक्ष्म असते.

देहापासून (स्व) जन्मलेले देह (स्व) आहे आणि आत्म्यापासून जन्मलेले आत्मा आहे (योहान ३:६). ह्या दोघांचे मूळ स्पष्ट आहे

आणि ज्याचा जन्म स्व अर्थात् स्वार्थातून झाला आहे त्याचे परिवर्तन आत्म्याच्या कार्यात करता येत नाही, मग त्याने कितीही उत्तमप्रकारे वेशांतर का केले असेना.

**इस्राएल लोकांना सांग की, पिढ्यानपिढ्या तुम्हाला माझ्याप्रीत्यर्थ हेच पवित्र अभिषेकाचे तेल असणार. हे तेल कोणाही व्यक्तीच्या अंगाला लावावयाचे नाही व ह्या प्रकारचे मिश्रण कोणी करावयाचे नाही; हे पवित्र आहे; आणि तुम्ही ह्याला पवित्रच लेखावे. जो कोणी त्यांच्यासारखे मिश्रण तयार करील किंवा कोणा परक्याला ते लावील त्याचा स्वजनातून उच्छेद व्हावा** (निर्गम ३०:३१—३३).

पवित्र अभिषेकाचे तेल, जे पवित्र आत्म्याच्या सान्निध्याचे आणि कार्याचे प्रतीक होते, ते शरीरावर लावावयाचे नव्हते, इतर हेतूंसाठी त्याची प्रतिकृती काढण्याचीही परवानगी नव्हती. जे स्वने जन्मलेले आहे त्याचा देव अभिषेक करू शकत नाही. वस्तूत:, शारीरिक बळात आत्म्याच्या कार्याचे अनुकरण करण्यात धोका आहे (निर्गम ३०:३३).

जे देहाने (स्वने) जन्मले आहे ते देह (स्व) आहे आणि जे देहाच्या अधीन आहेत त्यांना देवाला प्रसन्न करिता येत नाही (रोम ८:८). म्हणून काम कितीही मोठे का असेना, जर ते देहामध्ये करण्यात आले असले, तर ते देवाला प्रसन्नतादायक नाही.

जो आपल्या देहस्वभावासाठी (स्व) पेरतो त्याला देहस्वभावापासून भ्रष्टतेचे, नाशाचे पीक मिळेल (गलती ६:८). स्वार्थाच्या प्रेरणेने जे कार्य केले जाते, ते टिकाऊ नसेल. ही कामे लाकडाची, गवताची आणि खुंटाची आहेत जी अग्नीपरीक्षेत उत्तीर्ण होऊ शकत नाहीत (२ करिंथ ३:१२,१३).

जर स्वार्थ आम्हास प्रेरित करीत असेल, तर आम्ही आत्म्याने चालू शकत नाही कारण पवित्र आत्म्यास जे हवे आहे त्याचा देह विरोध करते (गलती ५:१७). त्याऐवजी, आम्हाला ते मार्गदर्शन शोधण्याची गरज आहे जे पवित्र आत्म्याने प्रेरित आहे. आपण आपली अंत:करणे उघडू या आणि प्रभुला परवानगी देऊ या की त्याने कुऱ्हाडाचा वार स्वच्या म्हणजे स्वार्थाच्या मुळावर करावा!

## सेवेत चुकीचा हेतू

**कित्येक हेव्याने व वैरभावाने ख्रिस्ताची घोषणा करितात; आणि कित्येक सद्‌भावाने करितात; मी सुवार्तेसंबंधी प्रत्युत्तर देण्यास नेमलेला आहे हे ओळखून ते ती प्रीतीने करितात; पण इतर आहेत ते माझी बंधने अधिक संकटाची व्हावी अशा इच्छेने तट पाडण्याकरिता दुजाभावाने ख्रिस्ताची घोषणा करतात** (फिलिप्पै. १:१५—१७).

प्रेषित पौल म्हणतो की ख्रिस्ती लोकांस योग्य गोष्टी चुकीच्या हेतूने करणे शक्य आहे. तो म्हणतो की काही लोक वचनाचा प्रचार करतात—हे करणे योग्य आहे—पण ते स्वार्थी महत्वाकांक्षेने, ईर्ष्येने आणि कलहाने प्रेरित असते.

**मी मंडळीला थोडेसे लिहिले; परंतु तिच्यामध्ये अग्रगण्य होण्याची लालसा धरणारा दियत्रफेस हा आमचा स्वीकार करीत नाही** (३ योहान १:९).

दियत्रफेस मंडळीचा सभासद होता ज्याला मानाचे स्थान मिळविण्याची इच्छा होती. महत्वाचे स्थान मिळविण्याच्या इच्छेने प्रेरित होऊन, तो इतर पुढाऱ्याविषयी मत्सराने बोलू लागला, त्याने

आतिथ्य करण्यास नाकार दिला आणि इतर पुढाऱ्यांचे आतिथ्य करण्याची त्याने इतरांस मनाई केली. तो असा व्यक्ती होता ज्याने म्हटले: “मला लोकांपुढे दिसावयाचे आहे.” “मला प्रसिद्ध व्हावयाचे आहे.” “मी तेथे पुढे उभा राहू इच्छितो.” “माझे इतरांनी ऐकावे.” आध्यात्मिक गोष्टी करणे शक्य आहे आणि तरीही ते चुकीने प्रेरित असू शकते. आम्ही जे करीत आहोत ते करणे योग्य दिसते म्हणून आम्ही त्याचे समर्थन करू शकत नाही. आमच्या प्रत्येक कृतीमागील प्रेरणा काय आहे हे पाहण्यासाठी देव आमच्या अंत:करणाच्या गाभाऱ्याचा शोध घेतो.

**पुष्कळ लोक देवाच्या वचनाची भेसळ करून ते बिघडवून टाकतात. आम्ही त्यांच्यासारखे नाही, तर जसे सात्विकपणाने व देवाच्या द्वारे बोलावे तसे आम्ही देवासमक्ष ख्रिस्ताच्या ठायी बोलणारे आहो** (२ करिंथ २:१७).

पौल म्हणतो की, असे कित्येक लोक आहेत जे देवाच्या वचनाची भेसळ करतात. “भेसळ” करण्याचा अर्थ “व्यक्तीगत लाभासाठी देवाच्या वचनाची भेसळ करणे.” म्हणून हे शक्य आहे की काही लोक देवाच्या वचनाच्या भेसळयुक्त आवृत्तीचा प्रचार करतात, जी त्यांच्या वैय्यक्तिक कल्पनांनी, स्वार्थाने डागाळलेली असते. जर हे पौलाच्या काळात घडले, तर ते आमच्या काळातही नक्की घडू शकते! जेव्हा आम्ही देवाच्या वचनाचा प्रचार करतो, तेव्हा असे करण्यासाठी आम्हास आमच्या हेतूंचे रक्षण केले

जे स्वार्थाने जन्मले आहे त्याचा देव अभिषेक करू शकत नाही.

पाहिजे. ते वैय्यक्तिक लाभासाठी करण्यात आले आहे काय? ते स्वार्थपूर्ण महत्वकांक्षेने करण्यात आले आहे काय? ते महत्व प्राप्त करण्यासाठी करण्यात आले आहे काय? ही प्रश्ने आम्ही स्वत:स विचारण्याची गरज आहे.

## स्वार्थाच्या मुळाची प्रकटीकरणे

आमच्यामध्ये स्वार्थाचे मूळ आहे किंवा नाही हे आम्ही कसे ओळखतो? कधीकधी, आम्ही असे समजतो की आम्ही स्वसाठी पूर्णपणे मरून चुकलो आहोत, केवळ यासाठी की आम्ही बऱ्याच काळापर्यंत उपवास व प्रार्थना केली आहे. आम्ही काही निश्चित आध्यात्मिक शिस्तींच्या पालनावर अवलंबून असतो आणि त्या शिस्तीच्या पालनाने मूळ हेतू खरोखर साध्य झाला आहे किंवा नाही याचे परीक्षण करावयास चुकतो, ह्या उदाहरणात, स्वार्थाचे मूळ दूर करण्याबाबत.

आपण स्वार्थाच्या मुळाच्या काही प्रकटीकरणांवर चर्चा करू या. यात आमच्या प्रवृत्तीतील, विचारांतील अथवा आचरणांतील काही अभिव्यक्तींचा समावेश आहे, ज्या स्वार्थाच्या मुळाचे दर्शक आहेत. जर आम्हास आमच्या प्रवृत्तींत, विचारात अथवा आचरणांत ही प्रकटीकरणे किंवा आविष्करणे दिसून आली, तर आम्हाला प्रभुस हे विचारण्याची गरज आहे की त्याने आमच्या जीवनात स्वच्या अर्थात स्वार्थाच्या मुळाशी कुऱ्हाड घालावी.

**स्वत:स पुढे करणे** (लोकांनी जाणावे आणि पंसत करावे ही इच्छा)

जर एखाद्या ख्रिस्ती व्यक्तीच्या मनात उत्तम गायक अथवा

उत्तम सुवार्तिक म्हणून ओळखले जाण्याची इच्छा असेल, आणि तो ह्या इच्छेने प्रेरित असेल तर हे स्वत:स पुढे करणे होय. आपण जे काही करतो त्यात निपुण असावे ही इच्छा धरणे आणि त्यामुळे ख्याति अथवा मान्यता प्राप्त करण्याची इच्छा धरणे यात फर्क आहे. आम्हास हे प्रश्न विचारण्याची गरज आहे, "जी कामे आम्ही करतो, ती आम्ही का करतो?" "कोणती गोष्ट आम्हाला खरोखर प्रेरित करते?" हे फार सोपे प्रश्न असतील, परंतु अत्यंत महत्वपूर्ण प्रश्न आहेत. जर एका वाढत्या मंडळीच्या पाळकाने इच्छा धरली की त्याच्याजवळ अनेक हजारो लोकांची मंडळी असावी, तर त्याला स्वत:स हा प्रश्न विचारण्याची गरज आहे : "खरोखर आत्म्यांचे तारण व्हावे ही माझी इच्छा आहे काय किंवा त्यामागे स्वत:चे नाव कमविण्याची इच्छा आहे काय?" जर एखाद्याला वचनाचा प्रचार करण्याची इच्छा असेल, तर आम्हास हा प्रश्न करण्याची गरज आहे की लोकांस वचनापासून फायदा व्हावा म्हणून तसे केले जात आहे अथवा (ते करण्याचे कारण) त्या व्यक्तीला मोठा सुवार्तिक अथवा उपदेशक व्हावे अशी इच्छा आहे. त्या मागील बाब ही आहे की ती प्रेरणा स्वत:च्या वाढीची आहे अथवा (त्याचा हेतू) लोकांचा फायदा व्हावा अशी आहे आणि केवळ देवाला गौरव प्राप्त व्हावा अशी त्यामागे खरोखर कळकळ आहे.

**मी मनुष्यांकडून प्रशंसा करून घेत नाही. जे तुम्ही एकमेकांकडून प्रशंसा करून घेता आणि जो एकच देव त्याच्याकडून प्रशंसा करून घेण्याची खटपट करीत नाही, त्या तुम्हाला विश्वास ठेवता येणे कसे शक्य आहे?** (योहान ५:४१,४४).

येशू त्याच्या काळातील धार्मिक पुढाऱ्यांस उद्देशून बोलत

होता आणि त्यांच्याकडे इशारा करीत होता की ते एकमेकांकडून मान मिळविण्यास उत्सुक होते आणि देवाकडून प्राप्त होणाऱ्या गौरवाची त्यांना चाड नव्हती. आम्हास अशा ठिकाणी येण्याची गरज आहे, जेथे येशूप्रमाणे, आम्हाला मनुष्यांकडून मान मिळविण्याची गरज भासू नये. जर आम्ही स्वत:शी प्रमाणिक असू, तर आम्हाला कळून येईल की, आमच्यापैकी फार कमी लोक खरोखर असे करीत असल्याचा दावा करू शकतात! यापुढे आम्ही या गोष्टीची तमा बाळगता कामा नये की लोक आमची प्रशंसा अथवा स्तुती करतात काय. त्याऐवजी, आमची इच्छा केवळ ही असली पाहिजे की देवाकडून प्राप्त होणारा मान मिळविण्याचा आम्ही प्रयत्न करावा. आपण केवळ देवास गौरव देण्याच्या आणि लोकांच्या गरजा पुरविण्याच्या एकमेव हेतूने प्रचार करावा, गीत गावे अथवा सेवा करावी, आणि मनुष्यांकडून मान मिळविण्याची इच्छा धरता कामा नये. आम्ही जाणतो की जेव्हा मनुष्यांच्या प्रशंसेपेक्षा स्वर्गाची वाहवाही आम्हास अधिक मौल्यवान वाटते, तेव्हा आम्ही स्वार्थापासून मुक्त असतो. जेव्हा आमची इच्छा केवळ देवाकडून स्तुती मिळविण्याची असते आणि मनुष्यांकडून समर्थन प्राप्त करण्याच्या इच्छेने कलंकित नसते, तेव्हा आमची अंत:करणे शुद्ध असतात आणि स्वार्थापासून मुक्त असतात.

**जो आपल्या मनाचे बोलतो, तो स्वत:चेच गौरव पाहतो; परंतु आपणाला ज्याने पाठविले त्याचे गौरव जो पाहतो तो खरा आहे व त्याच्यामध्ये अनीति नाही** (योहान ७:१८).

आम्हाला स्वत:स हे विचारण्याची गरज आहे की आम्ही कोणाचा गौरव शोधत आहोत — देवाचा किंवा स्वत:चा? जेव्हा

आम्ही सेवक, मंडळ्या, सेवासंस्था अथवा ख्रिस्ती संघटना या नात्याने घोषणा करतो अथवा जाहिराती देतो, तेव्हा आम्ही अत्यंत सावध असले पाहिजे की आम्ही स्वत:स पुढे करता कामा नये, परंतु प्रभु येशू ख्रिस्ताचे गौरव करावे. अर्थात, मान्यतेसाठी आणि इतर कायदेशीर हेतूंसाठी नाव आवश्यक आहे, पण हे तथ्य कबूल करणे महत्वाचे आहे की आमचा हेतू स्वत:स पुढे करण्याचा नसावा. जेव्हा आपण स्वत:विषयी, स्वार्थाने प्रेरित होऊन बोलतो, ख्याति मिळविण्याचा प्रयत्न करतो आणि मनुष्यांची स्तुती प्राप्त करू इच्छितो, तेव्हा आम्ही स्वत:चे गौरव शोधण्याचा प्रयत्न करतो. जेव्हा आम्ही खरोखर फक्त देवाचे, आणि केवळ त्याचे गौरव करण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा आमची अंत:करणे शुद्ध असतात आणि आमच्याठायी अधर्म आढळून येत नाही.

**म्हणून तुम्ही खाता, पिता किंवा जे काही करिता ते सर्व देवाच्या गौरवासाठी करा** (१ करिंथ. १०:३१).

स्वत:स पुढे करणे आज ख्रिस्ती सेवेतही सर्वत्र प्रचलित आहे. लोक त्यांची नावे अथवा त्यांच्या सेवासंस्थांची नावे प्रकाशित करून रात्रभरात नामवंत होण्यास उत्सुक असतात. आमच्या निरीक्षणास येते की लोक स्वार्थाच्या कितीतरी शोधात आहेत, पाळक स्पर्धा करीत आहेत की कोण जास्त अभिषिक्त आहेत, सेवासंस्था आपल्या मालाचा विक्रीवाढ कार्यक्रम करण्याच्या प्रयत्नात आहेत. आणखी बरेच काही. स्वार्थ सजीव आणि वरचढ असल्याचे दिसून येते. अशी वेळ आली आहे की आपण थांबून आणि प्रामाणिकपणे आमच्या अंत:करणांचे मूल्यमापन करावे. आपण खरोखर देवाकडून प्राप्त होणाऱ्या सन्मानाच्या शोधात आहोत का अथवा स्वत:स पुढे दामटण्याच्या प्रयत्नात गुंतलो आहोत, की

आमच्याजवळ आत्म्याची सौम्य कानउघाडणी ऐकून घेण्यासाठी वेळही नाही किंवा संवेदनशीलताही नाही? जे काही आम्ही करतो ते केवळ देवास गौरव देण्याच्या हेतूने केले गेले पाहिजे.

**स्वार्थी महत्वाकांक्षा** (देवासाठी मोठ्या गोष्टी साध्य करणारा असा कोणी बनण्याची इच्छा धरणे)

**ह्यावरून ख्रिस्ताच्या ठायी काही आश्वासन, प्रीतीचे काही सात्वन, आत्म्याची काही सहभागिता, काही कळवळा व करूणा ही जर आहेत, तर तुम्ही समचित्त व्हा, म्हणजे एकमेकांवर सारखीच प्रीति करा आणि एकजीव होऊन एकचित्त व्हा; अशाप्रकारे माझा आनंद पूर्ण करा. तट पाडण्याच्या अथवा पोकळ डौल मिरवण्याच्या बुद्धीने कोणीही आपलेच हित पाहू नका, तर लीनतेने एकमेकांना आपणापेक्षा श्रेष्ठ माना; तुम्ही कोणीही आपलेच हित पाहू नका, तर दुसऱ्याचेही पाहा** (फिलिप्पै. २:१—४).

पौल आम्हास सावध करतो की आमच्या स्वार्थपूर्ण महत्वकाक्षेने आम्ही काहीही करता कामा नये. तथापि यावरून हे सूचित होते की देवासाठी स्वार्थी महत्वाकांक्षेने प्रेरित होऊन कामे करणे शक्य आहे. ह्या अर्थाने स्वार्थी महत्वकांक्षा ही केवळ देवासाठी मोठ्या गोष्टी साध्य करणारा व्यक्ती म्हणून ओळखले जाण्याची प्रबळ इच्छा आहे. देवाजवळ आमच्यापैकी प्रत्येकासाठी अद्‌भुत योजना आहे. त्याची इच्छा आहे की पृथ्वीवर आम्ही त्याच्या राज्याची उलथापालथ करणारे बनावे. पण त्याच्या राज्यासाठी आमच्या सर्व प्रयत्नांत, जर आमचा हेतू त्याला विख्यात करण्याऐवजी, स्वतःचे नाव कमविणे असेल, तर आम्ही स्वार्थी महत्वाकांक्षेने प्रेरित आहोत असे म्हणावे लागेल. आमची प्रेरणा लोकांची सेवा होत

असलेली पाहण्याची प्रामाणिक इच्छा असली पाहिजे, मग त्यांस आमची नावे आणि आम्ही कोण आहोत हे माहीत असो वा नसो. जर सर्व गोष्टींच्या अंती 'स्व' हा 'अधिनायक' असेल तर, स्वार्थी महत्वाकांक्षा ही प्रेरक आहे — ख्रिस्ताची प्रीति नव्हे.

एक महत्वाचा प्रश्न विचारावासा वाटतो, "माझ्या स्वप्नांत आणि दृष्टांतात, 'अधिनायक' अथवा हीरो कौन आहे?" देव किंवा मी? आपण कितीदा तरी लोकांस ही साक्ष देतांना ऐकले आहे, "मी प्रार्थना केली आणि ते बरे झाले!" भर बरे करणाऱ्या देवाऐवजी 'मी' वर असतो आणि त्याच्यावाचून आमची कोणतीही प्रार्थना कामाची नाही. गौरव प्राप्त करणारा प्रार्थनेचे उत्तर देणाऱ्या देवाऐवजी, तो व्यक्ती ठरतो ज्याने प्रार्थना केली. आपण मोठमोठ्या सुवार्तासभांचे आयोजन करू शकतो, पण त्यामागील प्रेरणा स्वार्थी महत्वाकांक्षा असेल, तर त्या सभेने परमेश्वर देव प्रसन्न होत नाही कारण जे देहस्वभावात आहेत ते देवाला प्रसन्न करू शकत नाहीत. लोक तरीही वचनावर विश्वास करू शकतात आणि अशा सभांत आशीर्वाद प्राप्त करू शकतात कारण देव नेहमीच त्याचे वचन पूर्ण करावयास जागरूक असतो (यिर्मया १:१२). आणि म्हणून जे वचन बोलले गेले आहे त्याच्याद्वारे, देव लोकांच्या जीवनांत त्याची पुष्टी करील. तथापि, पित्याच्या नावात त्याच्या अंत:करणापासून न उद्भवणारीअनेक अद्भुत कार्ये करण्यापेक्षा पित्याची इच्छा पूर्ण करणे अधिक महत्वाचे आहे (मत्तय ७:२१—२३).

आम्ही जाणतो की जेव्हा मनुष्यांच्या प्रशंसेपेक्षा स्वर्गाची वाहवाही आम्हास अधिक मौल्यवान वाटते, तेव्हा आम्ही स्वार्थापासून मुक्त असतो. जेव्हा आमची इच्छा केवळ देवाकडून स्तुती मिळविण्याची असते आणि मनुष्यांकडून समर्थन प्राप्त करण्याच्या इच्छेने कलंकित नसते, तेव्हा आमची अंत:करणे शुद्ध असतात आणि स्वार्थापासून मुक्त असतात.

जसे पौल शिकवितो, स्वार्थी महत्वकांक्षेचा इलाज आहे नम्र अंत:करण बाळगणे आणि इतरांस स्वत:पेक्षा चांगले समजणे. आम्हाला इतरांस अधिक मान्यता देण्याची गरज आहे आणि त्यांचे हित कशात आहे हे पाहण्याची गरज आहे — त्यांचे फायदे, त्यांचे कल्याण आणि त्यांचे आशीर्वाद.

**स्वावलंबन** (पवित्र आत्म्यावर अवलंबून राहण्याऐवजी स्वत:वर अवलंबून राहणे)

**कारण जे आपण देवाच्या आत्म्याने सेवा करणारे, ख्रिस्त येशूविषयी अभिमान बाळगणारे व देहावर भरवंसा न ठेवणारे, ते आपण सुंता झालेलेच आहो** (फिलिप्पै ३:३).

**तर मग आतापासून आम्ही कोणाला देहदृष्ट्या ओळखले होते तरी आता ह्यापुढे त्याला तसे ओळखीत नाही** (२ करिंथ ५:१६).

**म्हणून माणसाविषयी कोणी अभिमान बाळगू नये, कारण सर्वकाही तुमचे आहे** (१ करिंथ ३:२१).

'स्वावलंबन' प्रभुवर अवलंबून राहण्याऐवजी स्वत:वर किंवा दुसऱ्यांवर अवलंबून राहणे. बरेचदा, आपण आपले शिक्षण, अनुभव, पात्रता आणि कौशल्यांमुळे स्वेच्छेने एखादे काम हाती घेतो. आम्हाला स्वत:च्या पात्रतेत विश्वास असतो आणि आम्ही नकळतच विचार करतो, "जरी देव माझी मदत करीत नसला, तरीही मला नौकरी मिळू शकते." अर्थात, आम्ही हे बोलून दाखवत नाही! तर, आम्ही योग्य आध्यात्मिक विधानांद्वारे आपल्या स्वावलंबावर सावधपणे पांघरून घालत असतो.

प्रेषित पौलाप्रमाणे, लोक देहस्वभावात कोण आहेत हे

पाहण्याऐवजी ते आत्म्यात कोण आहे हे पाहावयास आम्ही शिकले पाहिजे. लोकांजवळ काय आहे अथवा ते स्वाभाविक क्षेत्रात कसे दिसतात त्याद्वारे आपण लोकांचे मूल्यमापन करीत नाही. तथापि, ख्रिस्ती जगात सामान्य प्रथा ही आहे की आपण बरेचदा लोकांस "देहस्वभावानुसार" जाणण्याचा प्रयत्न करतो. आपण गुप्तपणे अशा लोकांशी संबंध स्थापन करण्याची इच्छा धरतो ज्यांचा लोक आदर करतात, ह्या आशेने की ते आम्हास जीवनात आणि सेवेत "उंचवितील."

ही येथे भारतातील आमच्या मंडळ्यांत सामान्य गोष्ट नाही काय? आपण विदेशी लोकांच्या शोधात असतो, त्यांना लगेच आसनावर बसवितो, त्यांना खुश करतो आणि त्यांची सर्व संपर्क माहिती प्राप्त करून घेतो! आम्ही गुप्तपणे ही आशा करतो की हा संबंध विदेश जाण्याचे निमंत्रण प्राप्त करण्याची संधी ठरेल. आमच्यापैकी जवळजवळ सर्वजण कधीनकधी तरी असे करण्याचा दोषी आहे. पण पौल आम्हास चेतावनी देतो की देहस्वभावानुसार लोकांचा मान सन्मान करता कामा नये. आम्ही प्रत्येकास समानरित्या वागविले पाहिजे — त्यांच्या राष्ट्रीयत्वाच्या, पदाच्या, वर्णाच्या आधारे नव्हे.

जर परमेश्वर देव हे संबंध घडवून आणीत नाही आणि आम्ही यश संपादनाच्या आपल्या स्वतःच्या वैयक्तिक इच्छेने त्यांचा शोध घेत फिरतो, तर आम्ही आपल्या स्वावलंबाच्या क्षेत्रात वावरत आहोत — आम्ही आपल्या स्वतःच्या व इतरांच्या व्यक्तिगत क्षमतेवर अवलंबून आहोत. हे 'देहस्वभावावर' अवलंबून राहणे होय आणि हे देवास प्रसन्न करणारे नाही.

**तुम्ही माझ्यामध्ये राहा आणि मी तुम्हांमध्ये राहीन. जसे फाटा वेलात राहिल्यावाचून त्याला आपल्याआपण फळ देता येत नाही तसे माझ्यामध्ये राहिल्यावाचून तुम्हालाही देता येणार नाही. मीच वेल आहे, तुम्ही फाटे आहा; जो माझ्यामध्ये राहतो आणि मी ज्याच्यामध्ये राहतो तो पुष्कळ फळ देतो, कारण माझ्यापासून वेगळे असल्यास तुम्हाला काही करिता येत नाही** (योहान १५:४,५).

प्रभुवाचून, आम्ही काहीही करू शकत नाही. कार्य करावयास आम्ही अक्षम आहोत असे नाही. अर्थात, आमच्यापैकी अनेक जण आपल्या स्वत:च्या पात्रतेच्या बळावर अनेक गोष्टी साध्य करू शकतात. तथापि, ख्रिस्तावाचून आपण देवाच्या दृष्टीने महत्वाच्या गोष्टी साध्य करावयास समर्थ ठरणार नाही, अशा गोष्टी ज्या सार्वकालिकदृष्ट्या स्थायी आहेत.

**स्व—रक्षण** (स्वत:चे जीवन अत्यंत प्रिय लेखणे)

आम्हा सर्वांजवळ स्व—रक्षणाचा हा गुण जन्मापासूनच असतो जो देवाने दिलेला आहे आणि जरूरी आहे. आपण रहदारीच्या मार्गावर स्वैर धावत नाही अथवा घराच्या छपरावरून उडी मारत नाही — केवळ यासाठी की आपण जीवनास मौल्यवान समजतो, विशेषेकरून स्वत:चे. तथापि, देवाच्या आज्ञेचे पालन करण्यापासून स्वत:स रोखणे हे धोकादायक आहे. जर आम्ही आपल्या संरक्षणास आमच्या जीवनांवरील देवाच्या पाचारणापेक्षा अधिक श्रेष्ठ स्थान देतो आणि ते आम्हास आज्ञापालन करण्याच्या मार्गात अडखळण आणते, तर आपण आध्यात्मिकरित्या धोकादायक स्थितीत आहोत. हे स्वार्थाच्या मुळाचे प्रकटीकरण होय आणि ते नष्ट करणे अगत्याचे आहे. देवाच्या आज्ञेच्या पालनाचे मोल देऊन स्वत:च्या जीवनाचे,

पदाचे, संपत्तीचे अथवा ख्यातीचे रक्षण करण्याची इच्छा धरणे अथवा विश्वासाचे पाऊल पुढे टाकण्यास अनिच्छुक असणे हे या गोष्टीचे स्पष्ट दर्शक आहे की स्वार्थ अद्याप प्रबळ आहे आणि त्यास तोंड देण्याची गरज आहे.

**पण आता पाहा, मी अंतर्यामी बद्ध होऊन यरूशलेमेत जात आहे. तेथे मला काय काय होईल ते माहीत नाही; केवळ इतके कळते की, बंधने व संकटे माझी वाट पाहत आहेत; ह्याविषयी पवित्र आत्मा मला नगरोनगरी साक्ष देत आहे. मी तर आपल्या प्राणाची किंमत एवढीसुद्धा करीत नाही, ह्यासाठी की, मी आपली धाव आणि देवाच्या कृपेची सुवार्ता निश्चितार्थाने सांगण्याची जी सेवा मला प्रभु येशूपासून प्राप्त झाली आहे ती शेवटास न्यावी** (प्रेषितांची कृत्ये २०:२२—२४).

उदाहरणार्थ, आपण बँगलोर शहरातील एका तरूणाचा विचार करू या, जो देवावर प्रीती करतो. आपण असे गृहित धरू या की ह्या तरूणास अमेरिकेचा प्रवास करण्याची, उत्तम शिक्षण मिळविण्याची आणि आपल्या व्यावसायिक जीवनात यशस्वी होण्याची संधी लाभली. त्याचे सर्व काही सुरळीत चालले आहे — उत्तम नोकरी आहे, राहावयास सुंदर जागा आहे आणि त्याचे लग्न झाल्यावर तो तेथे स्थायी होणार आहे. येथे भारतात, त्याचे आईवडील आणि आजोबा सर्वांना त्याच्या ह्य यशाचा अभिमान आहे. आता ह्या क्षणी, त्याला समजून येत आहे की देव त्याला भारतातील एखाद्या ठिकाणी परत जावयास आणि देवाच्या राज्यासाठी काहीतरी करावयास मार्गदर्शन करीत आहे. मग हा तरूण पुरुष त्याच्या जीवनातील एका अत्यंत महत्वपूर्ण क्षणाप्रत येऊन पोहोचला आहे. त्याला हा निर्णय घ्यावा लागेल की तो देवाच्या आज्ञेचे

पालन करणार आहे अथवा स्वत:चा मार्ग अवलंबणार आहे. जर तो अमेरिकेत राहण्याचा निर्णय घेतो — कारण त्यास तो आजीवन काळची संधी समजतो, जी त्याने हातची वाया जाऊ देता कामा नये — तर हे आत्म—रक्षणामुळे देवाच्या आज्ञेचा नाकार करणे ठरेल. तथापि, जर हा तरूण पुरुष अमेरिकेत त्याला जे काही लाभले आहे ते सोडून देतो — त्याचे यश, सुख, संपादन, आणि ख्याती — आणि भारतात परत येऊन आणि देवाने त्याला जे काही करावयास पाचारण केले आहे ते करण्यासाठी पाऊल उचलतो, तर हे स्वत:साठी मरणे ठरेल! यामुळे देव अत्यंत प्रसन्न होईल!

**मी तुम्हाला खचित खचित सांगतो, गव्हाचा दाणा जमिनीत पडून मेला नाही तर तो एकटाच राहतो, आणि मेला तर पुष्कळ पीक देतो. जो आपल्या जिवावर प्रीति करितो तो त्याला मुकेल, आणि जो ह्या जगात आपल्या जिवाचा द्वेष करितो तो त्याचे सार्वकालिक जीवनासाठी रक्षण करील** (योहान १२:२४,२५).

'स्व—रक्षण' अथवा आत्मरक्षणाचा अर्थ हा आहे की आपण स्वत:चे रक्षण करतो — आपल्या स्वत:च्या जीवनांचे. जेव्हा आपण असे करतो, तेव्हा आपण एकटे असतो. आत्म—रक्षण त्या फलदायकतेच्या आणि बहुगुणनाच्या मार्गात अडथळा आणते ज्याची देवास आमच्या जीवनात इच्छा आहे. आत्म—रक्षणासाठी आमची इच्छा — देवाच्या आज्ञेचे पालन करण्याची किंमत चुकवून आपल्या जीवनांचे रक्षण करणे — आम्हास बहुगुणित होण्यापासून आणि देवाच्या राज्यासाठी फलवंत होण्याच्या मार्गात अडखळण आणील. जेव्हा आम्ही स्वत:साठी मरू, तेव्हा आम्ही फलवंत होऊ.

उदाहरणार्थ, आमच्या ख्रिस्ती सेवेत, देवाने अलौकिक क्षेत्रात आमचा उपयोग करावा यासाठी आम्हाला स्वत:च्या ख्यातीसाठी मरावे लागेल अथवा त्यास मुकावे लागेल. जितक्यांदा आम्ही स्वत:ला आत्म्याच्या स्वाधीन करतो, भविष्यवाणीत अथवा आत्म्याच्या कृपादानांत कार्य करण्यासाठी, तेव्हा आम्ही स्वसाठी मरतो. विश्वासाचे पाऊल पुढे टाकण्यासाठी आम्हाला स्वसाठी मरण्याची गरज आहे. आपण पूर्णपणे पवित्र आत्म्यावर अवलंबून आहोत. आम्ही आपली ख्याती धोक्यात टाकत आहोत कारण जर आपण चूक केली, तर खोटा संदेष्टा हे नाव मिळण्याचा धोखा आहे! तथापि, स्वला बाजूला ठेवण्यासाठी, बाहेर पाऊल टाकण्यासाठी, आणि आत्म्यामध्ये वावरण्यासाठी विश्वासाची गरज आहे. आमच्याद्वारे त्याची कृपादाने प्रवाहित व्हावी म्हणून, देवाच्या लोकांच्या गरजा पुरविता याव्या म्हणून त्यास संधी देण्यासाठी विश्वासाची गरज भासते. आत्म्यामध्ये प्रवाहित होण्यासाठी स्वत:स मरणे आवश्यक आहे. आत्म—रक्षणाची प्रवृत्ती परिणामत: पवित्र आत्मा आमच्यासाठी ज्या गोष्टीची इच्छा धरतो त्यास मर्यादित करते.

जेव्हा आम्ही स्वार्थाने प्रेरित होऊन बोलतो, तेव्हा आम्ही स्वत:ची ख्याती कायम करण्याचा आणि मनुष्यांद्वारे प्रशंसा प्राप्त करण्याचा प्रयत्न करीत असतो, आम्ही स्वत:चे गौरव शोधत असतो. जेव्हा आपण खरोखर देवास गौरव देण्याचा आणि केवळ त्याला गौरव देण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा आमची अंत:करणे शुद्ध असतात आणि आमच्याठायी कुठलाही अधर्म दिसून येत नाही.

**स्वत:स दीन करणे** (जेव्हा आम्ही स्वत:स दीन करतो तेव्हा आम्हास बरे वाटते)

स्वच्या भावनेचे अथवा स्वार्थभावनेचे दुसरे प्रकटीकरण जे आम्ही सांगितलेल्या स्वार्थाच्या पूर्वीच्या तीन प्रकटीकरणाच्या थोड्याफार विपरीत आहे, ते आहे स्वत:स दीन—हीन दाखविणे. नम्रता अत्यंत आवश्यक आहे. तथापि नम्रतेचे एक असे स्वरूप आहे जे खऱ्या नम्रतेसारखे दिसते, पण त्याचा जन्म स्वार्थातून झालेला असतो. याला आपण 'स्वत:स दीन करणे' म्हणतो — जेव्हा लोक स्वत:स हीन लेखितात तेव्हा त्याच्या मनात उत्पन्न होणारी भावना. जेव्हा ते स्वत:विषयी नम्रपणे बोलतात, गरीब असल्याबद्दल, कनिष्ठ असल्याबद्दल बोलतात, तेव्हा त्यांना बरे वाटते. **त्यांना वाईट वाटते** हे त्यांना बरे वाटते! त्यांना वाटते की हा नम्रपणा आहे आणि यासाठी देव त्यांचा स्वीकार करतो! उदाहरणार्थ, जेव्हा आम्ही गायिलेल्या उत्तम गीतांसाठी आमचे अभिनंदन केले जाते, तेव्हा आम्ही गाऊ शकतो ह्या सत्याचा नाकार करण्याऐवजी, ते अभिनंदन स्वीकार करण्यास आणि ती प्रशंसा देवाला देण्यास आम्हास समर्थ असण्याची गरज आहे! ही खोटी नम्रता ठरेल ज्यात स्वार्थ भरलेला आहे. त्याऐवजी, आपण शालीनतेने अभिनंदनाचा स्वीकार केला पाहिजे आणि देवाला गौरव दिला पाहिजे. ही आचरणाची योग्य पद्धत ठरेल.

**आम्ही स्वत: कोणतीही गोष्ट आपण होऊनच ठरविण्यास समर्थ आहो असे नव्हे, तर आमच्या अंगची पात्रता देवाकडून आलेली आहे** (२ करिंथ ३:५).

**तरी मला देवापासून प्राप्त झालेल्या कृपेमुळे मी तुम्हाला आठवण**

**देऊन थोडे बहुत अधिक धैर्याने लिहिले आहे; ती कृपा अशी की, मी परराष्ट्रीयांसाठी येशू ख्रिस्ताचा सेवक होऊन देवाच्या सुवार्तेचा याजक व्हावे; अशासाठी की, परराष्ट्रीय हेच अर्पण पवित्र आत्म्याने शुद्ध होऊन मान्य व्हावे. ह्यावरून देवाच्या गोष्टीसंबंधाने ख्रिस्त येशूविषयी मला अभिमान वाटतो. ख्रिस्ताने माझ्या हातून न घडविलेले काही सांगण्याचे धाडस मी करणार नाही; तर परराष्ट्रीयांनी आज्ञापालन करावे म्हणून त्याने माझ्या शब्दांनी व कृतींनी, चिन्हें व अद्‌भुते ह्यांच्या सामर्थ्याने, पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने जे जे घडविले तेच मी सांगतो; ते हे की, यरूशलेमेपासून सभोवती इल्लूरिकमापर्यंत मी ख्रिस्ताची सुवार्ता पूर्णपणे सांगितली आहे** (रोमकरास पत्र १५:१५—१९).

आम्हाला ही पूर्ण जाणीव आहे की आमची पर्याप्तता देवाकडून येते, परंतु आम्ही नम्रतेची बतावणी करता कामा नये जेथे आपण आम्हास देवाने दिलेली समर्थता, संसाधने, कृपादाने, पाचारणे आणि सेवा कबूल करावयास चुकतो. पौल असा व्यक्ती होता जो धैर्याने बोलत असे आणि त्याला या गोष्टीची जाणीव होती की देवाने त्याला आपण सेवक बनावयास पाचारण केले होते. देवाने त्याच्याद्वारे केलेल्या गोष्टींविषयी तो आढ्यतेने बोलत होता. तो नम्रतेचे खोटे पाखंड घेऊन वावरत नव्हता.

मोशेच्या स्वभावांत दोन चरम गोष्टी होत्या. जेव्हा त्याने प्रथमः सुरूवात केली, तेव्हा त्याला स्वतःवर प्रचंड आत्मविश्वास होता. फारोच्या राजदरबारी प्रशिक्षण मिळविल्यामुळे, मोशे "भाषणांत व कृतींत पराक्रमी होता." जेव्हा त्याला माहीत झाले की देवाने इब्री लोकांस मिस्र देशच्या गुलामीगिरीतून सोडविण्यासाठी उभे केले आहे, तेव्हा त्याने विचार केला की तो हे स्वतःच्या बळावर साध्य

करू शकतो. तो आत्मविश्वासाने प्रेरित होऊन आणि स्वत:वर भरवंसा ठेवून (प्रेषितांची कृत्ये ७:२२—२५) बाहेर पडला. देवाला ते दूर करावे लागले आणि मोशेला शेवटी रानात जाऊन राहावे लागले. चाळीस वर्षांनंतर, तो स्वत:स इतका "शुद्र" लेखू लागला की देव त्याच्याद्वारे जे करवून घेऊ इच्छित होता ते करावयास तो तयार होईना आणि आपण असमर्थ असल्याची सबब तो सांगू लागला. त्याने देवाला विनंती केली की त्याने आणखी कोणाला पाठवावे. यामुळे देव संतप्त झाला (निर्गम ४:१३,१४).

कधी कधी, नम्रतेची आमची बतावणी देवाला संतप्त करू शकते. आम्ही विचार करू शकतो की आम्ही नम्रपणा दाखवीत आहोत, पण आम्ही देवाला संतप्त करतो. देवाने जे आम्हाला दिले आहे ते कबूल करण्याची आम्हाला गरज आहे आणि आम्ही नम्रतेचे खोटे सोंग धरून चालता कामा नये. खोट्या नम्रतेच्या मुळाशी कुऱ्हाड घाला आणि देवावर विश्वास ठेवा!

## स्वत:साठी मरणे — प्रेषित पौलाची साक्ष

**मी ख्रिस्ताबरोबर वधस्तंभावर खिळलेला आहे; आणि ह्यापुढे मी जगतो असे नाही, तर ख्रिस्त माझ्याठायी जगतो; आणि आता देहामध्ये जे माझे जीवित आहे ते देवाच्या पुत्रावरील विश्वासाच्या योगाने आहे; त्याने माझ्यावर प्रीति केली व स्वत:ला माझ्याकरिता दिले** (गलती २:२०).

**कारण मला तर जगणे हे ख्रिस्त आणि मरणे हे लाभ आहे** (फिलिप्पै १:२१).

**तरी ज्या गोष्टी मला लाभाच्या होत्या त्या मी ख्रिस्तामुळे हानीच्या अशा समजलो आहे** (फिलिप्पै ३:७).

**कारण ख्रिस्ताची प्रीति आम्हाला आवरून धरते. आम्ही असे समजतो की, एक सर्वांसाठी मेला तर सर्व मेले; आणि तो सर्वांसाठी ह्याकरिता मेला की, जे जगतात त्यांनी पुढे स्वतःकरिता नव्हे तर त्यांच्यासाठी जो मेला व पुन्हा उठला त्याच्याकरिता जगावे** (२ करिथ. ५:१४,१५).

ख्रिस्ती ह्या नात्याने, आम्ही आता 'स्व' साठी जगत नाही. आपण त्याच्यासाठी जगतो ज्याने आपणावर प्रीती केली आणि आपणासाठी मरण पावला. 'आता मी नव्हे, तर ख्रिस्त माझ्याठायी जगतो' हा आमचा विषय आहे. याचा अर्थ हा की आपण स्वला बाजूला ठेवावयास तयार आहोत — स्वार्थी महत्वकांक्षा, स्वार्थी इच्छा, स्वतःची प्रगती, आत्मरक्षण इत्यादी, आणि अशा गोष्टी करण्याची निवड करतो ज्या आम्ही कराव्या असे प्रभुला वाटते.

**बंधुजनहो, ख्रिस्त येशू आपला प्रभु ह्याच्या ठायी मला तुम्हाविषयी जो अभिमान आहे त्याला स्मरून मी प्रतिज्ञेवर सांगतो की, मी रोज रोज मरतो. मनुष्यस्वभावाप्रमाणे म्हणावयाचे तर इफिसांत मी श्वापदाबरोबर लढाई केली ह्यांत मला काय लाभ? मेलेले उठविले जात नाहीत, 'तर चला, आपण खाऊ, पिऊ कारण उद्या मरावयाचे आहे.'** (१ करिंथ १५:३१,३२).

पौल म्हणतो, "मी रोज मरतो." तो वधस्तंभावर खिळलेले जीवन जगला. हे खरे होते की त्याचा छळ करणाऱ्यांमुळे दररोज त्याचे जीवन धोक्यात होते आणि मृत्यूच्या जवळ होते. आणि तरीही जे जीवन तो जगला, ते वधस्तंभावर खिळलेले जीवन होते. स्वचे मरण हे एक वेळची घटना नव्हे. आम्हाला दररोज आपला वधस्तंभ उचलावयाचा आहे (लूक ९:२३). कारण जर आपण तसे करीत नाही, तर आपण ख्रिस्ताचे शिष्य ठरू शकत नाही (लूक १४:२७).

आत्म—रक्षणासाठी आमची इच्छा — देवाच्या आज्ञेचे पालन करण्याची किंमत चुकवून आपल्या जीवनांचे रक्षण करणे — आम्हास बहुगुणित होण्यापासून आणि देवाच्या राज्यासाठी फलवंत होण्याच्या मार्गात अडखळण आणील.

वधस्तंभ उचलून चालण्याचा अर्थ काय आहे? कधीकधी आमचा वधस्तंभ उचलून चालण्याविषयी बोलतांना, लोक अशा व्यक्तीचे चित्र रंगवितात ज्याने जगाचा त्याग केला आहे आणि असे जीवन जगत आहे जणूकाही तो तपस्वी असावा. परंतु “वधस्तंभ उचलण्याचा” संबंध आमच्याजवळ बाहेर जे काही आहे त्याच्याऐवजी आम्ही आतून जे काय आहोत याच्याशी आहे. वधस्तंभ हे मरणाचे स्थान आहे. स्वत:साठी मरणे. एखादा व्यक्ती कुठल्याही भौतिक सुखांवाचून झोपड़ीत राहू शकतो, आणि तरीही हट्टी, स्वत:चा मताने चालणारा, आत्मकेंद्री, स्वार्थी अभिलाषा पूर्ण करणारा आणि स्वत:ला पुढे करण्याचा प्रयत्न करणारा असू शकतो. असे असेल, तर हे खरोखर “वधस्तंभ उचलून चालणे” नव्हे. दुसरा व्यक्ती चांगल्या घरात राहू शकतो, चांगली कार चालवू शकतो आणि तरीही स्वत:साठी खरोखर मेलेला असू शकतो. त्याचा स्वभाव नम्र आणि स्वार्थापासून मुक्त असू शकतो. म्हणून “वधस्तंभ उचलण्याचा” आणि “स्वत:साठी मरण्याचा” संबंध देवभक्ति आणि धर्मपरायणता यांच्या बाह्य स्वरूपापेक्षा, आम्ही आतून जे काही आहोत त्याच्याशी आहे.

**कारण आम्ही आपली घोषणा करीत नाही; तर ख्रिस्त येशू हा प्रभु आहे अशी आणि येशूप्रीत्यर्थ आम्ही तुमचे दास आहो अशी स्वत:ची घोषणा करितो** (२ करिंथ. ४:५).

आपण कोणाची घोषणा करीत आहोत, कोणास पुढे करीत आहोत आणि कोणाचे गौरव करीत आहो? आमचे किंवा येशूचे? सर्वच गोष्टींच्या अंती, जर लोक येशूऐवजी, आमच्याबद्दल बोलू लागतात, तर आम्ही खरोखर ख्रिस्ताचा प्रचार केलेला नाही. जर लोक येशूच्या जवळ येण्याऐवजी आमच्याकडे आकृष्ट होत असतील, तर आम्ही खरोखर ख्रिस्ताची सुवार्ता गाजविलेली नाही.

# रोजच्या जीवनाशी हे समर्पक करणे

## घरी पती व पत्नी या नात्याने

जितक्यांदा आम्ही आमचे अधिकार त्यागतो, उदाहरणार्थ सेवा मिळविण्याचा आमचा हक्क, आमचे ऐकून घेण्याचा हक्क — तितक्यांदा आम्ही स्वसाठी मरतो!

मोबदल्यात कुठलीही अपेक्षा न बाळगता देण्याची योग्यता वाढीस लावणे (लूक ६:३०).

सूड उगविण्याऐवजी क्षमा करण्याची पात्रता वाढविणे. पलटून वार करू नका.

मोबदल्यात कसलीही अपेक्षा न धरता प्रीती करण्याची योग्यता अंगी बाणा. आपणास असे म्हणता यावे की, “तू मजवर प्रीती करीत नसला, तरीही मी तुजवर प्रीती करतो.” ही खरी अगापे प्रीती आहे! अगापे प्रीती या गोष्टीवर अवलंबून राहत नाही की तिचा “प्रीतीचा हौद” नियमितपणे भरावा. अगापे प्रीतीचा उगम देवाठायी होतो आणि त्याची केवळ एकच “प्रेमभाषा” असते — मोबदल्यात कुठलीही अपेक्षा न करता प्रेम करण्याचे सामर्थ्य.

आपण काय देता किती स्पर्श करता, प्रशंसेचे शब्द अथवा असल्या काही गोष्टींवर अवलंबून नसते! ह्या इतर गोष्टी उत्तम आहेत आणि केल्या पाहिजेत, तरीही लक्षात ठेवा की आम्हाला देवासमान प्रीतित चालावयास पाचारण करण्यात आले आहे! अशा प्रकारचे प्रेम जे मोबदल्यात कसलीही अपेक्षा न करता प्रीती करते!

## घरी — आईवडील या नात्याने

आम्ही आपली स्वार्थी स्वप्ने आपल्या मुलांवर बळजबरीने लादता कामा नये. आमच्याजवळ देवाच्या ऐकण्याचे धैर्य असले पाहिजे आणि आपल्या मुलांस त्यांच्या जीवनावरील देवाचे अद्वितीय पाचरण पूर्ण करण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे. आमच्या मुलांच्या जीवनांद्वारे आपली स्वप्ने पूर्ण करण्याचा आपण प्रयत्न करण्याची चूक करता कामा नये. हा स्वार्थ ठरेल. आपण आपल्या मुलांस त्यांच्या जीवनांसाठी देवाची स्वप्ने पूर्ण करण्याची संधी देऊ या. आम्ही आपल्या मुलांद्वारे 'दुसरे' जीवन जगण्याचा प्रयत्न करू नये.

## घरी — मुले या नात्याने

हट्टी आणि बंडखोर होऊ नका. आज्ञापालन करणे शिकण्याद्वारे स्वसाठी मरावयास तयार असा!

आपल्या स्वत:च्या गरजा आणि भावना यांत गुरफटून राहण्याऐवजी आपल्या आईवडिलांचा भावनांचा आणि गरजांचा विचार करा!

## शाळेत/कालेजात (किशोर/विशीतील मुले)

आपल्या जोडीदारांसोबत प्रेमाने वागा. सूड घेण्याऐवजी प्रेम करा आणि क्षमा करा.

आणखी कोणासाठी तरी आपली संधी सोडून द्या. ती संधी बी म्हणून पेरा आणि आपल्या प्रतिफळासाठी देवावर विश्वास ठेवा!

## कामाच्या ठिकाणी

आपल्याच कल्पनांचा आग्रह करण्याऐवजी आधीन होण्यास शिकू या.

आपण आपले दोष कबूल करू या. आपण असे म्हणण्यास भिता कामा नये की आम्ही चुकलो होतो. आपण क्षमा करावयास धैर्य दाखवा. जेव्हा आम्ही आपल्या अंहकाराचा नाश करतो, तेव्हा आम्ही स्वत:साठी हजार मृत्यू मरतो.

## मंडळीत

आम्ही पद, श्रेष्ठता आणि मान्यतेसाठी मंडळीत एकमेकांशी स्पर्धा करता कामा नये. जे काही आपण करतो, ते आपण नि:स्वार्थ सेवकाच्या अंत:करणाने करू या. आपण लक्षात ठेवू या की जर आपण स्वत:ला उंचविण्याचा प्रयत्न केला, तर आपण तुच्छ ठरू, पण जर आम्ही स्वत:ला नम्र केले, तर आम्ही उंचविले जाऊ (लूक १४:७—११).

आम्ही स्वत:ला, आमची प्रतिभाशक्ती, आमची कृपादाने, अभिषेक अथवा मंडळीतील पाचारण यांस पुढे दामटण्याचा प्रयत्न

करता कामा नये. आपण येशूचे आणि जे काही आपण बोलतो आणि करतो त्यात येशूचे गौरव करू या.

इतरांनी आपले ऐकावे, आपणास पाहावे, मान्यता द्यावी आणि स्वीकार करावे, ही इच्छा मारून टाकू या. स्वतःच्या महत्वाची आमची गरज आपण मारू टाकून या. आमच्या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात देवाला श्रेष्ठत्व दिले जावे.

देवाने अलौकिक दृष्ट्या आमचा उपयोग करावा म्हणून आम्ही आपल्या प्रसिद्धीस मेले पाहिजे.

## सेवेत

ज्या पतींना सेवेसाठी पाचारण करण्यात आले आहे त्यांनी सावध असले पाहिजे की त्यांनी आपल्या पत्नीला तिच्या जीवनावरील तिचे पाचारण सोडून सेवेत त्याचे अनुसरण करावयास बळजबरी करता कामा नये, विशेषेकरून जर त्यांस सेवेचे पाचारण असल्याचे वाटत नसेल तर. असे करणे स्वार्थीपणाचे ठरेल. त्याऐवजी, पत्नींस त्यांच्या जीवनांवरील देवाच्या पाचारणाचे अनुसरण करण्याची संधी व प्रोत्साहन दिले जावे, जरी त्या व्यावसायिक जगात असल्या तरीही.

आम्ही ज्यांस भौतिक सुखांची सवय झालेली असते, जेव्हा गावांत सेवा करावयास बाहेर जातो, तेव्हा आपण तेथे देण्यात आलेल्या सोयींशी जुळते करून घेण्याचा, सामंजस्य साधण्याचा आणि समाधानी राहण्याचा प्रयत्न करावा. आपण सुखाची मागणी करता कामा नये. जरी आमच्या शरीरासाठी हे कठीण असले, तरीही स्वसाठी मरण्याची ही उत्तम संधी ठरेल!

## पश्चाताप आणि स्वसाठी मरणे

जरी आपण देवाठायी उच्च क्षेत्रात प्रवास करू इच्छित असलो, तरीही आपण प्रथम अशा गोष्टींपासून दूर होण्याचा प्रयत्न करावा ज्या आम्हास तेथे जाण्याच्या मार्गात अडखळण आणीत आहेत. आम्ही अशा स्थितीत येऊन पोहोचले पाहिजे जेथे आम्ही स्वपासून दूर झालेले असावे. जर आम्ही स्वार्थात मुळावलेले राहू, तर आपण देवास योग्य ते गौरव देऊ शकणार नाही. “म्हणजे देवासमोर कोणीही मनुष्याने अभिमान बाळगू नये” (१ करिंथ. १:२९). आपण बापतिस्मा करणाऱ्या योहानासमान बनावे आणि असे म्हणावयास तयार असावे की, “त्याची वृद्धि व्हावी व माझा ऱ्हास व्हावा हे अवश्य आहे” (योहान ३:३०). आपण देवास मुभा द्यावी की त्याने आमच्या अंत:करणाच्या खोल भागांतील विचार पाहावे आणि तपास घ्यावा की आमची कामे स्वार्थाने प्रेरित तर नाहीत. “हे देवा, माझी झडती घेऊन माझे हृदय जाण; मला कसोटीस लावून माझे मनोगत जाण. माझ्या ठायी दुष्टपणाकडे काही प्रवृत्ती असेल तर पाहा; आणि मला सनातन मार्गाने चालीव” (स्तोत्र १३९:२३, २४). आपण आपले हेतू तपासून पाहावे. जर आपले हेतू स्वत:ची वाढ, स्वार्थी महत्वाकांक्षा अथवा आत्मरक्षण यांतून उद्‌भवले असतील, तर आपण स्वत:स थांबवू या. आपण आमच्या जीवनातील स्वार्थाच्या मुळांस दूर न करता पुढे जाण्याचा प्रयत्न देखील करता कामा नये. आपण प्रभुस विनंती करू या की त्याने आमची अंत:करणे बदलून टाकावी.

**आपण स्वार्थाचे मूळ उपटून टाकू या: आपण आपले चुकीचे हेतू, श्रेष्ठत्वाची आमची इच्छा, स्वार्थी महत्वाकांक्षा**

**आणि स्वार्थाचा पाठपुरावा यांस वधस्तंभावर खिळावे.** आपण देवासमोर प्रामाणिक असू या आणि पवित्र आत्म्यास संधी देऊ या की त्याने आमच्या जीवनात शुद्धीकरणाचे सखोल कार्य करावे.

## प्रार्थना

*पित्या, मी कबूल करतो की माझे हेतू नेहमीच शुद्ध नव्हते. अशी वेळ होती जेव्हा स्वतःला पुढे करण्याची मी इच्छा धरली. अशी वेळ होती जेव्हा मी केवळ तुझ्या मालकीच्या गौरवास स्पर्श केला. अशी वेळ होती जेव्हा मी माझ्यासाठी असलेल्या तुझ्या योजना आणि हेतू मान्य करावयास चुकलो आणि त्याऐवजी माझ्या स्वतःच्या स्वार्थी हितांचा पाठपुरावा केला.*

*पित्या, मी स्वार्थापासून मुक्त असे जीवन जगण्याची इच्छा धरतो. प्रभु, मी प्रार्थना करतो की तू माझ्यामधील स्वार्थाच्या मुळावर वार कर. स्वार्थासाठी मरण्यात आणि तुझ्यासाठी जगण्यात माझी मदत कर.*

*माझे हेतू शुद्ध कर. मला कृपा दे की मी स्वतःला नम्र करावे, हे जाणून की तू योग्य वेळी मला उंचविशील. मी मनुष्यांची प्रशंसा मिळविण्याचा प्रयत्न करता कामा नये, तर केवळ तुझ्याद्वारे प्राप्त होणारा मान मिळविण्याचा यत्न करावा.*

*पित्या, मी तुझे उपकारस्तवन करतो की तू तुझ्या आत्म्याद्वारे मजमध्ये कार्य करीत आहेस. येशूच्या नावात, आमेन!*

# मुळावर कुऱ्हाडीचा वार



स्वार्थ • मत्सर • गर्व • वासना

# प्रकरण २

# मत्सराच्या मुळावर कुऱ्हाडीचा वार

'मत्सर' या शब्दासाठी दुसरा शब्द आहे 'हेवा.' जीवनात काही गोष्टी अशा असतात ज्या आमच्यासाठी फार धोकादायक असू शकतात आणि त्यापैकी एक गोष्ट आहे मत्सर. आमच्यापैकी अनेकांस हे समजत नाही की ही समस्या किती गंभीर असू शकते. आम्ही कधीकधी त्याला व्यक्तिमत्वाची समस्या म्हणून टाळून देतो. तथापि, ती यापेक्षाही मोठी समस्या आहे आणि तिच्याशी गंभीरपणे व्यवहार करणे जरूरी आहे. ह्या प्रकरणात, आम्ही हे समजण्याची इच्छा धरतो की मत्सर काय आहे, त्याचा गंभीरपणा आणि त्याच्याशी व्यवहार कसा करावा. देवाचे वचन मत्सर काय आहे हे स्पष्टपणे समजण्यात आमची मदत करील. आम्हाला पवित्र आत्म्यास संधी द्यावी लागेल की त्याने हा मत्सर मुळापासून उपटून काढावा जेणेकरून आमच्यापैकी प्रत्येकाला त्यापासून खरोखर स्वतंत्र होता यावे.

**देहाची कर्मे तर उघड आहेत; ती ही जारकर्म, अशुद्धपणा, कामातुरपणा, मूर्तिपूजा, चेटके, वैर, कलह, मत्सर, राग, तट, फुटी, पक्षभेद, हेवा, दारूबाजी, रंगेलपणा आणि अशा इतर गोष्टी; ह्याविषयी मी तुम्हाला पूर्वी जे सांगून ठेवले होते तेच आता सांगून ठेवतो की, अशी कर्मे करणाऱ्यांना देवाच्या राज्याचे वतन मिळणार नाही** (गलती ५:१९—२१).

मत्सर आणि हेवा या दोन्ही गोष्टींचा वरील वचनात उल्लेख

करण्यात आला आहे. जेव्हा आम्ही वाचतो की जे मत्सर आणि हेवा करतात, त्यांना “देवाच्या राज्याचे वतन मिळणार नाही” तेव्हा आम्हाला या गोष्टींचा गंभीरपणा कळून येतो. हा फार गंभीर विषय आहे आणि म्हणून आम्ही त्याला तोंड दिले पाहिजे.

आम्हाला सर्वत्र मत्सरास तोंड द्यावे लागते — भावंडांत, पती आणि पत्नीमध्ये, मालक, कर्मचारी इत्यादी. मित्रांत आणि सोबत्यांत सुद्धा मत्सर असू शकतो. देवाच्या लोकांत आणि देवाच्या सेवकांत सुद्धा, मंडळीत मत्सर आढळून येतो.

## मत्सरास तोंड द्यावे लागेल

**कारण तुम्ही अजूनही दैहिक आहा; ज्याअर्थी तुमच्यामध्ये हेवा व कलह आहेत, त्याअर्थी तुमच्यामध्ये हेवा व कलह आहेत, व मानवी रीतीने चालता की नाही?** (१ करिंथ. ३:३).

येथे, पौल आत्म्याने युक्त, अन्यान्य भाषा बोलणाऱ्या लोकांस उद्देशून बोलत आहे — जे आत्म्यामध्ये वावरणे जाणतात — आणि त्यांस ‘देह स्वभावाचे’ म्हणतो कारण त्यांच्यात हेवा, कलह, आणि मत्सर आहे. ह्या लोकांवर अद्याप देहस्वभावाची सत्ता होती.

**कित्येक हेव्याने व वैरभावाने ख्रिस्ताची घोषणा करितात; आणि कित्येक सद्भावाने करितात; पण इतर आहेत ते माझी बंधने अधिक संकटाची व्हावी अशा इच्छेने तट पाडण्याकरिता दुजाभावाने ख्रिस्ताची घोषणा करतात** (फिलिप्पै. १:१५,१७).

पौल आम्हाला सांगतो की ख्रिस्ताची घोषणा करण्यासारखे आध्यात्मिक कार्यसुद्धा मत्सराने केले जाऊ शकते. जरी ख्रिस्ताची

सुवार्ता सांगणे चांगली गोष्ट आहे, तरीही जेव्हा ती मत्सराने प्रेरित असते तेव्हा ती देवाच्या दृष्टीत योग्य ठरत नाही. आणखी कोणी दूरदर्शन आहे म्हणून मी देखील दूरदर्शनवर असले पाहिजे हे दूरदर्शनवर येण्याचे एखाद्या प्रचारकाचे मूळ कारण असेल, तर त्याचा हेतू चुकीचा आहे. देवासाठी उत्साही असतांनाही आणि त्याच्या वचनाची घोषणा करण्याची इच्छा असतांनाही, जर हेतू मत्सर असेल, तर ही गोष्ट फार धोक्याची आहे. मत्सर अथवा हेवा हे देहाचे काम आहे आणि मत्सराने प्रेरित होऊन जे काही केले जाते — ते कितीही आध्यात्मिक असले — तरी ते देवास प्रसन्न करू शकत नाही कारण, रोमकरांस पत्र ८:८ म्हणते, “जे देहाच्या अधीन आहेत त्यांना देवाला प्रसन्न करिता येत नाही.”

गणना ५:१४ पती आणि पत्नीमध्ये मत्सराच्या आत्म्याविषयी बोलते. (म्हणून, कधी कधी मत्सराच्या आत्म्याने प्रेरित असल्यामुळे त्याचे मूळ सैतानी असू शकते.)

## बायबलमध्ये मत्सर

बायबलमध्ये मत्सराची अनेक उदाहरणे आहेत.

## काईन आणि हाबेल

काईन आणि हाबेलाचे व्यवसाय वेगवेगळे होते. काईन शेतकरी होता, तर हाबेल मेंढपाळ होता. दोघे प्रभुसाठी अर्पण घेऊन आलेत. काईन भूमीचे उत्पन्न अर्पण म्हणून घेऊन आला आणि हाबेल अर्पण म्हणून प्राण्यास घेऊन आला. प्रभुने हाबेलाच्या अर्पणाचा स्वीकार केला ज्यामुळे काईनाच्या मनात मत्सर उत्पन्न

झाला. बायबल म्हणते की काईन रागावला आणि त्याचा मनात हेवा उत्पन्न झाला आणि परिणामत: त्याने आपल्या भावाचा वध केला (उत्पत्ति ४:१—९).

## योसेफ आणि त्याचे भाऊ

जरी याकोबाला १२ मुले होती, तरीही तो योसेफावर सर्वात जास्त प्रीती करीत असे, ज्यामुळे इतर भाऊ त्याचा हेवा करू लागले. आईवडिलांस हा इशारा आहे की त्यांनी ह्या गोष्टीची खात्री करून घ्यावी की त्यांनी आपल्या मुलांशी नि:पक्षपाती वर्तन करावे, पक्षपात करू नये, कारण त्यामुळे भावंडांत मत्सर उत्पन्न होऊ शकतो. याकोबाने योसेफासाठी रंगबिरंगी पोशाक बनविला. याशिवाय योसेफाला अशी स्वप्ने दिसली ज्यात त्याला भविष्यात मिळणारे मानाचे स्थान त्याने पाहिले. या सर्व गोष्टींमुळे योसेफाचे भाऊ त्याचा अत्यंत हेवा करू लागले, इतके की त्यांनी त्याला मारून टाकण्याचे ठरविले. देवाच्या हस्तक्षेपाने, योसेफ मिसर देशास जाऊन पोहोचला (उत्पत्ति ३७:३,४,८; प्रेषितांची कृत्ये ७:९).

## शौल आणि दावीद

१ शमुवेल १८:५—३० या वचनांत राजा शौल आणि दावीद यांच्यात उत्पन्न मत्सराचे वर्णन केलेले आहे. दावीद फक्त मेंढ़पाळ मुलगा होता, तरीही त्याने देवाच्या मदतीने गल्याथाला मारले. जेव्हा दावीद युद्धाच्या मैदानावरून परतला, तेव्हा लोक दावीद आणि शौल यांच्या प्रशंसेचे गीत गाऊ लागले. ते म्हणू लागले की शौलाने हजारांस मारले, पण दावीदाने दहा हजारांस मारले. शौलाला हेवा वाटू लागला कारण लोकांनी दाविदाला अधिक मान

दिला होता. शौलाच्या अंत:करणात मत्सराचे हे पहिले बीज होते ज्यामुळे तो अशा ठिकाणी येऊन पोहोचला जेथे दाविदाचा वध करण्याची इच्छा त्याचा मनात उत्पन्न झाली. शौल दाविदाचा वध करण्याचा बेत आखू लागला. त्याने दाविदास त्याच्या सैन्याचा सेनापती बनविले जेणेकरून त्याने युद्धात आघाडीवर राहावे. दाविदाने मारले जावे याची खात्री करून घेण्यासाठी, त्याने हजार पलिष्ट्यांस घात करण्याच्या मोबदल्यात आपली कन्या देऊ केली.

काही लोकांस त्यांच्या कामाच्या ठिकाणी मत्सराला तोंड द्यावे लागते. ज्या मॅनेजरपुढे त्यांना जावे लागते तो त्यांच्या जीवनात “राजा शौल” असू शकतो. मॅनेजरला असुरक्षित वाटते की त्याच्या हाताखालचा कर्मचारी उत्तम काम करतो अथवा त्याला भीती वाटते की त्याच्या हाताखालचा कर्मचारी त्याच्यापेक्षा जास्त काम करील. परिणामत: मॅनेजरच्या मनात हेवा उत्पन्न होतो. त्याचा परिणाम म्हणून, मॅनेजर ईर्ष्येने अथवा उद्दामपणे वागू लागतो, त्याच्या हाताखालील कर्मचाऱ्याच्या मनात प्रश्न उत्पन्न होतो, त्याने काय चूक केली असावी.

१ शमूवेल १८ मध्ये, आपण वारंवार पाहतो की दावीद बुद्धिमत्तेने वागला. त्याने सूड घेतला नाही अथवा शौलाला त्याची जागा दाखवून देण्याची गरज त्याला भासली नाही. त्याऐवजी तो बुद्धिमत्तेने वागला आणि देवाने हस्तक्षेप केला आणि त्याच्या परिस्थितीकडे लक्ष दिले. जर आपल्या कामाच्या ठिकाणी आपणास मत्सरास तोंड द्यावे लागत असेल, तर सूड न घेणे हे बुद्धिमत्तेचे ठरेल. शहाणपणाने वागावे. देव हस्तक्षेप करील — तो अवश्य हस्तक्षेप करील!

मत्सर अथवा हेवा हे देहाचे काम आहे आणि मत्सराने प्रेरित होऊन जे काही केले जाते — ते कितीही आध्यात्मिक असले — तरी ते देवास प्रसन्न करू शकत नाही कारण, रोमकरांस पत्र ८:८ म्हणते, “जे देहाच्या अधीन आहेत त्यांना देवाला प्रसन्न करिता येत नाही.”

## मत्सरास तोंड देणे

मत्सरास तोंड देण्याचा प्रयत्न करण्यापूर्वी, आपण पहिले हे कबूल केले पाहिजे की आमच्या अंत:करणात मत्सर राहता कामा नये. आमच्यापैकी बहुतेक लोक आपला हेवा अथवा मत्सर लपवितात. उदाहरणार्थ, जर एखादा मित्र आम्हाला सांगतो की त्याने एक विशेष प्रकारची कार घेतली आहे जी आम्हाला वाटते की आमच्यापेक्षा उत्तम आहे, तर आम्हाला थोडा हेवा वाटू लागतो. हे कबूल करणे योग्य ठरेल की आमच्या मनात मत्सर आहे आणि आम्ही तो असे म्हणून लपविण्याऐवजी त्यागला पाहिजे की, “देवाची स्तुती असो, भाऊ!” आम्ही मनापासून असे म्हणत नसू अथवा खरोखर त्याच्याबरोबर आनंदित होत नसू. आमच्यासाठी त्या नकार भावनेतून बाहेर पडणे महत्वाचे आहे. नकाराद्वारे मत्सराची भावना लपविणे त्या समस्येस संबोधित करण्यात आमची मदत करणार नाही. त्याऐवजी, आम्ही देवासमोर प्रामाणिक असले पाहिजे. आम्ही देवास विनंती करू शकतो की त्याने मत्सरापासून आम्हास सुटका देण्यात मदत करावी आणि तो तसे करील. तथापि जर आम्ही नकारात्मक भावनेत वागत राहिलो, तर त्याद्वारे आम्ही देवास हस्तक्षेप करण्याचे दार बंद करू आणि तो आमची मदत करू शकत नाही.

# मत्सराचे प्रगट रूप

## खून

मत्सर भावनेने पेटून काईनाने हाबेलाचा खून केला (उत्पत्ति ४:८). जरी आमच्यापैकी अनेक जण लगेच असे म्हणतील की आमच्यात काईनाची खूनी भावना नाही, तरीही खालील वचने आम्हास पुन्हा विचार करण्यास भाग पाडतील.

**'खून करु नको', आणि जो कोणी खून करील तो न्यायसभेच्या दंडास पात्र होईल, असे प्राचीन लोकांना सांगितले होते, हे तुम्ही ऐकले आहे. मी तर तुम्हास सांगतो, जो कोणी आपल्या भावावर (उगाच) रागावेल तो न्यायसभेच्या शिक्षेस पात्र होईल; जो कोणी आपल्या भावाला, अरे वेडगळा, असे म्हणेल तो वरिष्ठ सभेच्या शिक्षेस पात्र होईल आणि जो कोणी त्याला अरे मूर्खा, असे म्हणेल, तो नरकाग्नीच्या शिक्षेस पात्र होईल** (मत्तय ५:२१,२२).

**जो कोणी आपल्या बंधूंचा द्वेष करितो तो नरहिंसक आहे; आणि कोणाही नरहिंसकाच्या ठायी सार्वकालिक जीवन राहत नाही, हे तुम्हास माहीत आहे** (१ योहान ३:१५).

येशूने म्हटले की जर आम्ही विनाकारण एखाद्यावर रागावलेले असू, तर आम्ही खूनी व्यक्तीसमान आहोत. जेव्हा मी दुसऱ्याचा हेवा करतो, तेव्हा मी खूनी ठरतो.

## संतापाचा उद्रेक

**कारण ईर्ष्या पुरुषास संतप्त करिते; सूड उगवण्याच्या दिवशी तो गय करणार नाही** (नीतिसूत्रे ६:३४).

येथे संदर्भ अशा पत्नीचा आहे जिने व्यभिचार केला आहे आणि जिचा पति संतापला आहे. मत्सराने ह्या पतीस संतप्त केले आहे. अशी परिस्थिती असू शकते ज्यामुळे पती संतप्त होतो. बरेचदा, संतापाचा उद्रेक मत्सराचे मूळ फोफावल्यामुळे असू शकतो. आपल्या जोडीदारांसबंधाने संतप्त होण्याबाबत पती व पत्नीने स्वत:चे परीक्षण केले पाहिजे. कदाचित संताप उद्‌भवण्याचे मूळ कारण हेवा अथवा मत्सर असू शकते. हा मत्सर या गोष्टीमुळे पेटला असेल की पत्नी काही हजार रुपये अधिक कमवीत असेल आणि पती तिची बरोबरी करण्याचा आटोकाट प्रयत्न करीत असेल. ही न्यूनगंडाची भावना पतीमध्ये बऱ्याच दिवसांपासून घर करू लागते आणि मग अचानक संतापाचा विस्फोट होतो.

जेव्हा आम्ही सामूहिकरित्या एकत्र येतो, तेव्हा आम्ही मोठ्या सामर्थ्याने देवाची उपासना करीत असू, पण हा प्रश्न विचारावयाचा उरतो, आमच्या घरी एकातांत असतांना आम्ही कसे वागतो? आम्ही आपल्या जोडीदारांस कसे वागवितो? आम्ही घरच्या परिस्थितीप्रत कशी प्रतिक्रिया जाहीर करतो? ह्या प्रश्नांची उत्तरे मत्सराचे मूळ अस्तित्वात असल्याचे द्योतक आहेत!

## सूड उगविणे

**प्रियजनहो, सूड उगवू नका, तर देवाच्या क्रोधाला वाट द्या; कारण असा शास्त्रलेख आहे की, ‘सूड घेणे माझ्याकडे आहे, मी फेड करीन,’ असे प्रभु म्हणतो. उलटपक्षी, ‘तुझा शत्रू भुकेला असल्यास त्याला खावयाला दे; तान्हेला असल्यास त्याला प्यावयाला दे; कारण असे केल्याने तू त्याच्या मस्तकावर निखाऱ्याची रास करिशील.वाइटाने जिंकला जाऊ नको, तर बऱ्याने वाइटाला जिंक** (रोम १२:१९—२१).

बायबल आम्हास सांगते की आम्ही सूड उगविता कामा नये. हा विचार १ थेस्सल. ५:१५ मध्ये व्यक्त करण्यात आला आहे, “कोणी कोणाचे वाइटाबद्दल वाईट करू नये म्हणून जपून राहा, आणि सर्वदा एकमेकांचे व सर्वांचे चांगले करीत राहा.”

आम्ही स्वत:विषयी सूड घेण्याच्या प्रकृष्ट मार्गांचा अवलंब करीत असू. आमची कृत्ये उघडपणे सूड घेणारी वाटत नसावी. तरीही आम्ही आमची अंत:करणे देवापासून लपवू शकत नाही. घरातील एखाद्या व्यक्तीचा सूड घेण्यासाठी, आम्ही त्याच्याशी बोलण्यास नाकार देत असू, कॉफी पिण्यास नाकार देत असू, अथवा कपडे इस्त्री करण्यास नाकार देत असू; कामाच्या ठिकाणी आम्ही इतरांपासून महत्वाची माहिती लपवून ठेवीत असू. अशाप्रकारचे वर्तन पाळकांत आणि देवाच्या वचनांचा प्रचार करणाऱ्यातही दिसून येते. उदाहरणार्थ, पाळकास त्याच्या सोबतच्या सेवकाने सभेचे निमंत्रण दिले, पण त्याला असे वाटू लागले की सभेत त्याला पुरेशे मानाचे स्थान मिळाले नाही. म्हणून आता ज्या पाळकाला वाटले की त्याच्याशी “योग्य वर्तन” करण्यात आले नाही, तो गुप्तपणे सूड घेण्याच्या विचाराने दुसऱ्या सेवकास त्याने आयोजित केलेल्या सभेस निमंत्रण देतो आणि हळूच त्याच्याशी त्याचप्रकारचे अथवा त्याहीपेक्षा वाईट वर्तन करतो! अशाप्रकारच्या वर्तनाचे मूळ कारण आहे मत्सराचा आत्मा.

## निर्दयता, दुर्भावना, राग

**क्रोधाची निष्ठुरता व कोपाचा तडाखा ही पुरवली, पण प्रेमसंशयापुढे कोण टिकेल?** (नीतिसूत्रे २७:४).

जर राग अथवा क्रोध क्रूर आहे, तर मत्सर त्यापेक्षा दुप्पट क्रूर

आहे. लोकांशी निर्दयीपणे अथवा रागाने वागणे कधी कधी मत्सरामुळे असते. गीतरत्न ८:६ ब म्हणते, “प्रेम मृत्यूसारखे प्रबळ आहे; प्रेमसंशय अधोलोकासारखा निष्ठूर आहे; त्याची ज्वाला अग्नीज्वालेसारखी, किंबहूना परमेश्वराने प्रदीप्त केलेला तो अग्नीच आहे.” मत्सर हा कबरेइतका क्रूर असतो. म्हणून कधी कधी लोकांशी आमचे उर्मटपणाचे आणि निर्दयी वर्तन मत्सरामुळे असू शकते. आम्ही फक्त वागणूक बदलण्याचा प्रयत्न करता कामा नये, तर त्याचे मूळ कारण दूर करावे. भावडांत निर्दयीपणाचे मूळ कारण मत्सर असू शकते.

## फूट

याचे कारण देखील मत्सर आहे. अनेकदा फूट यामुळे पडते कारण एखाद्या व्यक्तीच्या अंतःकरणात मत्सर असतो. सरतेशेवटी तो पसरत जातो आणि त्याचा परिणाम कलह आणि फूट यांत होतो.

## अत्यंत स्पर्धालू वृत्ती

योग्य ठिकाणी स्वस्थ स्पर्धा उत्तम आहे. उदाहरणार्थ, खेळाच्या मैदानावर, स्पर्धा करणे आणि विजयाची इच्छा धरणे अगदी बरोबर आहे. आटोकाट प्रयत्न करून इतरांवर मात करण्याची आपण इच्छा धरता. अशाप्रकारची स्पर्धा चांगली असते आणि ती आम्हास पुढे जाण्याची क्षमता देते. परंतु बरेचदा आपण ही चूक करतो की आपण अशाप्रकारची स्पर्धा देवाच्या घरात नेऊन तेथे उपद्रव माजवितो. आम्ही आमच्या आध्यात्मिक जीवनातही एकमेकांशी स्पर्धा करू लागतो. उदाहरणार्थ, एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीपेक्षा जास्त दिवसांचा उपवास करू इच्छितो — जो केवळ स्पर्धेच्या

आत्म्याने प्रेरित असतो. दुसरा व्यक्ती जे काही करीत आहे त्यापेक्षा मोठे असे आम्ही करू इच्छितो. पराकाष्ठेची आध्यात्मिक स्पर्धा वरकरणी पाहता मोठ्या आध्यात्मिक लक्ष्यांचा पाठपुरावा करण्यास प्रेरित करते. तथापि, ह्या गोष्टी देवाच्या दृष्टीत प्रसन्नतादायक नसतात कारण त्या मत्सराने प्रेरित असतात.

## कलह आणि वाद

आपण नीतिसूत्रे १०:१२ मध्ये पाहतो की, “द्वेष कलह उत्पन्न करतो.” ह्या द्वेषाचा जन्म मत्सरामुळे होऊ शकतो ज्याचा परिणाम कलहात घडून येतो.

## तुटकपणा, स्वतंत्र प्रवृत्ती आणि असुरक्षितपणा

मत्सर असुरक्षितपणा उत्पन्न करतो आणि त्यामुळे व्यक्ती स्वतःस इतरांपासून वेगळे करतो आणि स्वतंत्र होतो. उदाहरणार्थ, काही पाळक आपल्या मंडळीस निर्देश देतात की त्यांनी इतर पाळकांपासून, सेवासंस्थांपासून आणि इतर विश्वासणाऱ्यांपासून वेगळे राहावे. याचे कारण बरेचदा असुरक्षितपणाची भावना असते जिचा उगम मत्सर भावनेपासून होतो. देवाच्या लोकांस इतर खऱ्या सेवकांपासून प्राप्त करण्याचे आणि त्यांच्या स्थानिक मंडळीत नसलेल्या इतर विश्वासणाऱ्यांसोबत सहभागित्व करण्याचे स्वातंत्र्य असते.

## गरजेपेक्षा जास्त संरक्षण

कधी कधी जी गोष्ट खरी कळकळ असल्यासारखे वाटते, ती खरे म्हणजे गरजेपेक्षा जास्त संरक्षणाचे कार्य असते आणि त्याचा जन्म मत्सरामुळे होऊ शकतो. उदाहरणार्थ, पती आपल्या व्यावसायिकदृष्ट्या

कुशल पत्नीला ह्या निमित्ताने घरी राहावयास सांगतो की तो संपूर्ण कुटुंबाच्या गरजांकडे लक्ष पुरवील. तथापि, ही अति सुरक्षिततेची भावना मत्सराच्या मुळापासून उद्‌भवू शकते जेथे पतीला खरोखर आपल्या पत्नीचा हेवा वाटतो. शक्यत: त्याला हेवा वाटतो की ती कामाच्या ठिकाणी इतर पुरुषांशी बोलेल. कदाचित तो असुरक्षित आहे की ती त्याच्यापेक्षा जास्त कमवील. म्हणून अति सुरक्षितपणाचे वर्तन मत्सरामुळे असण्याची शक्यता असू शकते.

### क्षुल्लकपणा

बरेचदा, लहानशा गोष्टी मोठ्या समस्यांस कारणीभूत ठरतात आणि राईचा पहाड होतो, ज्याचे कारण मत्सराची भावना असू शकते.

पराकाष्ठेची आध्यात्मिक स्पर्धा वरकरणी पाहता मोठ्या आध्यात्मिक लक्ष्यांचा पाठपुरावा करण्यास प्रेरित करते. तथापि, ह्या गोष्टी देवाच्या दृष्टीत प्रसन्नतादायक नसतात कारण त्या मत्सराने प्रेरित असतात.

## मत्सराचे परिणाम

आपल्या अंत:करणात मत्सराला जागा देण्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात. जेव्हा आम्हाला मत्सराचे परिणाम समजून येतात, तेव्हा आपण मत्सराच्या मुळावर कुऱ्हाडीचा वार करावयास लगेच तयार होतो.

### मत्सर विध्वंसक आहे

मत्सर मारतो! “मूर्ख तर चिंता करुन करून नाश पावतो; वेडा मत्सराने मरतो” (ईयोब ५:२). आपण फार काळ इजा झाल्यावाचून

मत्सरात जगू शकत नाही. मत्सरभावना हळूवारपणे परंतु निश्चितच त्या व्यक्तीचा नाश करते ज्याच्या मनात ती राहते.

## मत्सराचा परिणाम आमच्या आरोग्यावर होतो

“शांत अंत:करण देहाचे जीवन आहे, पण मत्सराने हाडे कुजतात” (नीतिसूत्रे १४:३०). अंत:करणातजील मत्सर आमच्या शारीरिक आणि भावनात्मक आरोग्यावर परिणाम घडवून आणतो. कधीकधी, जेव्हा लोक शारीरिक रोगांनी पीडित असतात, त्याच्या मुळाशी मत्सर हे कारण असते.

## मत्सर आमची दृष्टी अंधूक करतो, आम्ही आपले लक्ष गमावून बसतो

मत्सर आमची दृष्टी अंधूक करतो, आम्ही आपले लक्ष्य गमावून बसतो आणि आमचे लक्ष्य विचलित होते. “पातक्यांचा हेवा करू नको, तर परमेश्वराचे भय अहर्निश बाळग” (नीतिसूत्रे २३:१७). उदाहरणार्थ, आमच्या कामाच्या ठिकाणी जेव्हा आम्ही अशा लोकांस पाहतो ज्यांस देवाची भीती नसते आणि तरीही ते समृद्ध असते, तेव्हा आपण सावध असले पाहिजे की आपण त्यांचा हेवा कामा करता नये. जे लोक अनीतिमान आहेत आणि तरीही स्पष्टपणे समृद्ध असतात त्यांचा हेवा केल्याने आम्ही आपले लक्ष्य गमावू शकतो.

## मत्सर अंध करतो आणि प्रकाश पाहण्यापासून परावृत्त करतो

येशूला मारण्याचे मुख्य कारणांपैकी एक कारण म्हणजे मत्सर

होते. मुख्य याजक येशूचा हेवा करू लागले होते. “त्याने त्यास उत्तर दिले, तुमच्याकरिता मी यहूद्यांच्या राजाला सोडावे अशी तुमची इच्छा आहे काय? कारण मुख्य याजकांनी त्याला हेव्याने धरून दिले होते हे त्याच्या ध्यानात येऊ लागले” (मार्क १५:९,१०). येशूच्या प्रसिद्धीमुळे आणि जे चमत्कार ते करीत होता त्यामुळे मुख्य याजक येशूचा हेवा करू लागले. मत्सरामुळे त्यांची अंत:करणे अंध झाले होते आणि ते येशूला ख्रिस्त म्हणून रोखू शकले नाहीत.

## मत्सर उपद्रव उत्पन्न करतो

**सर्वांबरोबर ‘शांततेने राहण्याचा’ व ज्यावाचून कोणालाहि प्रभुला पाहता येत नाही ते पवित्रीकरण मिळविण्याचा ‘झटून प्रयत्न करा;’ देवाच्या कृपेला कोणी उणे पडू नये, ज्यामुळे पुष्कळ जण बिघडून जातील असे ‘कोणतेहि कडूपणाचे मूळ अंकुरित होऊन उपद्रव देणारे होऊ नये’** (इब्री. १२:१४,१५).

जर आपण कटुत्व आणि मत्सर याविषयी सावध राहिलो नाही, तर तो केवळ आम्हासच नव्हे, तर आमच्या संभोवतालच्या लोकांसही हे प्रभावित करीन. ज्याक्षणी आम्हास ही जाणीव होते की आमच्याठायी मत्सर आहे, त्याक्षणी आम्हास तो दूर करण्याची गरज आहे.

## मत्सर आणि कलह गोंधळ आणि दुरात्म्याच्या प्रत्येक कार्यासाठी दार उघडतात

बायबल *म्हणते की जेथे मत्सर आहे, तेथे दोन घातक गोष्टी आहेत — गोंधळ आणि प्रत्येक वाईट काम.*

**पण तुमच्या मनात तीव्र मत्सर व तट पाडण्याचा स्वभाव आहे तर ताठा मिरवू नका, व सत्याविरुद्ध लबाडी करू नका. हे ज्ञान वरून उतरत नाही; तर ते ऐहिक, इंद्रियजन्य, सैतानाकडले आहे. कारण जेथे मत्सर व तूट पाडण्याचा स्वभाव आहे तेथे अव्यवस्था व प्रत्येक कुकर्म आहे** (याकोब ३:१४—१६).

मत्सर गोंधळ आणि दुरात्म्याच्या प्रत्येक प्रकारच्या कामासाठी दार उघडतो. कधीकधी, जेव्हा लोक सुटकेच्या शोधात असतात आणि प्रार्थनेची विनंती करतात, तेव्हा कायमचे उपाय अनुभव करता येत नाहीत कारण लोक दुरात्म्याच्या कार्यासाठी दार मोकळे ठेवतात. दार बंद राहावे म्हणून, समस्येचे मूळ दूर करावे लागेल. जोवर आमच्या अंतःकरणात मत्सर आहे, तोवर गोंधळ आणि दुरात्म्याच्या प्रत्येक कार्यासाठी दार उघडे राहील आणि त्यांस आमच्या जीवनांत प्रवेश मिळेल.

म्हणून मत्सर ही एक गंभीर समस्या आहे. ती आमच्या आरोग्यावर परिणाम करते, सत्यासाठी आमची दृष्टी अंध करते आणि आम्ही आपले लक्ष्य गमावून बसतो, ती उपद्रव निर्माण करते आणि दुरात्म्याच्या प्रत्येक प्रकारच्या कार्यासाठी दार मोकळे करते.

## मत्सरापासून सुटका प्राप्त करणे.

आपण मत्सर दूर करून त्यापासून स्वतंत्र जीवन कसे घालवू शकतो? पवित्र शास्त्र आम्हास हे शिकविते :

## प्रेमात चालावे

प्रीती मत्सर करीत नाही अथवा हेवा करीत नाही (१ करिंथ.

१३:४). विश्वासणारे म्हणून आमच्यापैकी प्रत्येकाजवळ प्रीतीत चालण्याचे सामर्थ्य आहे कारण “कारण आपणाला दिलेल्या पवित्र आत्म्याच्या द्वारे आपल्या अंत:करणात देवाच्या प्रीतीचा वर्षाव झाला आहे” (रोम ५:५). प्रार्थना करा आणि निर्धार करा की आपण देवाची प्रीती आपणाद्वारे आणि ज्याविषयी आपणास मत्सर वाटतो, त्या व्यक्तीप्रत प्रवाहित व्हावी, म्हणून तिला मुभा द्या. स्वत:स सांगा, “मी माझ्या मित्राप्रत प्रीतीत चालण्याची निवड करीन.” देवाच्या प्रीतीत चालण्याद्वारे आपण मत्सरास आपल्या अंत:करणाबाहेर आणि मनाबाहेर ठेवू शकू.

## इतरांच्या आशीर्वादांत आनंदित व्हा

जे लोक आनंद करतात त्यांच्यासोबत आनंद करावयास आम्हास पाचारण करण्यात आले आहे (रोम १२:१५). ज्या मित्राने नवीन कार विकत घेतली आहे त्याच्यासोबत आनंद करा. ज्याला विशेष तरतूद अथवा चमत्कार लाभला आहे त्या व्यक्तीसोबत आनंदित व्हा. बरेचदा, आपण गातो, “किती महान!” आणि घोषणा करतो की ताऱ्यांची उत्पत्ति करणारा, आणि मेघगर्जना इत्यादी उत्पन्न करणारा देव आहे. तथापि, मित्राला नवीन कारचा आशीर्वाद मिळाला आहे हे पाहून, दुसऱ्या व्यक्तीला चमत्कार लाभला आहे इत्यादी गोष्टी पाहून आम्ही “किती महान!” हे गावयास शिकले पाहिजे. तोच परमेश्वर देव कार्य करणारा आहे! आम्ही एकमेकांच्या आशीर्वादांत आनंदित व्हावयास शिकले पाहिजे.

**आपण पोकळ अभिमान बाळगणारे, एकमेकांना चीड आणणारे व एकमेकांचा हेवा करणारे होऊ नये.** (गलती. ५:२६)

जोवर आमच्या अंत:करणात मत्सर आहे, तोवर गोंधळ आणि दुरात्म्याच्या प्रत्येक कार्यासाठी दार उघडे राहील आणि त्यांस आमच्या जीवनांत प्रवेश मिळेल.

## प्रत्येक जण वेगळा आहे हे समजून घ्या

जेव्हा आम्हास समजून येते की प्रत्येकास देवाने वेगवेगळी कृपादाने दिलेली आहेत, तेव्हा आपण इतरांचा हेवा करणे टाळू शकतो. प्रत्येकास एका अनन्य हेतूने घडविण्यात आले आहे (रोम १२:४—६). पवित्र शास्त्र आम्हास सांगते की देवाकडून वेगवेगळी कृपादाने आणि सेवा प्राप्त झाल्या आहेत आणि तो आमच्याद्वारे वेगवेगळ्या पद्धतीने काम करीत असतो (१ करिंथ. १२:५—७). उदाहरणार्थ, कोणीतरी उपदेश देतो, आणखी कोणी गीत गातो आणि दुसरा कोणीतरी वाद्य वाजवितो. देवाने आम्हास ज्याप्रकारे घडविले आहे, त्यात आपण आनंदित होण्यास शिकले पाहिजे. आपण हे शिकले पाहिजे की आपण आपली कृपादाने, अभिषेक इत्यादी गोष्टींची तुलना करता कामा नये. जी कृपादाने आम्हास देण्यात आली होती केवळ त्यांच्यासाठी आमचा न्याय केला जाणार नाही, तर ज्या विश्वासूपणे आम्ही देवाच्या गौरवासाठी आणि त्याचे हेतू पूर्ण करण्यासाठी त्यांचा उपयोग केला त्यासाठी आमचा न्याय केला जाईल. जी कृपादाने आम्हास लाभली आहे त्यांच्यासाठी आपण कृतज्ञ राहावयास शिकले पाहिजे. इतरांशी स्वत:ची तुलना करणे टाळावे आणि आपण इतरांचा हेवा करणे टाळू शकता.

## देवाच्या दृष्टीकोनातून सर्व गोष्टींकडे पाहावे

आपण देवाच्या दृष्टीकोनातून सर्व गोष्टींकडे पाहावयास शिकले

पाहिजे. जेव्हा पृथ्वीवरील  जीवन समाप्त होईल, तेव्हा केवळ देवास गौरव प्राप्त होईल आणि केवळ त्याची उपासना केली जाईल. जेव्हा आम्ही या दृष्टीकोनातून सर्व गोष्टींकडे पाहू लागू, तेव्हा मत्सराला जागा उरणार नाही. ज्या गोष्टी इतक्या महत्वाच्या वाटतात ज्यामुळे मत्सर उत्पन्न होतो, त्या यानंतर महत्वाच्या वाटणार नाहीत.

आम्ही स्वत:शी प्रमाणिक राहिले पाहिजे आणि आमच्या जीवनात मत्सराच्या भावना कबूल केल्या पाहिजेत आणि त्यांचा त्याग केला पाहिजे. आम्ही सतत आपल्या अंत:करणाचे मत्सरापासून रक्षण केले पाहिजे. आम्हाला कोणाचाही हेवा न करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला पाहिजे. जर आपण आपल्या अंत:करणात मत्सर राखला, तर देव आमच्याद्वारे कार्य करू शकत नाही. आपण कबूल करू या, पश्चाताप करू या आणि आत्म्याचे शुद्ध करणाऱ्या कार्याचा स्वीकार करू या!

आपण मत्सराच्या प्रत्येक मुळापासून आपल्या अंत:करणाचे रक्षण करण्याची गरज आहे. कधीकधी, काही गोष्टी अन्यायाने घडू शकतात. कदाचित आमच्याशी अन्यायाची वर्तणूक करण्यात आली असेल आणि जे आम्हास मिळावयास हवे होते ते इतरांस मिळाले असेल. तथापि, हे मत्सर करण्याचे काहीही कारण नाही. मत्सर त्यागावा आणि देवास देव असू द्यावे. असे म्हणावे, “देवा, मी कोणाचाही हेवा करू इच्छित नाही.”

आम्ही सुवार्तिक असू अथवा देवाचे सेवक असू आणि आम्ही इतरांस पाहतो जे अधिक अभिषिक्त दिसतात, त्यांची सेवा समृद्ध असते, त्यांना पाहून आमच्या अंत:करणात मत्सराने प्रवेश करता

कामा नये. त्यांच्यासाठी देवाची स्तुती असो! सोबतचे देवास सेवक म्हणून त्यांच्यासोबत आनंदित व्हा. आम्ही मत्सराविरुद्ध आपल्या अंतःकरणाचे रक्षण केले पाहिजे अथवा आपण प्रत्येक प्रकारच्या वाईट गोष्टींसाठी दार उघडतो.

जर आपण मत्सरास बळी पडला असाल, तर आम्हास त्यात सहभागी लोकांची क्षमा मागावी लागेल आणि देवास मोकळीक द्यावी लागेल की त्याने त्या परिथितीकडे लक्ष द्यावे.

- आमच्या जीवनांत मत्सर आहे काय?
- देवाच्या घरात मत्सर आहे काय?
- आम्हाला आपल्या जोडीदाराविषयी मत्सर वाटतो काय?
- ज्यांनी बरेच काही संपादन केले असेल, अथवा आमच्यापेक्षा अधिक प्रतिभावान अथवा गुणवान असतील अशा आपल्या भावाबहिणींविषयी आम्हाला मत्सर वाटतो काय?
- आम्हास आमच्यापुढे गेलेल्या सोबत्यांचा हेवा वाटतो काय?

आपण पवित्र आत्म्यास आमच्या जीवनातील मत्सराच्या मुळाशी तलवारीचा वार करण्याची मोकळीक द्यावी.

## प्रार्थना

*देवा, माझ्या जीवनात मत्सर आहे. मी मत्सरापासून मुक्त असे जीवन जगू इच्छितो. प्रभु, मी प्रार्थना करतो की तू माझ्या अंतःकरणातील मत्सराच्या मुळावर कुऱ्हाडीचा वार करावा. पित्या,*

*माझ्या जीवनात तुझी इच्छा पूर्ण व्हावी. प्रभु, इतर लोकांच्या आशीर्वादांत आनंदित होण्याचे सामर्थ्य मला दे; प्रत्येक व्यक्ती वेगळी घडविण्यात आलेली आहे हे जाणून घेण्याचे सामर्थ्य मला दे. मला हे समजून घेण्याचे सामर्थ्य दे की मी विशेष आहे. प्रभु, प्रेमाने चालण्यात माझी मदत कर; इतरांशी तुलना न करता आणि त्यांचा हेवा न करता, तू मला दिलेल्या जबाबदाऱ्यांबाबत विश्वासू राहण्यात माझी मदत कर; मत्सरापासून माझ्या अंतःकरणाचे रक्षण कर आणि माझ्या अंतःकरणात प्रत्येक प्रकारच्या वाईटासाठी दार बंद कर. प्रभु, माझ्या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात नीतिमत्तापूर्ण दृष्टीकोन बाळगण्याचे सामर्थ्य मला दे; प्रभु, मी तुझे उपकार मानतो की शेवटी तुलाच सर्व गौरव प्राप्त होईल. प्रभु, ज्या व्यक्तीने मला दुखविले आहे त्याला क्षमा करण्याची मी निवड करतो; कटुत्वपूर्ण भावना न बाळगण्याची मी निवड करतो.*

*कोणीही मत्सराने प्रेरित होऊन काहीही करता कामा नये; पित्या, प्रभुच्या घरात कुठलाही मत्सर नसावा.*

*पित्या, मी तुझे उपकार मानतो की तू माझ्या अंतःकरणात कार्य करीत आहेस. येशूच्या नावात मी प्रार्थना करतो, आमेन!*

# मुळावर कुऱ्हाडीचा वार



स्वार्थ • मत्सर • गर्व • वासना

# अध्याय ३

# गर्वाच्या मुळावर कुऱ्हाडीचा वार

गर्वाची व्याख्या आहे अहंकार, उद्दामपणा, फुशारकी, स्वत:चे महत्व, बडेजाव मांडणे, स्वत:चे गौरवगान करणे आणि ही अशी प्रवृत्ती आहे जी आमच्या मनात असा विचार टाकते की आम्ही इतरांपेक्षा श्रेष्ठ आहोत. ही "संसाराविषयीची फुशारकी" आहे जी स्वर्गीय पित्याकडून नाही, पण आज जगात त्याचे मोठे प्रचलन आहे. स्वत:विषयी गर्वाने विचार करणे आणि काही गोष्टींबाबत गर्वाने विचार करणे जगास सामान्य वाटते. जर आपण सावध राहिलो नाही, तर आपण ह्याच विचारसरणीत आणि समजात अडकून राहू.

**"कारण जगात जे सर्व आहे ते, म्हणजे देहाची वासना, डोळ्यांची वासना व संसाराविषयीची फुशारकी, ही पित्यापासून नाहीत, तर जगापासून आहेत" (१ योहान २:१६).**

आम्हास जगात काय आढळून येते? देहाची वासना, देहाची फसवी अभिलाषा, डोळ्यंची पापमय वासना आणि तसेच संसाराची फुशारकी, ह्या सर्व गोष्टी जगाचा भाग आहेत. गर्व आमच्या मनात असा विचार टाकतो की आम्ही आपल्या बळावर काहीतरी साध्य करू शकतो. विश्वासणारे म्हणून, जर आपण सावध राहिलो नाही, तर गर्व ह्या क्षेत्रात पुढे वाढत असतांना सहज आमच्या जीवनांत प्रवेश करील. कदाचित आपण देहाच्या वासनेविषयी अत्यंत सावध असू — उदाहरणार्थ, व्याभिचार — आणि डोळ्यांच्या

वासनांबाबत ज्यामुळे आपण चुकीच्या गोष्टींकडे पाहण्यापासून वाचतो. दुसरीकडे गर्व इतका सूक्ष्म असतो की तो सहज आम्ही जगत असलेल्या व कार्य करीत असलेल्या जगाच्या चालीरितीतून आमच्या जीवनांत प्रवेश करतो.

**“परमेश्वर ज्यांचा द्वेष करितो अशा सहा गोष्टी आहेत; नव्हे, त्याला अशा सात गोष्टींचा वीट आहे; उन्मत्त दृष्टी, लबाड बोलणारी जिव्हा, निर्दोष रक्त पाडणारे हात, दुष्ट योजना करणारे अंत:करण, दुष्कर्म करण्यास त्वरेने धावणारे पाय, लबाड बोलणारा खोटा साक्षी, व भावाभावांत वैमनस्य उत्पन्न करणारा मनुष्य, ह्या त्या होत” (नीतिसूत्रे ६:१६–१९).**

येथे “उन्मत दृष्टीचा” उल्लेख आहे. गर्व देवास घृणास्पद वाटतो आणि देव त्याचा तिरस्कार करतो.

**“तो अधिक कृपा करितो, म्हणून शास्त्र म्हणते, ‘देव गर्विष्ठांना विरोध करितो, आणि लीनांवर कृपा करितो.’” (याकोब ४:६).**

आपल्या अंत:करणात गर्व ठेवून आपण देवाजवळ प्रार्थना करू शकत नाही. देव गर्वाचा विरोध करतो. परंतु आपण असे म्हणून वाद घालू शकता, “देव मजवर प्रीती करतो, म्हणून तो माझा प्रतिकार कसा करील?” तो आपणावर प्रीती करतो, पण आपणाठायी जो गर्व आहे तो त्याला घृणास्पद वाटतो. म्हणून देव गर्वीष्ठ व्यक्तीस टाळतो आणि त्यांच्यापासून दूर राहतो.

गर्व आम्हास देवाच्या जवळ जाण्यात अडखळण आणतो. हे अत्यंत जोखिमेचे स्थान आहे, जेथे देव जवळ देखील येऊ इच्छित नाही. म्हणून ज्या प्रत्येक आध्यात्मिक कार्यात आपण सहभागी असू — मग ती उपासना असो, प्रार्थना, देवाचे वचन

वाचणे, मनन, देवाच्या वचनाचा अंगीकार, उपवास आणि पैसे देणगी स्वरूप देणे असो — जर आमच्या अंत:करणांत गर्व असेल तर हे सर्वकाही निष्प्रभ ठरते. आध्यात्मिक कार्ये देवाजवळ जाण्याच्या इच्छेने आणि त्याने आमच्याजवळ यावे ह्या इच्छेने केली जातात, परंतु जर आपण गर्वाचा त्याग करावयास तयार नसू, तर देव आम्हाजवळ येऊ शकत नाही. देवावाचून, आम्ही काहीही नाही.

देव कृपा कोणास देतो? पवित्र शास्त्र म्हणते की तो नम्र व्यक्तीस कृपा पुरवितो (याकोब ४:६ब). आमच्या जीवनात दैवी कृपा प्राप्त करण्यासाठी नम्रता ही पूर्वपात्रता आहे. जे काही आमच्याजवळ आहे आणि जे काही आम्ही बनू ते देवाच्या कृपेने आहे. खरे म्हणजे, आम्ही जे काही बनू आणि जे काही स्वत: पलीकडे साध्य करू, ते केवळ त्याच्या कृपेने असेल. पण जर आपण गर्वात चालत असू, तर आपण आपल्या जीवनात दैवी कृपेचा पुरवठा थांबवू आणि काहीही बनू शकणार नाही अथवा काहीही साध्य करू शकणार नाही. म्हणून आपण प्रथम नम्रतेने चालले पाहिजे, कारण मगच देवाची कृपा आमच्या जीवनात प्राप्त होऊ शकते.

नम्रतेवाचून, आपण आमच्या जीवनासाठी देवाची सर्वोत्तम आणि सर्वोच्च इच्छा कधीही साध्य करू शकणार नाही, त्या इच्छेनुसार बनू शकणार नाही. उदाहरणार्थ, पावित्र्य दैवीय कृपेचे फळ होय. आमच्यापैकी सर्वच पवित्र बनू इच्छितात, पण केवळ देवाची कृपा आम्हास पवित्र ठरवू शकते. तथापि, जर आपण गर्वात चालत असू, तर त्यामुळे दैवी कृपेचा पुरवठा संपेल आणि कृपेवाचून आपण पवित्र बनू शकत नाही. नम्रता आमच्या जीवनात

दैवीय कृपेच्या सतत पुरवठ्याची खात्री करून घेते. देव नम्र लोकांस कृपा पुरवितो आणि तो अहंकारी लोकांचा विरोध करतो.

थोर पुढारी अत्यंत नम्र लोक असतात. बरेचदा, आपण केवळ असे गृहीत धरतो की हे पुढारी असे लोक आहेत जे सत्ता गाजवितात आणि प्रभाव टाकतात. पण बायबल असे म्हणत नाही. जुन्या करारात मोशे हा सर्वात थोर पुढारी होता. ज्याने साठ लाख लोकांस त्यांच्या जीवनांसाठी देवाच्या हेतूंप्रत नेण्यासाठी मार्गदर्शन केले, पण गणना १२:३ म्हणते, "मोशे हा पुरुष तर भूतलावरील सर्व मनुष्यापेक्षा नम्र होता." यामुळे या गोष्टीवर भर पडतो की मोशेला जरी सर्वात गर्विष्ठ व्यक्ती बनण्याची संधी असली, तरीही तो संपूर्ण पृथ्वीवरील सर्वात विनम्र व्यक्ती होता, कारण देवाने त्याला पाचारण केले होते. मोशे नम्र होता आणि म्हणूनच देव त्याचा उपयोग करू शकला.

गर्व ही अत्यंत सूक्ष्म बाब आहे. देहाची पातके आणि डोळ्यांची पातके ओळखणे सोपे आहे, पण आमच्यातील गर्व ओळखणे कठीण जाते. **आम्हास वाटते की आम्ही गर्वापासून मुक्त आहोत, तथापि आमच्या विचारांत आम्ही बरेचदा ज्या गोष्टी बोलतो, आमची प्रवृत्ती आणि वागणूक यावर गर्वाचा कलंक असतो.**

पण जर आपण गर्वात चालत असू, तर आपण आपल्या जीवनात दैवी कृपेचा पुरवठा थांबवू आणि काहीही बनू शकणार नाही अथवा काहीही साध्य करू शकणार नाही. म्हणून आपण प्रथम नम्रतेने चालले पाहिजे, कारण मगच देवाची कृपा आमच्या जीवनात प्राप्त होऊ शकते.

## गर्वाची लक्षणे

जेव्हा आम्ही आजारी असतो तेव्हा डॉक्टरला भेट दिल्यावर तो आमची लक्षणे पाहून रोगाचे निदान करू शकतो. आपण स्वत:चे परीक्षण करू या आणि पाहू या की आमच्यात गर्व म्हटलेल्या ह्या रोगाची लक्षणे दिसून येत आहेत काय.

## हट्‌टी अथवा हेकेखोर असणे

एक चांगल्या प्रकारचा हट्‌टीपणा असतो — देवाचे पाचारण, हेतू आणि देवाच्या गोष्टी याविषयी अटळ अथवा दृढ निश्चयी असणे. आम्ही योग्य गोष्टींसाठी 'हट्‌टी' असले पाहिजे. उदाहरणार्थ, पवित्रतेविषयी हट्‌टी असा आणि त्याबाबत तडजोड करू नका. जेव्हा पावित्र्याची गोष्ट येते, तेव्हा कोणीही दुसऱ्या गोष्टींकडे आमचे मन वळविता कामा नये. आमच्या जीवनांत देवाच्या पाचाराणांविषयी आपण हट्‌टी आणि अढळ असले पाहिजे. तरीही आम्ही हट्‌टीपणापासून आणि गर्वातून जन्मलेल्या गोष्टी बदलण्यासाठी अनिच्छुक असले पाहिजे.

**"तेव्हा दानीएलाने राजास उत्तर दिले की, तुझ्या देणग्या तुज जवळच राहू दे, तुझी इनामे दुसऱ्या कोणास दे, तथापि मी हा लेख राजास वाचून दाखवितो व त्याचा अर्थ करून त्याला सांगतो. हे राजा, परात्पर देवाने तुझा बाप नबुखद्नेस्सर यास राज्य, महत्व, वैभव व महिमा ही दिली; त्याने त्यास मोठेपणा दिला म्हणून सर्व लोक, सर्व राष्ट्राचे व सर्व भाषा बोलणारे लोक त्याच्यापुढे थरथर कापत व त्याला भीत; वाटेल त्यास तो ठार मारी व वाटेल त्यास जिवंत राखी; वाटेल त्यास तो थोर करी व वाटेल त्यास तो नीच करी. पुढे त्याच्या हृदयात ताठा**

**शिरला, व त्याचा आत्मा कठोर होऊन उन्मत्त झाला. तेव्हा त्याला त्याच्या राज्यपदावरून काढण्यात आले व त्याचे वैभव हिरावून घेण्यात आले; त्याला मनुष्यातून घालवून देण्यात आले; त्याचे हृदय पशूसारखे झाले; तो रानगाढवामध्ये वस्ती करू लागला; तो बैलाप्रमाणे गवत खाई व त्याचे शरीर आकाशातील दहिवराने भिजत असे मानवी राज्यावर परात्पर देवाची सत्ता आहे व त्यावर तो पाहिजे त्यास स्थापितो, असे ज्ञान त्याला होईपर्यंत तो असा राहिला" (दानीएल ५:१७—२१).**

दानीएल आम्हास सांगतो की देवाला नबुखद्नेस्सर राजास सिंहासनावरून खाली का आणावे लागले. तो गर्विष्ठ, हट्टी आणि क्रूर झाला होता. हट्ट आणि क्रूरता यांचा जन्म गर्वातून होतो आणि हे दुर्गुण सोबत वावरतात. "पुष्कळदा वाग्दंड झाला असूनही जो आपली मान ताठ करितो, त्याचा अचानक चुराडा होता, त्याचा काही उपाय चालत नाही" (नीतिसूत्रे २९:१). जेव्हा कोणी वारंवार आमची कानउघाडणी करतो आणि आम्ही त्या सल्ल्याकडे कानाडोळा करण्याची प्रवृत्ती बाळगतो, तर बायबल आम्हास सावध करते की आमचा नाश होईल. उदाहरणार्थ, पतीपत्नीच्या संबंधात, जेव्हा पत्नी काही गोष्टी करण्याचा विचार मांडते आणि त्याविषयी आपल्या पतीला त्याचा विचार मांडण्यास सांगते, तेव्हा तो हट्टाने तिने मांडलेल्या प्रत्येक विचाराचा विचार न करता अव्हेर करतो. या उलट सुद्धा करू शकते. बरेचदा, तिच्या कल्पनांचा अशाप्रकारे सतत अव्हेर करण्याच्या मुळाशी गर्व असू शकतो.

दुसरे उदाहरण, देवाच्या गोष्टीशी संबंधित बाबींविषयी असू शकते. जेव्हा लोक दैवी सल्ला देतात आणि आमच्या जीवनात

सुधारणा घडवून आणतात, तेव्हा आम्ही त्यांचे ऐकावयास अनिच्छुक असू शकतो, स्वत:स कठोर करू शकतो आणि सुधारणेकडे दुर्लक्ष करणे पसंद करतो. अशा प्रकारच्या हट्टीपणापासून सावध असावे ज्याचा जन्म सामान्यत: गर्वातून होतो. जरी बरेचदा आपण चुकीच्या गोष्टींविषयी हट्ट धरतो, तरी योग्य गोष्टींविषयी हट्टी असणे चांगले आहे. चुकीच्या गोष्टींसाठी हट्ट धरण्याचे मूळ कारण गर्व असू शकतो. बायबल म्हणते की अशा कार्याचे परिणाम म्हणून अचानक नाश घडून येतो ज्याचा उपाय करता येत नाही.

## अरेरावी / फाजील आत्मविश्वास

गर्वाच्या आत्म्याचे दुसरे लक्षण म्हणजे अरेरावी अथवा फाजील आत्मविश्वास होय. गर्व अहंकार उत्पन्न करतो. उदाहरणार्थ, जर जॉनी सतरा वर्षांचा होतो आणि आपल्या वडिलांस म्हणतो, “मला कारची चावी द्या, मी रस्त्यावर गाडी चालवू शकतो,” त्याचे वडील कदाचित त्याला म्हणतील, “जॉनी, तुला आधी गाडी शिकावी लागेल. मग स्वत:हून रस्त्यावर गाडी चालविण्यासाठी तुला लायसंस मिळेल.” पण जॉनी हट्ट धरतो, “पप्पा, मी सतरा वर्षांचा आहे आणि मला लायसंसची गरज नाही. मी रस्त्यावर गाडी चालवू शकतो,” मग, हा अरेरावीपणा आणि फाजील आत्मविश्वास झाला. अनेकदा याचे मूळ गर्व असतो.

अरेरावीपणा आम्हास असा विचार करावयास बाध्य करतो की आम्हाला सर्वकाही येते; आम्हाला कोणाचा सल्ला ऐकण्याची गरज नाही, आणि आम्हाला योग्य प्रशिक्षण घेण्याचीही गरज नाही अथवा आम्हास आवश्यक ते काहीही करणे जरूरी नाही. “आम्ही मवाबाचा गर्व ऐकून आहो, तो अति गर्विष्ठ आहे, त्याचा ताठा,

त्याचा गर्व, त्याचा अभिमान, त्याची उन्मत्तता आम्ही ऐकून आहो" (यिर्मया ४८:२९). मग आम्हाला गर्वासोबत काय आढळून येते? आम्हाला अभिमान आणि उन्मत्तता दिसून येतो. "मी जगाचे त्याच्या दुष्टतेबद्दल व पातक्यांचे त्यांच्या अन्यायाबद्दल पारिपत्य करीन; गर्विष्ठांचा दिमाख बंद करीन, जुलम्यांचा तोरा उतरवीन" (यशया १३:११). म्हणून गर्व अरेरावीपणास जन्म देतो. बायबल आम्हाला शिकविते की देवाचे खरे भय आम्हास गर्वाचा, अरेरावीपणाचा आणि प्रत्येक दुष्ट मार्गाचा त्याग करण्यात मदत करील.

**परमेश्वराचे भय धरणे म्हणजे दुष्कर्माचा द्वेष करणे होय; गर्व, अभिमान, कुमार्ग व उद्दामपणाची वाणी यांचा मी द्वेष करिते** (नीतिसूत्रे ८:१३).

खिस्ती जगातील आमच्यापैकी अनेकांस आध्यात्मिकरित्या आक्रमणशील राहावयास सांगण्यात आले होते. "बाप्तिस्मा करणारा योहान ह्याच्या दिवसापासून तो आतापर्यंत स्वर्गाच्या राज्यावर आक्रमण होत आहे आणि आक्रमण करणारे ते बळकावीत आहेत" (मत्तय ११:१२). तथापि, आपण आध्यात्मिकरित्या उन्मत न राहता आध्यात्मिकरित्या आक्रमणशील असले पाहिजे. देवाच्या आत्म्याविषयी बलवान असणे उत्तम आहे, परंतु समस्या तेव्हा उत्पन्न होते जेव्हा आपण आध्यात्मिक उन्मत्तपणा आणि आध्यात्मिक आक्रमणशीलता यांस एक समजतो. आध्यत्मिकरित्या आक्रमणशील होण्याच्या आमच्या प्रयत्नात, आमचा शेवट आध्यात्मिकरित्या उन्मत्त होण्यात होतो. आध्यात्मिक उन्मत्तपणा आमच्या मनात हा विचार टाकतो की आम्ही उत्तम आहोत. उदाहरणार्थ, आपण

विचार करीत असतो की आपण सर्वात उत्तम मंडळीत आहोत आणि इतर मंडळ्यांकडे तुच्छतेने पाहतो. आध्यात्मिक उन्मत्तपणा आमच्यात हा विचार टाकतो की फक्त आमचे सगळे योग्य असते आणि बाकीचे सर्व आमच्याइतके चांगले नाहीत, आणि आमची काम करण्याची पद्धत सर्वोत्तम आहे. आम्ही विचार करू लागतो की ख्रिस्तित्वाचा आमचा ब्रांड (जर असे काही असेल तर!) सर्वोच्च आणि एकमेव आहे. या गोष्टींविरुद्ध आम्ही स्वत:चे रक्षण केले पाहिजे.

आम्ही देवाच्या वचनाच्या सत्याच्या पक्षाने उभे राहिले पाहिजे, पण आध्यात्मिक उन्मत्तपणा आमच्या मनात हा विचार उत्पन्न करतो की फक्त आमच्याजवळ सत्याचे सर्वात मोठे वैय्यक्तिक प्रकटीकरण आहे आणि "आम्हाला सर्वात खोल शोध लाभला आहे, केवळ आमचा मार्ग देवाने नियुक्त केलेला मार्ग आहे" आणि दुसरा कुठलाही मार्ग निम्न प्रतीचा आहे ही गोष्ट आमच्या मनात फाजील आत्मविश्वास भरते, आम्हाला स्वत:च्या दृष्टीने महत्वपूर्ण ठरविते. व्यक्तीगत विश्वास, पद्धती, शैली आणि पसंती यांस एकमेव म्हणून पुढे करतो आणि या गोष्टीकडे दुर्लक्ष केले जाते की "कार्याचे निरनिराळे प्रकार आहेत, तरी सर्वात सर्व कार्ये करणारा देव एकच आहे" (१ करिंथ. १२:६). आम्हाला यासंबंधाने अत्यंत सावध असले पाहिजे. वेगवेगळ्या प्रकारची कामे आहेत. जो परमेश्वर आमच्या मंडळ्यांत कार्य करतो तो कोणत्याही मंडळीत आणि पृष्ठभूमीत काम करू शकतो. म्हणून आपण असे म्हणू शकत नाही की आमची पद्धत हीच एकमेव पद्धत होय.

मी बराच वेळ देवाच्या वचनाचा प्रचार करण्यात आणि शिकविण्यात घालवितो, पण अनेकदा मी टेप ऐकतो, पुस्तके वाचतो, इतर सेवकांस दूरदर्शनवर प्रचार करतांना पाहतो आणि ऐकतो. अशावेळी, मी विद्यार्थ्याप्रमाणे बसतो. मी अनेक संदेश प्रचार केले असतील; परंतु जेव्हा आणखी कोणी बोलत असतो, तेव्हा मग तो माझ्यापेक्षा दहा वर्षांनी लहान असो वा पन्नास वर्षे वयाचा असो, मी त्यांचे ऐकतो कारण माझ्याशी बोलण्यासाठी देव त्या व्यक्तीचा उपयोग करू शकतो. परंतु आध्यात्मिक उन्मत्तपणा आम्हाला अशा सेवकांचे ऐकण्याच्या मार्गात अडखळण आणू शकतो, जो आमच्यापेक्षा कित्येक वर्षे लहान असेल. आपण लक्षात ठेवू या की पवित्र शास्त्रात हे देखील लिहिले आहे की देव गाढवाद्वारे सुद्धा बोलला!

## बंडखोरपणा

बंडपणा गर्वाच्या मुळाचे लक्षण आहे. ते देवाने नेमलेल्या अधिकाराच्या अधीन होण्याची अनिच्छा होय; हा अधिकार आम्हास तीन प्रकारे देण्यात आलेला आहे – त्याचे वचन, त्याचा आत्मा, आणि त्याचे लोक. उदाहरणार्थ, मुलांस आवडो अथवा न आवडो, आमच्या जीवनांत आईवडील हे देवाने नेमलेले अधिकारी आहेत. गर्व देवाने नेमलेल्या अधिकाराप्रत व्यक्तींस बंड करण्यास प्रवृत्त करतो.

आंशिक आज्ञाधारकपणाला बंड सुद्धा मानले जाते! आमच्यापैकी अनेक जण काही अंशी देवाच्या आज्ञेचे पालन करतात. देव शौलाशी बोलला आणि त्याने अमालेकी लोकांचा नाश करण्याविषयी त्याला काही विशिष्ट आज्ञा दिल्या आणि यांची

खात्री करून घेतली की त्याने सर्व गोष्टीचा पूर्णपणे नाश करावा (१ शमुवेल १५). पण शौलाने त्या आज्ञेच्या केवळ एका भागाचे पालन केले. त्याने काही भागाचा नाश केला आणि राजास व काही प्राण्यांस जीवंत ठेविले. जेव्हा शमुवेलाने शौलास विचारले की त्याने असे का केले, तेव्हा शौलाने उत्तर दिले की तो वाचलेल्या वस्तूंचे देवास अर्पण करण्याविषयी विचार करीत होता. शमूवेल म्हणतो, “अवज्ञा जादूगिरीच्या पातकासमान आहे, आणि हट्ट हा मूर्तिपूजा व कुलदेवतार्चन यासारखा आहे; तू परमेश्वराचा शब्द मोडिला आहे म्हणून तथापि त्यानेही तुला राज्यपदावरून झुगारून दिले आहे” (१ शमुवेल १५:२३). शौलाचा अपराध आंशिक आज्ञापालन होता. आमच्यापैकी काहीजण देवास सांगतात, “देवा, मी तुला माझी अर्पणे देईल, पण तू मला माझा दशमांश मागू नकोस.” लक्षात ठेवा आंशिक आज्ञापालन सुद्धा बंडाळी आहे.

लूसिफरचे पाप हे बंडखोरपणाचे सर्वात मोठे पातक होते, ज्याचा उगम गर्वातून झाला होता. यशया १४:१२—१५ मध्ये आपण लूसिफरच्या पतनाविषयी वाचतो, “हे दैदित्यमान ताऱ्या, प्रभातपुत्रा, तू आकाशातून कसा पडलास! राष्ट्रास लोळविणाऱ्या तुला धुळीत कसे टाकिले! जो तू आपल्या मनात म्हणालास, मी आकाशात चढेन, देवाच्या तारांगणाहून माझे सिंहासन उच्च करीन, उत्तर भागातील देवसभेच्या पर्वतावर मी विराजमान होईन. मी मेघावर आरोहण करीन, मी परात्परासमान होईन; त्या तुला अधोलोकात, गर्तेच्या अधोभागात टाकिले आहे.” हे इतिहासातील बंडपणाचे सर्वात मोठे कार्य होते ज्याचा जन्म गर्वातून झाला होता.

कधी कधी लहान मुलांची वाढ होत असतांना, आम्हाला असे वाटू लागते की आम्हाला आमच्या आईवडिलांपेक्षा जास्त ज्ञान आहे. आम्हाला असे वाटते की आम्ही आधुनिक आणि वर्तमान आहोत आणि जगातील अत्याधुनिक आणि सर्वात मोठ्या गोष्टींच्या संपर्कात आहोत. आम्हाला वाटते की आमचे आईवडील पुरातन आणि असम्बद्ध आहेत आणि म्हणून आम्ही त्यांच्या शिकवणींविरुद्ध आणि उपदेशाविरुद्ध सतत बंड करीत असतो. ही गोष्ट आम्हाला बंडपणाच्या जोखिमेच्या ठिकाणी आणून सोडते. जीवनांत आशीर्वादाचे रहस्य इफिस. ६:१—३ या वचनांत आढळून येते, “मुलांनो, प्रभुमध्ये तुम्ही आपल्या आईबापांच्या आज्ञेत राहा, कारण हे योग्य आहे. ‘आपला बाप व आपली आई ह्यांच्या मान राख, ह्यासाठी की, तुझे कल्याण व्हावे व तू पृथ्वीवर दीर्घायु असावे.’ अभिवचन असलेली हीच पहिली आज्ञा आहे.” जेव्हा परीक्षेत लिहिण्याची वेळ येते, कॉलेजात प्रवेश घ्यावयाचा असतो, आमच्या नौकरीसाठी, उत्तम आरोग्यासाठी गरज आणि दीर्घायुष्याचा आशीर्वाद हवा असतो, तेव्हा आम्हाला देवाची गरज असल्याचे भासते. आम्हाला वाटते की आमचे कल्याण व्हावे पण देव म्हणतो की जर आमचे बरे व्हावे असे आम्हास वाटते, तर आम्ही आपल्या आईबापाचा मान राखला पाहिजे. ही पहिली आज्ञा आहे ज्याच्यामागे अभिवचन जोडलेले आहे. जर आपण त्याचे पालन कराल, तर “तुझे कल्याण व्हावे व तू पृथ्वीवर दीर्घायू असावे,” असे देव म्हणतो. आपण आपल्या आईबापांचा मान राखला पाहिजे आणि त्यांस योग्य तो मान दिला पाहिजे.

बायबल म्हणते की, आम्ही “प्रभुमध्ये” आपल्या आईवडिलांच्या आज्ञेचे पालन केले पाहिजे. म्हणून अशा परिस्थितींत जेथे आईवडिल

आम्हास देवाच्या वचनाच्या विरुद्ध कार्य करावयास लावतात, तेथे देवाच्या वचनाच्या पक्षाने उभे राहण्यास आम्हाला अधिकार आहे.

मी लहान असतांना, मेथेडिस्ट चर्चच्या व्ही बी एस मध्ये भाग घेत असे जेथे आम्हाला प्रभुला भेट म्हणून देण्यासाठी काही पैसा कमविण्याकरिता घरी काही काम करावयास प्रोत्साहन देण्यात आले. म्हणून मी माझ्या वडिलांच्या जोड्यांस पॉलीश करून पैसा कमविण्याचे ठरविले. व्ही. बी. एस संपल्यानंतर, मला कळून आले की पैसा कमविण्याची ही खरोखर उत्तम पद्धत आहे आणि म्हणून मी माझ्या वडिलांचे जोडे पॉलीश करण्याचे सुरू ठेविले, पैशांचा हिशोब ठेविला, आणि दर महिन्याच्या शेवटी त्याच्यासाठी मला पैसे दिले जात असे. याशिवाय, सातव्या वर्गापासून तो बारव्या वर्गापर्यंत, कुठलाही पैसा न घेता मी दररोज सकाळी त्यांचे कपडे इस्त्री करीत असे. हे मानाचे व प्रतिष्ठेचे काम होते, आणि अशाप्रकारे मला वाटते की मी त्यांच्या जीवनांतील यशाचा वाटेकरी झालो. काही सकाळी मला हे काम करावेसे वाटत नसे, पण मी स्वत:ला देवाच्या आज्ञेचे स्मरण करून देत असे की जर मी माझ्या आईबापाचा मान राखला, तर माझे चांगले होईल. मला उत्तम जीवन हवे होते आणि म्हणून मी देवास म्हटले, “मी तुझ्या आज्ञेचे पालन करीत आहे, म्हणून आता माझे बरे होईल.” जर आपण सोप्या व्यावहारिक पद्धतीने घरातील, आमच्या कामाच्या ठिकाणच्या आणि प्रभुच्या घरातील देवाने नेमलेल्या अधिकाऱ्यांचा मान राखला, तर आमच्या जीवनांवर आशीर्वाद प्राप्त होतील.

## उपहास करणारे

गर्वाच्या मुळाचे चौथे लक्षण म्हणजे उपहास करणारे बनणे. उपहास

करणे म्हणजे थट्टा करणे, अनादर करणे, तिरस्कार करणे आणि इतरांस तुच्छ लेखणे होय. हे सामान्यत: आपण व्यक्त करीत असलेल्या विचारांत आणि इतर लोकांविषयी असलेल्या आमच्या मतांत आढळून येते. काही लोक असतात जे क्वचितच इतरांविषयी चांगले बोलतात. ते नेहमीच इतरांविषयी तुच्छतेने आणि मानहानिकारक असे बोलतात. हे तिरस्कार करणे होय आणि याचा जन्म सामान्यत: गर्वातून होतो.

बायबल सांगते की उपहास करणाऱ्यांस लोकांचा उपहास करण्यात किती आनंद वाटतो. "धर्मनिंदा करणारे धर्मनिदेंत कोठवर आनंद पावणार" (नीतिसूत्रे १:२२ब). "उपहास करणाऱ्यांचा तो अवश्य उपहास करितो, पण दीनावर तो कृपाप्रसाद करितो" (नीतिसूत्रे ३:३४). हा सावधगिरीचा इशारा आहे की देव उपहास करणाऱ्याचा उपहास करतो! "गर्विष्ठ व चढेल मनुष्याला उद्दाम म्हणतात, तो गर्वाच्या ताठ्याने वागतो" (नीतिसूत्रे २१:२४).

आम्हास सावध करण्यात आले आहे की उपहास केल्याने संकट उत्पन्न होते — "उद्दामपणा करणारे नगराला आग लावून देतात, पण सुज्ञ जन क्रोधाला घालवितात" (नीतिसूत्रे २९:८).

## स्वत:स नीतिमान समजणे/ढ़ोंग

परूशी आणि जकात घेणारा यांच्या प्रार्थनेत काय फरक होता यावर विचार करा.

**"आपण धार्मिक आहो असा जे कित्येक स्वत: विषयी भरवसा धरून इतर सर्वांस तुच्छ मानीत होते त्यांनाही त्याने दाखला सांगितला, तो असा. एक परूशी व एक जकातदार असे दोघे**

**जण प्रार्थना करावयास वर मंदिरात गेले; परूशाने उभे राहून स्वत:शी अशी प्रार्थना केली; हे देवा, इतर माणसे लुबाडणारी, अधर्मी, व्यभिचारी आहेत, त्यांच्यासारखा किंवा ह्या जकातदारासारखाही मी नाही, म्हणून मी तुझे आभार मानितो. मी आठवड्यातून दोनदा उपास करितो; जे मला मिळते त्या सर्वांचा दशांश देतो. जकातदार तर दूर उभा राहून वर स्वर्गाकडे दृष्टी लावण्यास देखील न धजता आपला ऊर बडवीत म्हणाला, हे देवा मज पाप्यावर दया कर. मी तुम्हास सांगतो, त्या दुसऱ्यापेक्षा हा नीतिमान ठरून खाली आपल्या घरी गेला; कारण जो कोणी आपणाला उंच करतो तो नमविला जाईल, आणि जो कोणी आपणाला नमवितो तो उंच केला जाईल”** (लूक १८:९—१४).

कधी कधी, आपण असा विश्वास धरतो की आपण नीतिमान आहोत आणि आपण इतरांस तुच्छ लेखितो. गर्व स्वत:स नीतिमान ठरवितो जो ढोंग प्रवृत्त करितो. स्वत:स नीतिमान ठरविण्यामुळे आपण इतरांचे दोष शोधू लागतो आणि असा विचार करू लागतो की आम्ही त्यांच्यापेक्षा चांगले आहोत, आम्ही स्वत:मध्ये असलेले दोष ओळखू शकत नाही. ढोंगी व्यक्ती आपल्या स्वत:चे पाप सोडून देतो, तो इतरांस त्यांच्या पापांविषयी दोषी ठरवितो. उदाहरणार्थ, आपण आणखी कोणास विचारू शकता की त्या दिवशी त्याने किवां तिने बायबल का वाचले नाही, त्यांच्यात अपराधबोध उत्पन्न करतो, पण जर का आपण हाच प्रश्न स्वत:स विचारला असता, तर बायबल न वाचण्याचे योग्य कारण आपण शोधून काढले असते.

**“तुमचे दोष काढण्यात येऊ नयेत म्हणून तुम्ही कोणाचे दोष काढू नका. कारण ज्या प्रकारे तुम्ही दोष काढाल त्या प्रकारेच**

**तुमचे दोष काढण्यात येतील आणि ज्या मापाने तुम्ही मापून द्याल त्याच मापाने तुम्हाला मापून देण्यात येईल. तू आपल्या डोळ्यातले मुसळ ध्यानात न आणिता आपल्या भावाच्या डोळ्यातले कुसळ का पाहतोस? अथवा तुझ्या डोळ्यातले कुसळ मला काढू दे असे तू आपल्या भावाला कसे म्हणशील? पाहा, तुझ्या डोळ्यात तर मुसळ आहे. अरे ढोंग्या, पहिल्याने आपल्या डोळ्यातले मुसळ काढून टाक म्हणजे आपल्या भावाच्या डोळ्यातले कुसळ काढण्यास तुला स्पष्ट दिसेल”** (मत्तय ७:१—५).

आम्हास इतरांस दोष देण्याच्या पापापासून मुक्त होण्याची गरज आहे. कारण ते आम्हास स्वत:मधील पाप ओळखू देत नाही. आमच्यापैकी काही जण इतर लोकांतील दोष धुंडाळण्यात पारंगत असतात, पण आपल्या स्वत:च्या जीवनांत असलेले “मुसळ” आम्हास समजत नाही. आम्ही इतरांचे दोष दाखवून पवित्र बनत नाही; इतरांतील दोष शोधण्याद्वारे आपण देवाच्या जवळ देखील येऊ शकत नाही. अशा प्रकारची “दोष शोधणारी सेवा” निश्चितच आम्हाला देवाजवळ आणणार नाही! मूल्यमापन उत्तम आहे पण देवाच्या घरातील आमच्यासोबतच्या भावाबहिणींचा न्याय करण्यापूर्वी आम्ही सावध असण्याची गरज आहे. स्वर्गारोहणापूर्वी ख्रिस्त पापी लोकांसाठी मरण पावला जेथून एके दिवशी तो आमचा न्यायाधीश म्हणून परत येणार आहे. देवाच्या राज्यात, जोवर आपण प्रथम लोकांसाठी आपले जीवन वाहून देण्यास समर्पित होत नाही, तोवर आपणास त्यांचा पुढारी व न्यायाधीश म्हणून अधिकार दिला जात नाही. म्हणून लोकांचा न्याय करण्यापूर्वी, आम्ही स्वत:स विचारले पाहिजे की आपण त्यांच्यासाठी मरावयास तयार आहो का, जेथे ते आहेत त्यातून त्यांस बाहेर काढावयास, पूर्णत्वाच्या ठिकाणी

आणावयास इच्छुक आहोत काय! जेव्हा आपण पाप, अन्याय आणि अधर्माविषयी बोलतो, तेव्हा आपण त्यांस पुनर्स्थापित करण्याच्या, पूर्णत्वास आणण्याच्या एकमेव हेतूने प्रेरित असले पाहिजेत. जर हा आपला हेतू अथवा ध्येय नसेल, तर आपण शांत राहावयास शिकले पाहिजेत!

## कलहप्रियता/भांडखोर असणे

कधीकधी, आपण इतके कलह प्रिय आणि भांडखोर होतो की त्याचे मूळ कारण खरोखर गर्व असतो. “गर्वामुळे भांडणे मात्र होतात. पण चांगली मसलत घेणाऱ्याजवळ ज्ञान असते” (नीतिसूत्रे १३:१०). “लोभी मनुष्य तटा उपस्थित करितो; पण परमेश्वरावर भाव ठेवणारा धष्टपुष्ट होतो” (नीतिसूत्रे २८:२५). अशाप्रकारे गर्वामुळे भांडण उत्पन्न होते.

## पूर्वग्रह

गर्व किंवा अहंकार पूर्वग्रहास जन्म देतो. पूर्वग्रह विशिष्ट प्रकारच्या लोकांप्रत भेदभाव, पक्षपात, असहिष्णुता, आधीच ठरविलेले अन्यायपूर्ण आचरण होय. आम्ही सर्वजण जीवनांत कधीतरी, काही लोकांप्रत कुठल्यातरी प्रकारचा पूर्वग्रह बाळगत असतो. हा गरीब आणि श्रीमंत यांच्यातील फरक असेल, जेथे आम्हास गरीब व्यक्तीपेक्षा श्रीमंत व्यक्तीप्रत अधिक मित्रभावी वाटते अथवा लोकांच्या शैक्षणिक पात्रतेच्या आधारे आम्ही त्यांच्याविषयी पूर्वग्रह बाळगतो. तसेच लोक देशाच्या कोणत्या भागातून आहेत, त्यांच्या त्वचेचा वर्ण कुठला आहे, त्यांचे लिंग यांच्या आधारे आणि कधीकधी चर्च डिनॉमिनेशनच्या आधारे आम्ही त्यांच्याविषयी सामान्य मत मांडतो.

अशा प्रकारच्या पूर्वग्रहाविरुद्ध आम्हास सावधगिरीचा इशारा देण्यात आला आहे : "यहूदी व हेल्लेणी, गुलाम व स्वतंत्र, पुरुष व स्त्री, हा भेदच नाही; कारण तुम्ही सर्वजण ख्रिस्त येशूच्या ठायी एकच आहा" (गलती ३:२८). आम्ही सर्व देवाचे लोक आहोत आणि आमच्यासाठी हे शिकणे महत्वाचे आहे की गर्वामुळे उत्पन्न पूर्वग्रहातून मुक्त होण्याद्वारे प्रत्येकास समान वागणूक कशी द्यावी.

## अभिमानी होणे/विशेष असल्यासारखे वागणे

कधी कधी जरी आमची पावले जमिनीवर असतात, तरीही आमची डोकी वर कुठेतरी आकाशात असतात. आमच्यापैकी बहुतेकजण ह्या सामान्य रोगाने पीडित असतात. प्रेषित पौल म्हणतो, "परस्पर एकचित्त असा. मोठमोठ्या गोष्टींवर चित्त ठेवू नका, तर लीन वृत्तीच्या लोकांचा सहवास करा. स्वत:ला शहाणे समजू नका" (रोम १२:१६). आम्ही इतके अभिमानी असतो की आम्ही इतरांशी संबंध साधू शकत नाही. आम्हाला "अवकाश युगाचे शिक्षण" लाभले असेल, पण आपण आमची फर्शी झाडणाऱ्या व्यक्तीशी साधा संवाद साधू शकत नाही. आमची संपत्ती आम्हाला अभिमानी ठरविते आणि आम्हास असा विश्वास करावयास प्रवृत्त करते की आम्ही एका विशिष्ट वर्गाचे लोक आहोत. आमचे गुण आणि आमच्या योग्यता, वैयक्तिक पात्रता यामुळे आम्ही असा विश्वास धरू लागतो की आम्ही खरोखर विशिष्ट वर्गाचे लोक आहोत. "प्रस्तुत युगांतल्या धनवानास निक्षून सांग की, तुम्ही अभिमानी होऊ नये, चंचल धनावर आशा ठेवू नये, तर जो जिवंत देव आपणास उपभोगासाठी सर्व काही विपुल देतो त्याच्यावर आशा ठेवावी" (१ तीमथ्य ६:१७). आपण मोठमोठ्या गोष्टींवर आपले

मन लावता कामा नये, तर नम्र लोकांसोबत संगत करावयास शिकावे. आम्हाला असे लोक बनण्याची गरज आहे जे कोणाशीही संबंध साधू शकतात आणि आपल्या दृष्टीने बुद्धिमान नसतात.

*गर्वाची लक्षणे*

- हट्टी अथवा हेकेखोर असणे
- अरेरावी/फाजील आत्मविश्वास
- बंडखोरपणा
- उपहास करणारे
- पाखंड
- स्वत:स नीतिमान समजणे/ढ़ोंग
- कलहप्रियता/भांडखोर असणे
- पूर्वग्रह
- अभिमानी होणे/विशेष असल्यासारखे वागणे

## गर्विष्ठ हृदयाचे परिणाम

### लज्जित करते

गर्वासोबत लज्जा येते. “गर्व झाला की अप्रतिष्ठा आलीच, पण नम्र जनांच्या ठायी ज्ञान असते” (नीतिसूत्रे ११:२).

### त्याचा परिणाम लज्जा व विनाश यांत होतो

**गर्व झाला की नाश ठेवलेला; मनाचा ताठा अध:पाताचे मूळ होय** (नीतिसूत्रे १६:१८).

**“तेव्हा त्याने लोकसमुदायाला पुन्हा बोलावून म्हटले, तुम्ही सर्व जण माझे ऐका व समजून घ्या; बाहेरून माणसाच्या आत जाऊन त्याला भ्रष्ट करील असे काही नाही. तर माणसाच्या आतून जे निघते तेच त्याला भ्रष्ट करिते. ज्या कोणाला ऐकावयास कान आहेत तो ऐको. तो लोकसमुदायातून निघून घरी गेल्यावर त्याच्या शिष्यांनी त्याला त्या दाखल्याविषयी विचारले. तो त्यांना म्हणाला, तुम्ही देखील इतके अज्ञानी आहा की काय? जे काही बाहेरून माणसाच्या आत जाते ते त्याला भ्रष्ट करू शकत नाही, हे तुम्हाला समजत नाही काय? कारण ते त्याच्या अंत:करणात नव्हे तर त्याच्या पोटात जाते व शौचकुपातून बाहेर पडते. अशा रीतीने त्याने सर्व प्रकारचे अन्न शुद्ध ठरविले. आणखी तो म्हणाला, जे माणसातून बाहेर निघते तेच माणसाला भ्रष्ट करिते. कारण आतून म्हणजे माणसाच्या अंत:करणातून वाईट विचार निघतात; जारकर्मे, चोऱ्या, खून, व्यभिचार, लोभ, दुष्टपणा, कपट, कामातुरपणा, हेवा, शिव्यागाळी, गर्व, मूर्खपणा. ह्या सर्व वाईट गोष्टी आतून बाहेर निघतात व माणसाला भ्रष्ट करितात”** (मार्क ७:१४—२३).

येशूने गर्वास त्या गोष्टींसोबत यादीबद्ध केले आहे ज्या आतून येतात आणि माणसाला अशुद्ध करतात. गर्व विनाशकारक आहे आणि व्यक्तीच्या पतनास कारणीभूत ठरतो.

## स्वत:ची फसवणूक घडवून आणतो

गर्व आमची फसवणूक करतो. “खडकाच्या कपारीत उच्च स्थानी

वसणाऱ्या, तू आपल्या मनात समजतोस की मला खाली जमिनीवर कोण पाडणार? या तुझ्या मनाच्या अभिमानाने तुला दगा दिला आहे" (ओबद्या १:३). "म्हणून ही सर्व मलिनता व उचंबळून आलेला दुष्टभाव सोडून, तुमच्या जिवाचे तारण करावयास समर्थ असे मुळाविलेले वचन सौम्यतेने स्वीकारा" (याकोब १:२१).

नम्र हृदयात देवाचे वचन स्वीकार करण्याची पूर्वपात्रता आहे, कारण वचन आमच्या जीवनात अनुभवात्मक वास्तविकता ठरले आहे आणि आमच्यामध्ये कलम करण्यात आले आहे. पण गर्व आम्हास देवाच्या वचनाचा स्वीकार करण्याच्या मार्गात अडखळण आणतो आणि आमची फसवणूक करतो. फसवणूक म्हणजे देवाच्या वचनाचे भरपूर ज्ञान असणे, पण त्या वचनास आमच्या जीवनात बदल घडवून आणण्याची संधी न देणे होय. जे प्रकटीकरण बदल घडवून आणत नाही ते फसवणूक करणारे ठरू शकते, कारण आपण विचार करू शकतो की आम्ही 'अधिकार प्राप्त करणारे' ठरलो आहोत, पण आम्ही केवळ "जाणते" आहोत. जाणणे आणि अधिकार करणे ह्या पूर्णपणे दोन वेगळ्या गोष्टी आहेत. आध्यात्मिक मस्तिष्क ज्ञान असणे आणि वचनाने देहधारण करावा — जेव्हा वचन आमच्या जीवनांत अनुभवात्मक वास्तविकता ठरते — या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. अनुभवात्मक वास्तविकतेवाचून सखोल आध्यात्मिक ज्ञान बाळगणे व्यक्तीस अहंकारी बनविते.

बायबल म्हणते, "आता मूर्तीला दाखविलेल्या नैवेद्याविषयी : आपल्या सर्वांना ज्ञान आहे हे आपल्याला ठाऊक आहे. ज्ञान फुगविते, प्रीति उन्नति करिते" (१ करिंथ. ८:१). पण जर आपण नम्र अंत:करण बाळगले, तर ते केवळ ज्ञानापेक्षा आमच्या जीवनात

वचनास वास्तविकता ठरवील. सैतानाची लबाडी आमच्या जीवनात हळूच कुजबुज, ओरडा म्हणून प्रवेश करते. तो प्रकाशाचा दूत असल्याचे जरी सोंग करीत असला, तरीही तो अंधारात चालतो, उजेडात नव्हे. तो छपरावरून असे म्हणून ओरडत नाही की, “मी तुमच्या जीवनाची फसवणूक करणारा येथे आहे.” पण त्याऐवजी ती फसवणूक शांत कुजबूज म्हणून येते, हळूच आमच्या मनात प्रवेश करते, आम्हास फसविते आणि सत्य लपवून टाकते.

## दोष आणि देवाचा न्याय

आमच्या जीवनात गर्वाचा गंभीर परिणाम म्हणजे तो आमच्या जीवनावर दोष आणि देवाचा न्याय घडवून आणतो. पौल तीमथ्यास सांगतो की त्याने प्रभुच्या घरात पुढारी म्हणून कोणाची नेमणूक करावी : “त्याने गर्वाने फुगून जाऊन सैतानाप्रमाणे शिक्षेत पडू नये म्हणून तो नवशिका नसावा” (१ तीमथ्य. ३:६).

> गर्व अथवा अहंकार अगदी तोच दंड आणि देवाचा न्याय घेऊन येतो जो बंड केल्यावर सैतानावर आला, त्याला दंड देण्यात आला आणि देवाच्या सान्निध्यातून त्याला दूर करण्यात आले.

तरूण असो वा वृद्ध, आम्हास आपल्या अंतःकरणाचे परीक्षण करण्याची गरज आहे, आम्ही आमच्या जीवनांतील गर्वाचे मूळ उपटून टाकले पाहिजे. आमची प्रार्थना ही असावी, “प्रभु येशू, माझ्या जीवनातील गर्वाच्या मुळावर कुऱ्हाडीचा वार कर.”

# सौम्य आणि नम्र स्वभाव बाळगणे

## आम्हास नम्र होण्यासाठी पाचारण करण्यात आले आहे

सौम्यता, नम्रता आणि दीनता हे ख्रिस्ती सद्गुण आहेत. ज्या पाचारणासाठी आम्हास बोलाविण्यात आले आहे ते पाचारण आम्ही सौम्य व दीन होऊन पूर्ण करावे. पवित्र शास्त्र देवाच्या सेवकांस आज्ञा देते की त्यांनी नम्रतेने सेवा केली पाहिजे.

**पूर्ण नम्रता, सौम्यता व सहनशीलता दाखवून एकमेकांना प्रीतीने वागवून घ्या** (इफिस. ४:२).

**तेव्हा तुम्ही देवाचे पवित्र व प्रिय असे निवडलेले लोक आहा, म्हणून करुणायुक्त हृदय, ममता, सौम्यता, लीनता, सहनशीलता ही धारण करा** (कलस्सै. ३:१२).

**विरोध करणाऱ्यांना सौम्यतेने शिक्षण देणारा, असे असावे; कदाचित् देव त्यांना सत्याचे ज्ञान होण्यासाठी पश्चातापबुद्धी देईल** (२ तीमथ्य २:२५)

## नम्रता हे खरे बळ आहे हे समजून घ्या

नम्रता निर्बळता नाही — तथ्य ज्यावर खालील दिलेल्या वचनात भर देण्यात आला आहे.

**“पण मी तुम्हास सांगतो की, न्यायाच्या दिवशी सोर व सीदोन ह्यांना तुमच्यापेक्षा सोपे जाईल. हे कफर्णहूमा, तू आकाशापर्यंत चढविले जाशील काय? तू अधोलोकापर्यंत उतरशील; कारण तुझ्यामध्ये जी पराक्रमाची कृत्ये घडली ती सदोमात घडली असती तर ते आजपर्यंत राहिले असते. पण मी तुम्हास सांगतो की, न्यायाच्या दिवशी सदोमास तुझ्यापेक्षा सोपे जाईल. त्यावेळी येशू असे बोलू लागला : हे पित्या, स्वर्गाच्या व पृथ्वीच्या प्रभो, मी तुझे स्तवन करितो; कारण ज्ञानी व विचारवंत ह्यांच्यापासून**

**ह्या गोष्टी गुप्त ठेवून त्या तू बाळकांस प्रगट केल्या. खरेच हे पित्या, कारण हेच तुला योग्य दिसले. माझ्या पित्याने माझ्या हाती सर्व काही दिले नाही, आणि पुत्रावाचून व ज्या कोणास त्याला प्रगट करावयाची पुत्राची इच्छा असेल, त्यांच्यावाचून पित्याला कोणी ओळखीत नाही. अहो कष्टी व भाराक्रांत जनहो, तुम्ही सर्व माझ्याकडे या म्हणजे मी तुम्हाला विसावा देईन. मी जो मनाचा सौम्य व लीन आहे त्या माझे जू आपणांवर घ्या व माझ्यापासून शिका म्हणजे 'तुमच्या जिवांस विसावा मिळेल,'"** (मत्तय ११:२२,२९).

येशूने स्वत:चे वर्णन मनाचा सौम्य व लीन असे केले. मनाचा 'नम्र आणि लीन' होण्याविषयी जेव्हा कोणी तुच्छतेने बोलतो तेव्हा सावध असा. हे ख्रिस्ताचा स्वभाव आणि चरित्र याच्या अगदी विपरीत आहे! नम्रता पुनरूत्थित ख्रिस्ताचा सद्‌गुण आहे आणि आमच्या आत्म्यामध्ये पवित्र आत्म्याद्वारे उत्पन्न केला जातो.

**आत्म्याच्याद्वारे निष्पन्न होणारे फळ, प्रीति, आनंद, शांति, सहनशीलता, ममता, चांगुलपणा, विश्वासूपणा** (गलती ५:२२).

येशूने म्हटले,"'जे सौम्य' ते धन्य, कारण 'ते पृथ्वीचे वतन भोगतील'" (मत्तय ५:५). येशूने म्हटले, सौम्यता ही दुर्बळता नव्हे, तर बळ आहे. मोठमोठ्या विजयांची किल्ली नम्रतेचा आत्मा होय, कारण नम्र लोक पृथ्वीचे वारस होतील. जर आपण देवाच्या राज्याचे मोठे विजेते बनू इच्छित असू, तर आमच्याजवळ नम्रतेचा आत्मा असला पाहिजे.

## नेहमी सेवकवृत्ती बाळगावी

जे काही आपण करतो, त्यात नेहमी आपल्या अंत:करणाचे

परीक्षण करावे आणि म्हणावे, "प्रभु, मला सेवकाचे अंत:करण हवे आहे."

**तसेच आपणास स्वामी म्हणवून घेऊ नका; कारण तुमचा स्वामी एक आहे, तो ख्रिस्त होय. पण तुमच्यामध्ये जो मोठा असेल त्याने तुमचा सेवक व्हावे. जो कोणी स्वत:ला उंच करील तो नमविला जाईल आणि जो कोणी स्वत:ला नमवील तो उंच केला जाईल** (मत्तय २३:१०—१२).

## भर स्वत:स नम्र करण्यावर आहे

**अशी जी चित्तवृत्ति ख्रिस्त येशूच्या ठायी होती ती तुमच्या ठायीही असो; तो देवाच्या स्वरूपाचा असनूही देवाच्या बरोबरीचे असणे हा लाभ आहे असे त्याने मानले नाही, तर त्याने स्वत:ला रिक्त केले, म्हणजे मनुष्याच्या प्रतिरूपाचे होऊन दासाचे स्वरूप धारण केले; आणि मनुष्यप्रकृतीचे असे प्रगट होऊन त्याने मरण, आणि तेही वधस्तंभावरचे मरण सोसले; येथेपर्यंत आज्ञापालन करून त्याने स्वत:ला लीन केले. ह्यामुळे देवाने त्याला अत्युच्च केले, आणि सर्व नावांपेक्षा जे श्रेष्ठ नाव ते त्याला दिले; ह्यात हेतू हा की, स्वर्गात, पृथ्वीवर व पृथ्वीखाली प्रत्येक गुडघा येशूच्या नावाने टेकला जावा, आणि देवपित्याच्या गौरवासाठी प्रत्येक जिभेने येशू ख्रिस्त हा प्रभु आहे असे कबूल करावे** (फिलिप्पै. २:५—११).

## नेहमी स्वत:चे खरे मूल्यमापन करा

**कारण मला प्राप्त झालेल्या कृपादानांवरून मी तुम्हांपैकी प्रत्येक जणाला असे सांगतो की, आपल्या योग्यतेपेक्षा स्वत:ला अधिक मानू नका, तर देवाने प्रत्येकाला वाटून दिलेल्या विश्वासाच्या परिमाणानुसार मर्यादेने स्वत:ला माना** (रोम १२:३).

**बंधुजनहो, कोणी माणूस एखाद्या दोषात सापडला तरी जे तुम्ही आध्यात्मिक वृत्तीचे आहा ते तुम्ही अशाला सौम्य वृत्तीने ताळ्यावर आणा; तूही परीक्षेत पडू नये म्हणून स्वतःकडे लक्ष दे** (गलती ६:१).

## नम्रता सर्वदा प्रभुवर पूर्णपणे अवलंबून राहण्यात आहे

**तो अधिक 'कृपा करितो'. म्हणून शास्त्र म्हणते, 'देव गर्विष्ठांना विरोध करितो, आणि लीनांवर कृपा करितो'. म्हणून देवाच्या अधीन व्हा; आणि सैतानाला अडवा, म्हणजे तो तुम्हापासून पळून जाईल. देवाजवळ या म्हणजे तो तुम्हाजवळ येईल. अहो पापी जनहो, हात निर्मळ करा; अहो द्विबुद्धीच्या लोकांनो, आपली अंतःकरणे शुद्ध करा. कष्टी व्हा, शोक करा, रडा; तुमच्या हसण्याचा शोक होवो व तुमच्या आनंदाचा विषाद होवो. प्रभुसमोर नम्र व्हा, म्हणजे तो तुम्हास उच्च करील** (याकोब ४:६—१०).

खरी नम्रता आमच्या दुर्बळतेच्या जाणीवेपेक्षा आणि आमच्या गरजांच्या स्थितीपेक्षा अधिक आहे. जेव्हा आमच्या जीवनात सर्वकाही सुरळीत असते, आणि आम्ही प्रगती करीत असतो आणि देव सामर्थ्याने आमचा उपयोग करून घेत असतो, तेव्हा आम्हाला हे लक्षात ठेवण्याची आणि असे म्हणण्याची गरज आहे, "देवा, हे सर्वकाही तुझ्यामुळे आहे." मोठा आशीर्वाद, बळ आणि विजयाच्या समयीदेखील, आम्ही प्रभुवर आमचे पूर्णपणे अवलंबून राहणे ओळखले पाहिजे आणि त्यात आम्ही आनंदित झाले पाहिजे, हे जाणून की जी प्रत्येक उत्तम गोष्ट आमच्याजवळ आहे, ती त्याच्याकडून आली आहे. ही खरी नम्रता आहे.

**आम्ही स्वतः कोणतीही गोष्ट आपण होऊनच ठरविण्यास समर्थ**

**आहो असे नव्हे, तर आमच्या अंगची पात्रता देवाकडून आलेली आहे** (२ करिंथ. ३:५).

## अधीनता आणि पश्चाताप किल्ली आहेत

आमच्या अंत:करणात गर्व असल्याची शक्यता कबूल करण्याची आम्हास गरज आहे आणि आम्ही सतत आपल्या अंत:करणाचे, विचारांचे, प्रवृत्तींचे आणि कृत्यांचे परीक्षण केले पाहिजे. आम्ही ह्या समजूतीपासून सुटका प्राप्त करावी की आम्ही पूर्णपणे गर्वमुक्त आहोत.

**म्हणून देवाच्या अधीन व्हा; आणि सैतानाला अडवा, म्हणजे तो तुम्हापासून पळून जाईल. देवाजवळ या म्हणजे तो तुम्हाजवळ येईल. अहो पापी जनहो, हात निर्मळ करा; अहो द्विबुद्धीच्या लोकांनो, आपली अंत:करणे शुद्ध करा. कष्टी व्हा, शोक करा, रडा; तुमच्या हसण्याचा शोक होवो व तुमच्या आनंदाचा विषाद होवो** (याकोब ४:७—९).

आम्ही सतत प्रभुच्या सान्निध्यात स्वत:चे मूल्यमापन केले पाहिजे, त्याच्याप्रत समर्पित व्हावे, पश्चाताप करावा, आपले हात स्वच्छ करावे आणि आपली अंत:करणे शुद्ध करावी. आम्ही सतत देवास विनंती केली पाहिजे की त्याने आमच्या अंत:करणाचा ठाव घ्यावा आणि त्याच्या आत्म्याद्वारे, आमच्या जीवनातील गर्व अर्थात अहंकार प्रगट करावा. कारण नम्र व्यक्तीचा मान राखला जातो.

**गर्व मनुष्याला खाली उतरितो, पण ज्याचे चित्त नम्र तो सन्मान पावतो** (नीतिसूत्रे २९:२३).

* मोठमोठ्या विजयांची किल्ली नम्रतेचा आत्मा होय कारण नम्र लोक पृथ्वीचे वारस होतील. जर आपण देवाच्या राज्याचे मोठे विजेते बनू इच्छित असू, तर आमच्याजवळ नम्रतेचा आत्मा असला पाहिजे.

* जे काही आपण करतो, त्यात नेहमी आपल्या अंत:करणाचे परीक्षण करा आणि म्हणा, "प्रभु, मला सेवकाचे अंत:करण हवे आहे."

* मोठा आशीर्वाद, बळ आणि विजयाच्या समयीदेखील, आम्ही प्रभुवर आमचे पूर्णपणे अवलंबून राहणे ओळखले पाहिजे आणि त्यात आम्ही आनंदित झाले पाहिजे, हे जाणून की जी प्रत्येक उत्तम गोष्ट आमच्याजवळ आहे, ती त्याच्याकडून आली आहे. ही खरी नम्रता आहे.

## प्रार्थना

*पित्या, मी तुजपुढे येतो आणि तुला विनंती करतो की विनम्र हृदय बाळगण्यात तू माझी मदत करावी. परमेश्वर पित्या, माझ्या जीवनातील प्रत्येक भागात असलेल्या गर्वाचा त्याग करण्यात माझी मदत कर आणि मला सर्वदा तुजपुढे नम्रपणे चालण्याचे, सौम्यतेच्या व लीनतेच्या आत्म्यात चालण्याचे सामर्थ्य पुरीव. पित्या, तू माझ्याद्वारे आणि माझ्यात जे काही करू इच्छितोस, त्या बाबत मी केवळ तुजपुढे नम्र राहू इच्छितो. ही माझी इच्छा आहे. प्रभु येशू माझ्यातील गर्वाच्या मुळावर कुऱ्हाडीचा वार कर!*

# मुळावर कुऱ्हाडीचा वार



स्वार्थ • मत्सर • गर्व • वासना

# अध्याय ४

# वासनेच्या मुळावर कुऱ्हाडीचा वार

स्वार्थ, मत्सर आणि गर्वाच्या मुळांवर कुऱ्हाडीचा वार कसा करावा हे कळल्यानंतर, आता आपण आमच्या जीवनातील वासनेच्या मुळासंबंधी चर्चा करू या. वासना म्हणजे काय? वासना म्हणजे कोणतीही अनियंत्रित, अयोग्य, अतिरेकी, अमर्याद इच्छा — उत्कट इच्छा, तळमळ आणि एखाद्या गोष्टीची लालसा. बायबल वासनेची व्याख्या "लोभ अथवा अवास्तविक इच्छा" अशी करते. वासना हा जगाचा मार्ग आहे, ज्या पद्धतीने जग कार्य करते आणि त्यात चालते. वासना ही जग व्यापून टाकते.

**तुम्ही आपले अपराध व आपली पातके ह्यामुळे मृत झालेले होता; त्या पातकामध्ये तुम्ही पूर्वी चालत होता, अर्थात् ह्या जगाच्या रहाटीप्रमाणे अंतरिक्षांतील राज्याचा अधिपति म्हणजे आज्ञा मोडणाऱ्या लोकांत आता कार्य करणाऱ्या आत्म्याचा अधिपति ह्याच्या धोरणाप्रमाणे चालत होता; त्या लोकांत आम्हीही सर्व पूर्वी आपल्या दैहिक वासनांना अनुरूप असे वागलो, आपल्या देहाच्या व मनाच्या इच्छाप्रमाणे करीत होतो व स्वभावतः इतरांप्रमाणे क्रोधाची प्रजा होतो** (इफिस. २:१—३).

जगाचा मार्ग देहवासना आणि मनाच्या वासना पूर्ण करणे हा आहे — जर बरे वाटत असेल आणि त्यावेळेस आपणास सुख मिळत असेल — तर ते करा! एकेकाळी आम्ही ह्या जगाच्या चालीरीतिंचा भाग होतो. ज्यावर वासनेचे वर्चस्व आहे. आम्ही

त्यानुसार चालत होतो, शरीराच्या व मनाच्या अभिलाषा पूर्ण करीत होतो. पण येशूमुळे, आम्हाला आता वासनेचे वर्चस्व असलेल्या जगाचे असण्याची गरज नाही.

**त्यांच्या योगे मोलवान् व अति महान् अशी वचने आपल्याला देण्यात आली आहेत, ह्यासाठी की, त्यांच्या द्वारे तुम्ही वासनेपासून उत्पन्न होणारी जगातील भ्रष्टता चुकवून ईश्वरी स्वभावाचे वाटेकरी व्हावे** (२ पेत्र १:४).

वासनेमुळे ह्या जगात भ्रष्टाचार आणि नैतिक ऱ्हास आहे. पण सुवार्ता ही आहे की देवाने आम्हास त्याच्या वचनात अत्यंत मोलवान् व अति महान अशी वचने दिली आहेत, ज्यांच्या योगे आम्ही ह्या जगातील भ्रष्टतेपासून दूर पळ काढू शकतो. आम्हाला भ्रष्टाचाराच्या ह्याच जाळात सापडण्याचे कारण नाही. आम्ही त्यापासून वाचू शकतो. आमेन! इच्छा स्वत:मध्ये चुकीची नाही. खरे म्हणजे, आमच्या मनात उत्तम आणि स्वस्थ इच्छा असल्या पाहिजेत. जर आमच्या मनात इच्छा नसेल, तर आम्हास जीवनांत प्रेरणा प्राप्त होणार नाही आणि आम्ही जीवनांत प्रवाहप्रतित होऊ. बायबल म्हणते की आम्ही देवापासून अधिक प्राप्त करण्याची इच्छा धरली पाहिजे — त्याचे सान्निध्य, त्याचे सामर्थ्य आणि त्याचे वचन.

**म्हणजे परमेश्वराच्या ठायी तुला आनंद होईल; तो तुझे मनोरथ पूर्ण करील** (स्त्रोतसंहिता ३७:४).

**दुर्जन ज्याला भितो ते त्याजवर येईल, आणि धार्मिकांची इच्छा पूर्ण होते** (नीतिसूत्रे १०:२४).

**म्हणून मी तुम्हाला सांगतो, तुम्ही प्रार्थना करून जे काही मागाल**

**ते आपल्याला मिळालेच आहे असा विश्वास धरा म्हणजे ते तुम्हाला मिळेल** (मार्क ११:२४).

प्रार्थना करण्यापूर्वी, आमच्या मनात उत्तम आणि योग्य गोष्टींसाठी इच्छा असणे जरूरी आहे. समस्या तेव्हा उत्पन्न होते जेव्हा अयोग्य गोष्टींची इच्छा अनियंत्रित व अमर्याद होते.

**कोणाची परीक्षा होत असता, देवाने मला मोहात घातले, असे त्याने म्हणू नये; कारण देवाला वाईट गोष्टींचा मोह होत नाही आणि तो स्वतः कोणाला मोहात पाडीत नाही; तर प्रत्येक माणूस आपल्या वासनेने ओढला जातो व भुलविला जातो तेव्हा मोहात पडतो. मग वासना गर्भवती होऊन पापाला जन्म देते परिपक्व झाल्यावर मरणास उपजविते. माझ्या प्रिय बंधूनो, फसूं नका** (याकोब १:१३–१६).

परीक्षा म्हणजे आमच्या स्वतःच्या इच्छांनी व अभिलाषांनी, आमच्या स्वतःच्या वासनांनी ओढले जाणे. सैतानाच्या इच्छेने नव्हे अथवा आमच्या शेजाऱ्यांच्या इच्छेने नव्हे, तर आमच्या इच्छेने ज्या कार्यरत आहेत आणि आम्हास ओढण्याचा व मोहीत करण्याचा प्रयत्न करीत आहेत, त्याद्वारे त्याचा प्रतिकार करण्याची आमची इच्छा कमकुवत करीत आहेत. परीक्षा तेव्हा येते जेव्हा आमच्या अंतःकरणात वाईटाची इच्छा उत्पन्न होते आणि त्या इच्छेचा नाकार करण्याची आमची इच्छा कमकुवत होते कारण आम्ही आमच्या विचारांचे, विवेक बुद्धीचे, कल्पनांचे आणि जी माहिती आम्ही स्वतःस देतो तिचे रक्षण करीत नाही. ती इतर लोकांच्या प्रभावाद्वारे घडू शकते. अथवा ती सूचक विचारांद्वारे, मतांद्वारे आणि कल्पनांद्वारे येऊ शकते जो सैतान आमच्या मनात घालतो. आम्हास ओढून नेणाऱ्या आमच्या इच्छा आहेत. आम्हास त्या इच्छा अधीन करावयास शिकले पाहिजे आणि त्यांस नियंत्रणात ठेवले पाहिजे.

सैतान आम्हास पाप करावयास बळजबरी करू शकत नाही. तो आमच्या मनात सूचक विचार घालतो जे आमच्या इच्छांस उत्तेजित करतात आणि जर त्या इच्छा नियंत्रित नसतील, तर ते परीक्षांचा प्रतिकार करण्याच्या आमच्या इच्छांस दुर्बळ करू शकतात.

**कारण जगात जे सर्व आहे ते, म्हणजे देहाची वासना, डोळ्यांची वासना व संसाराविषयीची फुशारकी, ही पित्यापासून नाहीत, तर जगापासून आहेत; आणि जग व त्याची वासना ही नाहीशी होत आहेत; पण देवाच्या इच्छेप्रमाणे करणारा सर्वकाळ राहतो** (१ योहान २:१६,१७).

वर दिलेल्या उताऱ्यांत, तीन गोष्टींचा उल्लेख आहे — देहाची वासना, डोळ्यांची वासना व संसाराविषयीची फुशारकी. जग डोळ्यांच्या आणि देहाच्या वासनेच्या तावडीत आहे. “देहाच्या वासनेचा” अर्थ अशा गोष्टी ज्या देहाच्या पापमय अभिलाषा संतुष्ट करतात. आम्ही जे काही पाहतो आणि त्या “गोष्टीवर” अधिकार प्राप्त केल्यावाचून ज्या गोष्टीची आम्ही इच्छा धरतो त्यांस डोळ्यांची वासना तृप्त करते.

परीक्षा म्हणजे आमच्या स्वत:च्या इच्छांनी व अभिलाषांनी, आमच्या स्वत:च्या वासनांनी ओढले जाणे.

परीक्षा तेव्हा येते जेव्हा आमच्या अंत:करणात वाईटाची इच्छा उत्पन्न होते आणि त्या इच्छेचा नाकार करण्याची आमची इच्छा कमकुवत होते

आम्हास त्या इच्छा अधीन करावयास शिकले पाहिजे आणि त्यांस नियंत्रणात ठेवले पाहिजे.

वासनेच्या मुळाची लक्षणे आपण कशी ओळखू शकतो?

# देहवासना

## कुठल्याही वस्तूंसाठी, ज्यात उत्तम भोजनाचा समावेश आहे, अनियंत्रित इच्छा

जितक्यांदा आम्ही मद्य पिणाऱ्या, सिगारेट ओढणाऱ्या, मादक पदार्थांचे सेवन करणाऱ्या व्यक्तीकडे दोष देणारे बोट दाखवितो, तितक्यांदा आम्ही त्या व्यक्तीस विसरून जातो ज्याला उत्तम भोजनाची आवड असते. ह्या सर्व गोष्टी सारख्याच आहेत!

**सर्व गोष्टींची मला मोकळीक आहे, तरी सर्व गोष्टी हितकारक असतातच असे नाही; सर्व गोष्टींची मला मोकळीक आहे, तरी मी कोणत्याही गोष्टीच्या आहारी जाणार नाही. अन्न पोटासाठी व पोट अन्नासाठी आहे; पण त्या दोहोंचाही अंत देव करील. पण शरीर जारकर्मासाठी नाही, तर प्रभुसाठी आहे; आणि शरीरासाठी प्रभु आहे** (१ करिंथ. ६:१२,१३).

सर्व गोष्टींची मला मोकळीक आहे, पण मी कुठल्याही गोष्टीच्या सामर्थ्याधीन होणार नाही. कधीकधी आपल्या आवडीच्या भोजनाचा स्वाद घेणे मान्य ठरते, पण जर आपण त्याच्या ताब्यात असाल, तर ते चुकीचे आहे. "अन्न पोटासाठी व पोट अन्नासाठी आहे; पण त्या दोहोचाही अंत देव करील" (१ करिंथ. ६:१३अ).

पौल त्या लोकांविषयी लिहितो, ज्यांचा देव त्यांचे पोट आहे : "नाश हा त्यांचा शेवट, पोट हे त्यांचे दैवत, आणि निर्लज्जपणा हे त्यांचे भूषण आहे; त्यांचे चित्त ऐहिक गोष्टीत असते" (फिलिप्पै. ३:१९). त्यांची भूक त्यांच्यावर सत्ता गाजविते आणि त्यांस नियंत्रणात ठेविते. ही देहवासना आहे, ज्यात एखाद्या वस्तूसाठी

अनियंत्रित इच्छा असते — उत्तम भोजनासाठी सुद्धा. जुन्या करारात, आम्ही वाचतो की देवाचे लोक मिसर देशातून बाहेर पडले होते, गुलामगिरीतून त्यांची सुटका झाली होती, त्यांनी तांबडा समुद्र ओलांडला होता आणि ते विपुलतेच्या देशाच्या मार्गावर होते ज्याविषयी देवाने त्यांस अभिवचन दिले होते की त्या देशात दुधामधाच्या धारा वाहतील. आणि अचानक त्यांना मांस खाण्याची अनावर इच्छा झाली. ही इच्छा इतकी तीव्र होती की ती मांसासाठी वासना ठरली.

**“त्यांच्यामध्ये जो मिश्र समुदाय होता त्याने सोस घेतला; आणि इस्राएल लोकही पुन्हा रडगाणे गाऊन म्हणाले, आम्हाला खावयाला मांस कोण देईल? मिसर देशात आम्हाला मासे फुकट खावयाला मिळत असत त्याची आठवण आम्हाला येते. त्याचप्रमाणे काकड्या, खरबूजे, भाजी, कांदे, लसूण ह्यांचीही आम्हाला आठवण येते; पण आता आमचा जीव सुकून गेला आहे; येथे ह्या मान्याशिवाय आमच्या दृष्टीस काहीच पडत नाही”** (गणना ११:४—६).

एक गौरवी योजना आणि दैवी हेतू पूर्ण करीत असतांना, इस्राएली लोक उत्तम भोजनाची अनावर इच्छा धरू लागले. त्यांची शारीरिक भूक तृप्त करण्याच्या तीव्र इच्छेने प्रथम स्थान प्राप्त केले आणि ते देवाची योजना व हेतू पूर्ण करण्यापेक्षा अधिक महत्वाचे ठरले. माझ्या मनात विचार येतो की काही वेळ उपवासात आणि प्रार्थनेत घालविण्याऐवजी आम्ही अन्नास कितीदा महत्वाचे स्थान दिले आहे!

इस्राएली लोकांनी शेवटी देवाची परीक्षा घेतली. बायबल आम्हास सांगते की आम्ही प्रभु परमेश्वराची परीक्षा घेता कामा नये.

दिवसा मेघ व रात्रभर अग्निप्रकाश ह्यांच्या योगे तो त्यांस नेत असे. त्याने रानांत खडक फोडून खोल जलाशयाप्रमाणे भरपूर पाणी त्यांस प्यावयास दिले. त्याने खडकातून पाण्याचे झरेही काढिले, नद्याप्रमाणे पाणी वाहविले. तथापि ते त्याच्याविरुद्ध अधिकाधिक पातक करू लागले, परात्परविरुद्ध रूक्ष अरण्यात त्यांनी बंड केले. त्यांनी आपली इच्छा तृप्त करण्यासाठी अन्न मागून आपल्या मनात देवाची परीक्षा पाहिली. ते देवाविरुद्ध बोलले; ते म्हणाले, रानात भोजनाची सिद्धता करण्यास देव समर्थ आहे काय? पाहा, त्याने खडकावर टोला मारिला तो पाणी उसळून वाहू लागले, व त्याचे लोट चालले; तो भाकरही देण्यास समर्थ आहे काय? तो आपल्या लोकांस मांस पुरवील काय? हे ऐकून परमेश्वर कोपला आणि याकोबावर त्याचा अग्नि पेटला; इस्राएलावर त्याचा क्रोध भडकला कारण त्यांनी देवावर विश्वास ठेविला नाही, आणि त्याने सिद्ध केलेल्या तारणावर भरवसा ठेविला नाही. तरी त्याने वरती आभाळास आज्ञा केली, व आकाशाद्वारे उघडली. खाण्याकरिता त्याने त्यांच्यावर मान्याचा वर्षाव केला, आणि त्यांस स्वर्गातले धान्य दिले. त्याने पूर्वेचा वारा आकाशात वाहविला, आणि आपल्या सामर्थ्याने दक्षिणेचा वारा आणिला. त्याने त्यांच्यावर धुळीसारखा मांसाचा आणि समुद्राच्या वाळूसारखा पक्ष्यांचा वर्षाव केला; त्याने त्यांच्या छावणीमध्ये, त्यांच्या वस्तीभोवती ते पाडिले. ते खाऊन ते अगदी तृप्त झाले; अशा रीतीने त्यांची इच्छा त्याने पुरविली. त्यांची इच्छा पूरी झाली नव्हती, अजून त्यांच्या तोंडी अन्नाचा घास होता, तोच त्यांच्यावर देवाचा कोप भडकला, आणि त्याने त्यांच्यातल्या धष्टपुष्टांस मारून टाकिले, इस्राएलांच्या तरूणास ठोकून खाली पाडिले, इतके सर्व झाले तरी ते पाप करीतच राहिले, व त्याच्या अद्‌भुत कृत्यांवर त्यांनी विश्वास

**ठेविला नाही** (स्त्रोतसंहिता ७८:१४—३२).

असाच दुसरा परिच्छेद आहे :

**त्याने तांबड्या समुद्राला धमकाविले आणि तो कोरडा झाला, आणि मैदानावरून चालावे तसे त्या जलाशयाच्या खोल स्थलांवरून त्याने त्यांस चालविले. त्याने त्यांस त्यांचा द्वेष करणाऱ्याच्या हातून सोडविले. शत्रूच्या हातून त्यांस मुक्त केले. त्याचे वैरी पाण्यात गडप झाले, त्यांतला कोणीही उरला नाही. तेव्हा त्यांनी त्याच्या वचनावर विश्वास ठेविला; त्यांनी त्याची स्तोत्रे गाइली. तरी ते त्याची कृत्ये लवकरच विसरले. त्याच्या योजनेसंबंधाने त्यांनी धीर धरिला नाही. रानात त्यांची वासना अनावर झाली; ओसाड प्रदेशात त्यांनी देवाची परीक्षा पाहिली. तेव्हा त्याने त्यांच्या मागणीप्रमाणे त्यांस दिले, पण त्यांचा जीव झुरणीस लाविला** (स्त्रोतसंहिता १०६:९—१५).

जेव्हा मद्य, सिगारेट, अथवा मादक पदार्थांसारख्या वस्तूंसाठी अनियंत्रित इच्छा असते, तेव्हा आम्ही त्यांस 'व्यसन' म्हणतो. जेव्हा चमचमीत जेवणासाठी आम्हास अनावर इच्छा होते, त्यास 'खादाडपणा' म्हणतात. दोन्ही देहाच्या वासना आहेत आणि येशू ह्यांच्या मुळावर प्रहार करावयास आला.

नार्कोटिक्स एनॉनिमस यांस त्यांच्या पुस्तकातील "व्यसनी कोण आहे?" ह्या प्रकरणात, म्हणावयाचे आहे, *"आमच्यापैकी बहुतेकांस या प्रश्नांवर पुन्हा विचार करावयाची गरज भासत नाही, आम्हास माहीत आहे! आमचे संपूर्ण जीवन व विचार कुठल्या ना कुठल्यातरी प्रकारे मादक पदार्थांवर केंद्रित होते — आणखी मिळविण्याचे मार्ग व पद्धती यांच्या शोधात राहणे. आम्ही त्यांचा उपयोग करण्यास*

*जगत होतो आणि तसे जगण्याची आम्हाला सवय झाली होती. अगदी सोप्या शब्दांत, व्यसनी तो पुरुष किंवा स्त्री आहे जिचे जीवन मादक औषधांच्या ताब्यात आहे. आम्ही लोक आहोत जे सतत आणि उत्तरोत्तर वाढत जाणाऱ्या रोगाच्या कचाट्यात आहोत ज्याचा अंत नेहमीच सारखाच असतो : बंदीवास, संस्था आणि मृत्यू."* त्यात पुढे सांगितले आहे की मादक पदार्थांचे सेवन करणारा व्यक्ती कसा विचार करतो. त्यात म्हटले आहे, *"जोवर मादक औषधी संपली नाही तोवर आम्हाला मादक पदार्थांत समस्या आहे असा आमच्यापैकी अनेकांनी कधीच विचारच केला नाही. जेव्हा इतरांनी आम्हाला सांगितले की आमच्यात समस्या आहे, तेव्हा आम्हाला हा विश्वास होता की आमचे काही चुकलेले नाही, चुकले जगाचे आहे. आम्ही ह्या मताचा उपयोग आमच्या आत्मनाशक वर्तनाचे समर्थन करण्यासाठी केला."*

ज्या लोकांत मादक पदार्थांसाठी अशाप्रकारची अनावर इच्छा असते, ते सामान्यतः कधी कबूल करीत नाहीत की त्यांना समस्या आहे. जेव्हा लोक त्यांस सांगतात की समस्या आहे, तेव्हा ते विचार करतात की इतर लोक त्यांचा आनंद चोरून नेऊ इच्छितात. आम्ही ह्या कारणाचा उपयोग या गोष्टीचे समर्थन करण्यासाठी करतो जे खरोखर एक बंधन अथवा वासना आहे.

## अनिवार्य सवयी अथवा इच्छा

वासनेचे दुसरे लक्षण म्हणजे अनिवार्य सवयी अथवा इच्छा आहेत. गरजेपेक्षा जास्त झोप काढणे — उदाहरणार्थ, जर आपण दिवसातून १२ तास झोपत असाल आणि आपणास खरोखर ८ तासांची गरज आहे, तर अतिरिक्त ४ तास त्या व्यसनाचा भाग आहे. अथवा जर

आपणास वाटत असेल की महिन्यातील प्रत्येक आठवड्यात एक सिनेमा पाहणे अत्यंत जरूरी आहे, तर ही अनिवार्य सवय आणि इच्छा झाली. दुसरे उदाहरण जाणूनबुजून खरेदी करण्याचे क्षेत्र. जर आपणास वाटत असेल की दर आठवड्यात आपण खरेदी करावयास गेलेच पाहिजे अथवा काहीतरी चुकले, आणि जीवन पुढे चालू शकत नाही. तर ही अनिवार्य सवय, इच्छा आणि देहवासना आहे. जर आपण सुखविलासाच्या काही वस्तू जवळ बाळगल्या पाहिजेत असे आपणास वाटते अथवा आपणास वाटते की आपल्या जोड़ीदाराने आपणास बक्षीस दिलेच पाहिजे, तर ती एक अनिवार्य सवय अथवा इच्छा बनते आणि ही देहवासना होय. जी गोष्ट आम्हावर नियंत्रण करते आणि गुलामाच्या रूपात आम्हाला बंधनात ठेवते, ती गोष्ट व्यसन होय.

**दुर्जनाला त्याची स्वतःचीच दुष्कर्मे पछाडितात; तो आपल्याच पापाच्या पाशात सापडतो** (नीतिसूत्रे ५:२२).

आमची पापे आम्हास फसवितात आणि आम्हाला गुलाम बनवून बंधनात ठेवतात.

**मी तुम्हाला खचित खचित सांगतो, जो कोणी पाप करितो तो पापाचा दास आहे** (योहान ८:३४).

**ते त्यांना स्वतंत्रतेचे वचन देतात आणि स्वतः तर भ्रष्टतेचे दास आहेत; कारण मनुष्य ज्याच्या कह्यांत जातो त्याचा तो दासही बनतो** (२ पेत्र २:१९).

जी गोष्ट आमच्यावर विजय मिळविते ती आम्हास बंधनात ठेवते. आम्हास हे कबूल करावे लागेल की तेथे वासना आहे.

## लैंगिक विकार

तिसरे लक्षण होय लैंगिक विकार. आमच्या यौन अभिलाषांची योजना आणि उत्पत्ती देवाने केली होती. देवाने ज्याप्रकारे यौन अभिलाषांची योजना तयार केली, ती त्याच्या दृष्टीने शुद्ध आहे. वैवाहिक जीवनांतर्गत ती पवित्र आहे आणि ज्याप्रकारे तिची योजना आखण्यात आली आणि तिची उत्पत्ती करण्यात आली, त्यात काहीही चुकीचे नाही. तथापि, अस्वाभाविक यौनक्रिया आणि ज्याची योजना देवाने केली नाही अशाप्रकारचे यौनसुख देवासमोर मान्य नाही. अनेक ख्रिस्ती लोक आहेत जे त्यांच्या यौन अभिलाषेच्या क्षेत्रात त्यांच्या देहवासनांच्या बंधनात आहेत. रोम १:१८—३२ ही वचने देवाच्या क्रोधाविषयी सांगतात.

**वास्तविक जी माणसे अनीतीने सत्य दाबून ठेवतात त्यांच्या अभक्तीवर व अनीतीवर देवाचा क्रोध स्वर्गातून प्रगट होतो. कारण देवाविषयी प्राप्त होणारे ज्ञान त्यांच्यात दिसून येते; कारण देवाने ते त्यांना दाखवून दिले आहे. कारण सृष्टीच्या निर्मितीपासून त्याच्या अदृश्य गोष्टी म्हणजे त्याचे सनातन सामर्थ्य व देवपण ही निर्मिलेल्या पदार्थांवरून ज्ञात होऊन स्पष्ट दिसत आहेत, अशासाठी की, त्यांना कसलीही सबब राहू नये. देवाला ओळखूनसुद्धा त्यांनी देव म्हणून त्याचे गौरव केले नाही किंवा त्याचे आभार मानले नाहीत; पण ते आपल्या कल्पनांनी शून्यवत् झाले आणि त्यांचे निर्बुद्ध मन अंधकाराने भरून गेले. स्वत:ला शहाणे म्हणता म्हणता ते मूर्ख बनले; आणि अविनाशी देवाच्या गौरवाची, नाशवंत मनुष्य, पक्षी, चतुष्पाद पशु व सरपटणारे प्राणी ह्यांच्या प्रतिमेच्या रूपाशी त्यांनी अदलाबदल केली. ह्यामुळे ते आपल्या मनाच्या वासनांत असतांना देवाने त्यांना**

**अशुद्धतेच्या स्वाधीन केले; असे की, त्यांच्या देहाची त्यांच्या त्यांच्यातच विटंबना व्हावी. त्यांनी देवाच्या खरेपणाची लबाडीशी अदलाबदल केली, आणि निर्माणकर्त्याऐवजी निर्मितांची भक्ति व सेवा केली; तो निर्माणकर्ता तर युगानुयुग धन्यवादित आहे. आमेन. ह्या कारणांमुळे देवाने त्यांना दुर्वासनांच्या स्वाधीन केले; त्यांच्यातल्या स्त्रियांनी शरीराचा नैसर्गिक उपभोग सोडून विपरीत आचरण केले. तसेच पुरुषांनीही स्त्रियांचा नैसर्गिक उपभोग सोडून परस्पर कामसंतप्त होऊन पुरुषांनी पुरुषांबरोबर अनुचित कर्म केले आणि त्यांनी आपल्या भ्रांतीचे योग्य प्रतिफळ आपल्याठायी भोगले. आणखी ज्याअर्थी देवाची जाणीव ठेवण्यास ते मान्य झाले नाहीत, त्याअर्थी देवाने त्यांना अनुचित कर्मे करण्यास विपरीत मनाच्या स्वाधीन केले. सर्व प्रकारची अनीति, दुष्टपणा, लोभ, वाईटपणा ह्यांनी ते भरलेले असून, हेवा, खून, कलह, कपट, कुबुद्धी ह्यांनी पुरेपुर भरलेले होते. ते चहाडखोर, निंदक, देवाला तिटकारा असलेले, उद्धट, गर्विष्ठ, बढाईखोर, कुकर्मकल्पक, मातापितरांची अवज्ञा करणारे, निर्दय, असे होते. जे ह्या रीतीने वागतात ते मरणास पात्र आहेत, हा देवाचा निर्णय त्यांना ठाऊक असूनही ते स्वतः त्याच गोष्टी करीत असतात, इतकेच केवळ नव्हे तर त्या करणाऱ्यांना संमतीही देतात** (रोम १:१८—३२).

बायबल स्पष्टपणे इशारा देते की समलैंगिकता चुकीची आहे. एक पाश्चात्य मत आहे जेथे लोक असा विचार करतात की देवाने समलिंगी लोकांस उत्पन्न केले असावे. ही विचारसरणी हळूहळू आमच्या देशातही प्रवेश करीत आहे. देवाने आमच्यापैकी कोणालाही समलिंगी असे उत्पन्न केले नाही. हा एक विकार आहे आणि देवाच्या नियमाविरुद्ध आहे. हे अस्वाभाविक आहे, आणि देवाने आमची लैगिंकता अशाप्रकारे घडविलेली नाही. हे पाप

आहे आणि आम्ही त्यावर पाघंरूण घालू शकत नाही. समलैंगिकता देवाच्या दृष्टीने मान्य नसतांना ते मान्य आहे असे आम्ही म्हणू शकत नाही. रोम १:२८ म्हणते की, ज्याअर्थी “देवाची जाणीव ठेवण्यास ते मान्य झाले नाहीत, त्याअर्थी देवाने त्यांना अनुचित कर्मे करण्यास विपरीत मनाच्या स्वाधीन केले.” जेव्हा लोक आपल्याच मताने चालण्याचा आग्रह करतात, आपल्या अस्वाभाविक इच्छा—अभिलाषांचा पाठपुरावा करतात, तेव्हा देव माघार घेतो आणि व्यक्तीचे मन अनैतिक (अमान्य, तिरस्कृत, निरूपयोगी, कुचकामी) होते.

त्यांच्या विचार प्रक्रियेत इतका अंधार माजतो की ते विश्वास करू लागतात की त्यांची अस्वाभाविक जीवनशैली खरोखर सामान्य आहे. उदाहरणार्थ, समलैंगिक असा विचार करतात की त्यांस असेच घडविण्यात आले आहे, परंतु बायबल त्यास पाप म्हणते! जेव्हा व्यक्ती आपल्या विचारानुसार अथवा कल्पनेनुसार चालू इच्छितो, तेव्हा बायबल म्हणते की देव बाजूला होतो आणि म्हणतो, “तुला हे करायचे आहे, करीत राहा. जर आपण आपल्या मार्गाने चालू इच्छिता, तर ठीक आहे.” लैंगिक विकार, अनैतिकता, विवाहपूर्व लैंगिक संबंध, विवाहबाह्य लैंगिक संबंध, व्याभिचार, समलैंगिकता अगम्यगमन देवापुढे अमान्य आहेत.

लैंगिक विकाराची इतर स्वरूपे देखील आहे, जसे लैंगिक अनुभवांचे कल्पना चित्र रंगविणे. कदाचित आपण शरीराने ते कृत्य करीत नसाल, पण आपण आपल्या खोलीत बसून सर्व प्रकारच्या गोष्टींची कल्पना करता. हा लैंगिक विकार आहे. ही देहवासना आहे आणि देवापुढे अमान्य आहे. आपल्या जोडीदारासोबत शारीरिक समागम

करीत नसतांनाही लैंगिक सुख देणाऱ्या वस्तूंचा उपयोग करणे ही सुद्धा लैंगिक विकृति आहे. हस्तमैथुनाच्या बंधनात असणे (सवयीनुसार हस्तमैथून करणे) लैंगिक विकाराचे आणि देहवासनेचे दुसरे उदाहरण आहे. हे आपणास बंधनात ठेवीत असेल आणि आपणास स्वतंत्र होण्याची गरज आहे. आपल्या जीवनातील ह्या समस्या देव दूर करू इच्छितो.

## डोळ्यांची वासना

### अश्लील दृश्ये (चित्र) पाहणे

“वाइटाच्या प्रत्येक प्रकारापासून दूर राहा” (१ थेस्सल.. ५:२२). अनेक विश्वासणारे त्यांच्या घरात अशाप्रकारची सामुग्री आल्यामुळे अश्लीलतेच्या पाशात गुतंले आहेत. आमच्या सकाळच्या वृत्तपत्रातसुद्धा अशा जाहीराती आणि स्तंभ असतात ज्यात कमी वस्त्रे घातलेल्या स्त्रियांचे चित्र असते. वृत्तपत्रांत आता फक्त बातम्या नसतात, तर जवळजवळ प्रत्येक पानावर अर्धनग्न स्त्रियांची चित्रे असतात. ही चित्रे न पाहता केवळ बातम्या वाचणे कठीण आहे. आज अशी चित्रे जेथे पाहावी तेथे, बिल–बोर्डच्या माध्यमाने, पोस्टरवर, इंटरनेट इत्यादीवर गर्दी करीत असतात. अनेक लोक अशाप्रकारे अश्लीलतेच्या पाशात सापडतात आणि आम्हाला त्याविरुद्ध स्वत:चे रक्षण करण्याची गरज आहे कारण अश्लीलता ही डोळ्यांची वासना होय.

### घाणरडे विचार आणि अनैतिक कल्पना

लोक घाणेरड्या विचारांत आणि अनैतिक कल्पनांत मग्न असतात.

घाणरडे विचार आणि कल्पना डोळ्यांच्या वासनेचा भाग आहेत. बायबल आम्हास प्रोत्साहन देते की आम्ही पवित्र आणि शुद्ध गोष्टींवर विचार करावा.

**“बंधूनो, शेवटी इतके सांगतो की, जे काही सत्य, जे काही आदरणीय, जे काही न्याय्य, जे काही शुद्ध, जे काही प्रशंसनीय, जे काही श्रवणीय, जो काही सद्‌गुण, जी काही स्तुति, त्यांचे मनन करा”** (फिलिप्पै. ४:८).

## सुंदर स्त्रीपुरुषांबद्‌दल आकर्षण

हे आम्हा सर्वांना जवळचे वाटते आणि ही डोळ्यांची वासना आहे. काही लोक आपली डोकी सरळ ठेवू शकत नाहीत. जितक्यांदा सुंदर व्यक्ती जवळून जाते तितक्यांदा त्यांची मान वळते. येशूने म्हटले, “मी तर तुम्हाला सांगतो, जो कोणी एखाद्या स्त्रीकडे कामेच्छेने पाहतो त्याने आपल्या मनात तिच्याशी व्यभिचार केलाच आहे” (मत्तय ५:२८).

## लोभ

लोभ म्हणजे जे दुसऱ्यांजवळ आहे त्याची इच्छा धरणे. बायबल आम्हास इशारा करते की लोभ ही मूर्तिपूजा आहे. आम्ही नेहमीच अशा व्यक्तीकडे बोट दाखवितो जो चित्रापुढे, मुर्तीपुढे, अथवा पुतळ्यापुढे वाकतो, त्यांस ही जाणीव नसते की त्यांच्या अंत:करणातील लोभ ही देखील मूर्तिपूजा आहे. इतरांजवळ जे काही आहे ते मिळविण्याची तीव्र इच्छा जर आपल्या मनात असेल, तर तो लोभ आहे. ही मूर्तिपूजा आहे.

**कारण लहानथोर सर्व स्वहिताला हपापलेला आहेत; संदेष्ट्यापासून याजकापर्यंत सगळे कपटांचा व्यवहार करितात** (यिर्मया ६:१३).

**तर पृथ्वीवरील तुमचे अवयव म्हणजे जारकर्म, अमंगळपणा, कामवासना, कुवासना व लोभ—ह्याला मूर्तिपूजा म्हणावे—हे जिवे मारा** (कलस्सै. ३:५).

लोभ हे मूर्तीपूजेचे एक स्वरूप होय कारण ते देवासाठी असलेल्या आमच्या इच्छेपेक्षा दुसऱ्या गोष्टीसाठी असलेल्या इच्छेस जास्त महत्वाचे स्थान देते. मूर्ती म्हणजे देवाच्या आणि आमच्या व आम्ही आत्म्यात आणि सत्यात देवासोबत राखत असलेल्या संबंधादरम्यान येणारी कुठलीही गोष्ट. ही चित्र अथवा पुतळा यासारखी कुठली भौतिक वस्तू असू शकते, अथवा कुठल्यातरी गोष्टीसाठी 'प्राणिक' स्नेह यास देव आध्यात्मिक मूर्तीपूजेचे स्वरूप मानतो. आमच्या जीवनांत देवाचे स्थान घेणारी कुठलीही वस्तू मूर्ती आहे, आणि ती एखादी व्यक्ती, अन्नपदार्थ, यौनेच्छा, उद्योग व्यवसाय, क्रीडा, धर्म, अथवा उपासनेचे स्वरूप असू शकते.

देव म्हणतो, "आपल्या शेजाऱ्याच्या घराचा लोभ धरू नको, आपल्या शेजाऱ्याच्या स्त्रीची अभिलाषा धरू नको, आपल्या शेजाऱ्याचा दास, दासी, बैल, गाढव अथवा त्याची कोणतीही वस्तू ह्यांचा लोभ धरू नको" (निर्गम २०:१७). आणखी कोणाजवळ असलेल्या वस्तूकडे मी पाहतो आणि म्हणतो, "मलादेखील ती वस्तू हवी," तर हा लोभ आहे. येशू आम्हास सावध करतो की आम्ही लोभापासून जपावे : "आणखी त्याने त्यांना म्हटले, संभाळा, सर्व प्रकारच्या लोभापासून दूर राहा; कारण कोणाजवळ पुष्कळ संपत्ती असली तर ती त्याचे जीवन होते असे नाही" (लूक १२:१५).

## पैसा, सत्ता, प्रसिद्धी, पद आणि प्रभावाची इच्छा

पैसा, सत्ता, प्रसिद्धी, पद आणि प्रभावाची इच्छा स्वत:मध्ये आमच्या उपयोगाची केवळ साधने आहेत. परंतु अशाप्रकारच्या गोष्टींसाठी अनुचित स्नेह अथवा अनावर इच्छा ही वासना होय. अगदी अशाप्रकारची परीक्षा सैतानाने एदेन बागेत हव्वेच्या जीवनात आणली. “त्या झाडाचे फळ खाण्यास चांगले, दिसण्यात मनोहर आणि शहाणे करण्यास इष्ट आहे असे त्या स्त्रीला दिसून आले; तेव्हा तिने त्याचे फळ काढून खाल्ले व आपल्याबरोबर आपल्या पतीसही ते दिले; व त्याने ते खाल्ले” (उत्पत्ति ३:६). ही तीन प्रकारची परीक्षा होती : डोळ्यांची वासना (“दिसण्यात मनोहर”), देहवासना (“खाण्यास चांगले”), संसाराविषयीची फुशारकी (“शहाणे करण्यास इष्ट”). म्हणून, ह्या प्रकारच्या गोष्टींसाठी तीव्र इच्छेपासून आम्ही स्वत:चे रक्षण केले पाहिजे.

## जगीकता

जगिक गोष्टींसाठी आकर्षण आम्हास देवाचा शत्रू बनवितो. हे डोळ्याच्या वासनेचे व देहाच्या वासनेचे आणखी एक क्षेत्र आहे.

**तुम्हांमध्ये लढाया व भाडणे कशातून उत्पन्न होतात? तुमच्या अवयवात ज्या वासना लढाई करितात त्यातून की नाही? तुम्ही इच्छा घात व हेवा करिता तरी हवे ते मिळविण्यास तुम्ही समर्थ नाही; तुम्ही भांडता व लढता; तुम्ही मागत नाही; म्हणून तुम्हाला प्राप्त होत नाही. तुम्ही सांगता परंतु तुम्हास मिळत नाही; कारण तुम्ही अयोग्य प्रकारे मागतां. अहो अविश्वासू लोकांनो, जगाची मैत्री ही देवाबरोबर वैर आहे, हे तुम्हास ठाऊक नाही काय? जो**

**कोणी जगाचा मित्र होऊ पाहतो तो देवाचा वैरी ठरला आहे** (याकोब ४:१—४).

जो जगाचा मित्र आहे, तो देवाचा शत्रू आहे. माझे असे म्हणणे नाही की आम्ही या जगात कुठल्याही गोष्टीची इच्छा धरू नये. अर्थात आम्हाला गाडीची गरज आहे, राहावयासाठी घर हवे, इत्यादी. देवाने आम्हाला दिलेल्या वस्तूंचा आनंद घेण्यात काहीही चुकीचे नाही (१ तीमथ्य. ६:१७), पण ह्या जगातील वस्तूंसाठी आपली इच्छा अनावर होत असेल, तर आम्ही “ह्या जगाच्या प्रेमात” आहोत, आणि आम्ही देवाचे मित्र होऊ शकत नाही.

## हाव

हाव ही आणखी प्राप्त करण्याची प्रबळ इच्छा आहे. “कारण द्रव्याचा लोभ सर्व प्रकारच्या वाइटाचे एक मूळ आहे; त्याच्या पाठीस लागून कित्येक विश्वासापासून बहकले आहेत; आणि त्यांनी स्वत:स पुष्कळशा खेदांनी भोसकून घेतले आहे” (१ तीमथ्य. ६:१०). पैसा स्वत: वाईट असू शकत नाही. परंतु त्यावर प्रेम आणि त्याची हाव चुकीची आहे. देवाची इच्छा त्याच्या लोकांस आशीर्वादित करणे आणि संपन्न करणे ही आहे याविषयी शंका नाही! परंतु देवाच्या आशीर्वादासाठी आमच्या इच्छेत, अनेक लोक वासनेच्या अपायकारक क्षेत्रात भटकून जातात. हे मंडळीत अतिशय प्रचलित झाले आहे. आम्ही देवाचे आशीर्वाद मागत आहोत अशी बतावणी करून आम्ही मोठे घर, अधिक संपत्ती, मोठे यश, विस्तृत सेवा यांची मागणी करतो. “आणखी,” “अधिक मोठे” आणि “आणखी चांगले” यांचा पाठपुरावा करण्याच्या प्रक्रियेत, आमच्यात नकळतच अशा गोष्टींसाठी अनुचित प्रेम

उत्पन्न होते. अशा वस्तूंसाठी इच्छा अनावर आणि अतिरेकी झाली आहे. आपण धार्मिक प्रयत्नापासून व स्वस्थ इच्छेपासून दूर झालो आहोत, आणि वासनेच्या ठिकाणी येऊन पोहोचलो आहोत. हे अत्यंत जोखिमेचे आहे! आपण त्या ठिकाणी परत आले पाहिजे जेथे आपण जाणतो की "चित्त—समाधानासह भक्ति हा तर मोठाच लाभ आहे" (१ तीमथ्य. ६:६).

आपण पैसा, प्रभाव, पद — ज्यांचा उपयोग आपण देवाचे हेतू साध्य करण्यासाठी करतो — यासारख्या गोष्टींचा स्नेह न धरता देवाच्या सर्वोच्च पाचारणाचा, थोर स्वप्नांचा आणि उदात्त हेतूंचा पाठपुरावा केला पाहिजे. पैशाबाबत स्वतः काहीही चुकीचे नाही. खरे म्हणजे, आम्हाला पैशाची गरज आहे. आम्ही भरपूर पैशासाठी प्रार्थना करतो आणि देवावर विश्वास करतो, परंतु पैसा स्वतःमध्ये आमचे ध्येय नाही. आमचे बिल चुकविण्याचे ते केवळ एक साधन आहे, यासाठी की आम्हास सुवार्ता सांगता यावी आणि आत्म्यांचे तारण व्हावे आणि देवाच्या राज्याची निर्मिती व्हावी.

पण ख्रिस्ताच्या मंडळीत होते हे की देवाच्या आशीर्वादांचा पाठपुरावा करीत असतांना, आम्ही लोभ, हाव आणि वासनेच्या क्षेत्रात प्रवेश केला आहे. आपण वस्तूंच्या मागे गेलो आहोत आणि देवाचे पाचारण आणि देवाने आम्हास दिलेली स्वप्ने विसरून गेलो आहोत. 'वस्तू' फक्त त्याची साधने आहेत ज्यांचा उपयोग आम्ही देवाच्या पाचारणाचे अनुसरण करण्याराठी करतो.

## वासनेच्या मुळाची लक्षणे

* कुठल्याही वस्तूंसाठी, अनियंत्रित इच्छा
* अनिवार्य सवयी अथवा इच्छा
* लैंगिक विकार
* अश्लीलता
* घाणरडे विचार आणि अनैतिक कल्पना
* सुंदर स्त्रीपुरुषांबद्दल आकर्षण
* लोभ
* पैसा, सत्ता, प्रसिद्धी, पद आणि प्रभावाची इच्छा
* जगीकता
* हाव

## तरूणपणाच्या वासना

बायबल आम्हास सावध करते की, “तरूणपणाच्या वासनापासून दूर पळ आणि शुद्ध मनाने प्रभुचा धावा करणाऱ्यांबरोबर नीतिमत्त्व, विश्वास, प्रीति, शांति ह्यांच्या पाठीस लाग” (२ तीमथ्य. २:२२). जेव्हा त्या वासनांचा प्रश्न येतो ज्याच्या पाशात तरूण सापडलेले आहेत, त्याची एक लांब यादी तयार होते. आपण अनैतिक संगीताची गोष्ट घेऊ या. आधुनिक संगीताचे अनेक आणि विविध प्रकार त्यातील विषयवस्तूंबाबत व्यसनात्मक आणि विनाशकारक आहेत. त्यामुळे प्रगती होऊ शकत नाही आणि तरीही काही तरूण म्हणू शकतात, “मला ते ऐकावयाचे आहे. जोवर मी काफी

पीत नाही आणि ते संगीत सुरू करीत नाही, तोवर मी माझ्या दिवसाची सुरूवात करू शकत नाही.” ही तरूणपणाची वासना आहे. जर ते अनिवार्य असेल, तर ती वासना होय. संगीत, दूरदर्शन, सिनेमा, एक्स—बॉक्स, प्ले—स्टेशन, इंटरनेट, चॅट रूम हे सर्व आधुनिक काळातील तरूणपणाच्या वासनांचा भाग आहेत. या गोष्टींत काहीही वाईट नाही. पण जर आपणास त्यांचे व्यसन असेल, तर तरूणपणाच्या वासनेने आपणास कचाट्यात ठेविले आहे असे म्हणायचे. जर आपण चॅट रूममध्ये एक तास घालविता अथवा इंटरनेटवर शोध घेत राहणे आपला दिवस पूर्ण करण्यासाठी अनिवार्य असेल, तर ही तरूणपणाची वासना होय. ज्यांस हे कळत नाही की जे काही ते करीत आहेत ते योग्य आहे अथवा चुकीचे, त्यांच्यासाठी सावधगिरीचा एक शब्द — “शंका असल्यास ते सोडून द्या.” संधी का घ्यावी? अशा वस्तूंशी व्यवहारच करता कामा नये. वाईटाच्या प्रत्येक प्रकारापासून पळ काढा. वाईटाच्या प्रत्येक प्रकारापासून दूर राहा (१ थेस्सल.. ५:२२).

## वासनेच्या मुळाचे परिणाम

आपल्या जीवनात वासनेचे मूळ बाळगण्याचे अनेक परिणाम आहेत. खाली काहींची यादी देण्यात आली आहे :

## वासना वचनास अडखळण आणते

जर लोक वासनेस पुढे वाढत जाण्याची संधी देतात, तर मग ती डोळ्यांची वासना असो वा देहवासना; ती त्यांच्या जीवनातील देवाच्या वचनाच्या परिणामावर नकारात्मक प्रभाव टाकते. मार्क ४:१९ मध्ये येशूने म्हटले, “व नंतर प्रपंचाची चिंता, द्रव्याचा मोह

व इतर गोष्टींचा लोभ ही त्यांच्यामध्ये शिरून वचनाची वाढ खुंटवितात आणि ते निष्फळ होते." आपण चर्चमध्ये बसून कुठलेही फळ न देता, वर्षानुवर्षे देवाचे वचन ऐकू शकता. बायबल म्हणते की जगातील इतर वस्तूंसाठी वासना वचनाची वाढ खुंटविते आणि ते आपणाठायी जे काही करीत आहे त्यास रद्द करते.

## वासना बंधन आणते

आपण आपले स्वातंत्र्य गमावून बसतो आणि त्या वस्तूंचे गुलाम बनतो ज्यांची आम्ही वासना धरली आहे. पौलाने रोम ६:१२ या वचनात लिहिले आहे, "म्हणून तुम्ही आपल्या शरीरवासनांच्या अधीन न व्हावे म्हणून पापाने तुमच्या मर्त्य शरीरात राज्य करू नये." आपण ज्याच्या आज्ञेचे पालन करता, त्याचे आपण गुलाम आहात."आज्ञापालनाकरिता ज्याला तुम्ही स्वतःस गुलाम असे समर्पण करिता, ज्याची आज्ञा तुम्ही मानता त्याचे तुम्ही गुलाम आहा. ज्याचा परिणाम मरण आहे अशा पापाचे गुलाम, किंवा ज्याचा परिणाम नीतिमत्व आहे अशा आज्ञापालनाचे तुम्ही गुलाम आहा, हे तुम्हाला ठाऊक नाही काय?" (रोम ६:१६).

## वासना आमच्या प्राणांचा आणि शरीरांचा नाश घडवून आणते

दैहिक वासना आमचा प्राण, मन, इच्छा आणि भावना याविरुद्ध युद्ध करीत असते. "प्रियजनहो, जे तुम्ही 'प्रवासी व परदेशवासी' आहा त्या तुम्हास मी विनंती करितो की, जिवात्म्याबरोबर लढणाऱ्या दैहिक वासनापासून दूर राहा" (१ पेत्र २:११). जर आपण अनुचित समागमात लिप्त असाल आणि म्हणत असाल, "मी चित्त एकाग्र

करू शकत नाही," आणि आपले मन आणखी काही करण्यासाठी भरकटत असते, तर ती देहवासना होय जिला आपल्या जीवनात पुढे वाढत जाण्याची संधी लाभली आहे, ज्यामुळे असे घडत आहे. वासना आमचे मन, इच्छा आणि भावना याविरुद्ध युद्ध करते आणि आम्हास आमच्या मनात, एकाग्र करण्याच्या आमच्या क्षमतेत, स्मरण करण्याच्या आमच्या पात्रतेत आणि देवाने आम्हास दिलेल्या बुद्धीत दुर्बळ करते. ती आमच्या शरीरासाठी देखील अपायकारक आहे. "जारकर्माच्या प्रसंगापासून पळ काढा. जे कोणतेही दुसरे पापकर्म मनुष्य करितो ते शरीराबाहेरून होते; परंतु जो जारकर्म करितो तो आपल्या शरीराबाबत पाप करितो" (१ करिंथ. ६:१८). जेव्हा आपण लैंगिक अनैतिकतेत लिप्त होता, तेव्हा आपण पाप करीत आहा आणि आपल्या स्वतःचे शरीर भ्रष्ट करीत आहा.

## वासनेच्या समस्येवर सखोल दृष्टी

ह्या प्रकरणाच्या आरंभी, मी म्हटले की जेव्हा आमच्या इच्छांद्वारे आणि आमच्या स्वतःच्या वासनांद्वारे आम्ही ओढले जातो, तेव्हा आम्ही परीक्षांत पडतो. परंतु कधीकधी, समस्या पृष्ठभागावर नसून त्यापेक्षा खोल असते आणि त्याची विविध इतर कारणे असू शकतात.

## जखमी आत्मा

जखमी आत्म्यामुळे लोक फाजिल व्यसनात पडतात, ज्यांच्या भावना दुखावल्या जातात अथवा उद्ध्वस्त होतात — कदाचित त्यांच्या प्रियजनांचा मृत्यू झाला असावा, घटस्फोट झाला असावा,

आर्थिक समस्या असतील, कर्जबाजारीपणाला तोंड द्यावे लागले असेल अथवा त्यांच्या जीवनांत काहीतरी भयंकर घडले असेल — त्यामुळे ते प्रमाणाबाहेर व्यसनात पडले. अशाप्रकारच्या परिस्थितींत आम्ही प्रथम मूळ कारणास तोंड दिले पाहिजे आणि त्या व्यक्तीच्या आतंरिक जखमा बऱ्या केल्या पाहिजेत. नोकरी गमाविल्यामुळे लोक दारू पिऊ लागतात, अथवा प्रिय मित्र ज्याच्यावर ते अवलंबून होते, तो त्यांना सोडून गेला — कदाचित त्यांचा जोडीदार — आणि म्हणून ते भावनात्मकरित्या दुखावले होते. यामुळे त्यांना वेड लागण्याची पाळी आली होती आणि ते फाजिल व्यसनात पडले — मद्य, सिगारेट, अथवा अनैतिकता. आपण प्रथम समस्येच्या मुळास संबोधित केले पाहिजे. "मनुष्याचे चित्त आपली व्याधि सहन करिते; पण व्याकुळ चित्त कोणाच्याने प्रसन्न करवेल?" (नीतिसूत्रे १८:१४). घायाळ अथवा जख्मी आत्मा — शारीरिक जख्म नव्हे, परंतु आतील काहीतरी — बरे झाले पाहिजे.

## काही वासना दुरात्म्यांद्वारे प्रेरित असतात

पवित्र शास्त्र प्रकट करते की विविध प्रकारचे दुरात्मे आहे जे पापमय आचरणास प्रेरित करतात. काही वासना दुरात्म्यांद्वारे प्रेरित असतात. आम्ही दुरात्म्यांविषयी आपणास घाबरून सोडण्यास नव्हे, तर आपणास सज्ज करण्यासाठी बोलतो. आपल्या स्वतःच्या इच्छांशिवाय, सर्व गोष्टी या पातळीवर पोहचलेल्या असू शकतात जेथे दुरात्मे आहेत जे ह्या पातकांस प्रेरित करीत आहेत आणि त्यांस आपल्या जीवनांत मजबूत बंधन बनवीत आहेत. बायबल अनेक प्रकारच्या दुरात्म्यांविषयी सांगते.

*अशुद्ध आत्मे आहेत जे अनैतिक जीवनशैली उत्पन्न करतात.*

**अशुद्ध आत्मा माणसातून निघाला म्हणजे तो विसावा शोधित निर्जल स्थली फिरत राहतो, परंतु तो त्याला मिळत नाही** (मत्तय १२:४३).

काही विकृत आत्मे आहेत, देवाने ज्याप्रकारे वस्तूंनी/लोकांनी असावे असे ठरविले आहे, त्यांत विकार उत्पन्न करतात अथवा त्यांचे उल्लंघन करतात.

**परमेश्वराने त्यांच्यात भ्रांतवृत्ति घातली आहे; मद्यपी वांति करीत लोळतो तसे त्यांनी मिसर देशाला त्याच्या प्रत्येक कामात बहकविले आहे** (यशया १९:१४).

हे वचन असे दाखविते की जणूकाही देवाने भ्रांत करणारा आत्मा पाठविला होता. तथापि संपूर्ण वचन पाहिल्यानंतर, आम्ही जाणतो की देवाला पृथ्वीवर आपली इच्छा साध्य करण्यासाठी विकृत आत्म्यांची गरज नाही. या वचनाचा योग्य अर्थ हा आहे की जेव्हा देवाने लोकांचे अखंड पाप पाहिले (ह्या उदाहरणात, मिसर देश), तेव्हा त्याने आपली दैवीय सुरक्षा काढून घेतली. यामुळे लोकांच्या पातकामुळे आकृष्ट विकृत आत्म्यांस त्यांच्या जीवनांत प्रवेश मिळाला आणि त्यांनी त्यांस बंधनात घेतले.

*वेश्यावृत्तीचे दुरात्मे आहेत*

**माझे लोक आपल्या लाकडाच्या ठोकळ्याला प्रश्न विचारतात; त्यांची काठी त्यांना शकून सांगते; कारण अनाचारबुद्धीने त्यांस बहकविले आहे, परमेश्वराचा त्याग करणे हा अनाचार त्यांनी केला आहे** (होशेय ४:१२).

**त्यांची कर्मे त्यांना आपल्या देवाकडे वळू देत नाहीत, कारण**

**अनाचारबुद्धी त्यांच्या ठायी आहे, परमेश्वराला ते ओळखीत नाहीत** (होशेय ५:४).

वेश्यावृत्तीचे आत्मे लोकांस देवापासून दूर नेतात आणि इतर गोष्टींचे अनुसरण करण्यास प्रेरित करतात, अशाप्रकारे त्यांच्याद्वारे आध्यात्मिक व्यभिचार करवून घेतात.

*एक बंधनाचा आत्मा आहे जो पापाचे बंधन, अनिवार्य सवयी आणि व्यसने उत्पन्न करतो.*

**"कारण पुन्हा भीति बाळगावी असा दासपणाचा आत्मा तुम्हाला मिळाला नाही; तर ज्याच्या योगे आपण अब्बा, बापा, अशी हाक मारतो असा दत्तकपणाचा आत्मा तुम्हाला मिळाला आहे"** (रोम ८:१५).

*अवज्ञेचा आत्मा आहे, जो सत्याविरुद्ध अवज्ञा आणि बंडखोरपणा उत्पन्न करतो.*

**त्या पातकांमध्ये तुम्ही पूर्वी चालत होता, अर्थात् ह्या जगाच्या रहाटीप्रमाणे अंतरिक्षांतील राज्याचा अधिपति म्हणजे आज्ञा मोडणाऱ्या लोकांत आता कार्य करणाऱ्या आत्म्याचा अधिपति ह्याच्या धोरणाप्रमाणे चालत होता** (इफिस. २:२).

*ह्या जगाचा आत्मा आहे जो जगीकता घेऊन येतो.*

**आपल्याला जगाचा आत्मा नव्हे, तर देवापासून निघणारा आत्मा मिळाला आहे; ह्यासाठी की, जे देवाने आपल्याला कृपेने दिले ते आपण ओळखून घ्यावे** (१ करिंथ. २:१२).

*बहकविणारा अथवा भ्रमित करणारा आत्मा आहे जो ह्या जगाच्या*

*वस्तूंकडे आकर्षित होण्यास व त्यांच्या पाशात पडण्यास लोकांस प्रेरित करतो.*

**आत्मा स्पष्ट म्हणतो की, पुढील काळी विश्वासापासून कित्येक लोक भ्रष्ट होतील** (१ तीमथ्य. ४:१).

**आणि दुष्ट व भोंदू माणसे ही दुसऱ्यास फसवून व स्वतः फसून दुष्टपणांत अधिक सरसावतील** (२ तीमथ्य. ३:१३).

म्हणून अनेक प्रकारचे दुरात्मे आहेत जे आमच्या सभोवतालच्या जगात कार्य करीत असतात. दुखाची गोष्ट ही आहे की अशाप्रकारच्या आत्म्यांनी विश्वासणाऱ्यांच्या जीवनांत प्रवेश करावा हे शक्य आहे.

## विश्वासणाऱ्याच्या जीवनांत तटबंदी असू शकते

नवा जन्म प्राप्त, अन्यान्य भाषा बोलणाऱ्या, चर्चला जाणाऱ्या, विश्वासणाऱ्याच्या जीवनांत — त्याच्या प्राणक्षेत्रात तटबंदी असू शकते ज्यावर दुरात्म्यांचे नियंत्रण असू शकते. पौल तटबंदीविषयी बोलतो : “कारण आमच्या युद्धाची शस्त्रे दैहिक नाहीत, तर तटबंदी जमीनदोस्त करण्यास ती देवाच्या दृष्टीने समर्थ आहेत. तर्कवितर्क व देवविषयक ज्ञानाविरुद्ध उंच उभारलेले असे सर्व काही पाडून टाकून आम्ही प्रत्येक कल्पना अंकित करून तिला ख्रिस्तापुढे मान वाकविण्यास लावतो; आणि तुम्ही आज्ञापालनात पूर्ण व्हाल तेव्हा सर्व आज्ञाभंगाबद्दल शासन करावयास आम्ही सिद्ध आहो” (२ करिंथ. १०:४—६).

अनैतिक मन सैतानाची तटबंदी आहे — अशी बुद्धी अथवा मन

जे वाईटास चांगले व चांगल्यास वाईट समजते. जगिकतेच्या बंधनात असलेले मन विश्वासणाऱ्याच्या जीवनांत सैतानास पाऊल टाकण्यासाठी जागा देते — आमच्या वैचारिक जीवनाची क्षेत्रे ज्यांस आम्ही प्रकाशात न आणता अंधारात ठेवितो. अशी स्थाने जेथे आम्ही देवाच्या वचनाच्या सत्यास समर्पित होण्याऐवजी लबाडीचा स्वीकार करतो, ह्याच क्षेत्रांत सैतान आम्हास बंधनात टाकतो. मी एका इसमाशी बोलत होतो जो काही काळापूर्वी मादक औषधांचे सेवन करीत असे आणि मी त्याला विचारले, "तू हे का करतोस?" आणि त्याने उत्तर दिले, "मी काहीही चूक करीत नाही. मी आपणास इजा करीत नाही, मग आपण हे चुकीचे असे का म्हणत आहा?" हा तर्कपूर्ण विचार झाला, तथापि ही तटबंदी आहे. तो विचार करतो, "जोवर मी आणखी कोणास इजा करीत नाही, तोवर मादक पदार्थांचे सेवन करणे ठीक आहे."

तटबंदी काय आहे? तटबंदी आमच्या मनातील विचारसरणी आहे जेथे आम्ही पापाप्रत सहिष्णू झालो आहोत, जेथे आम्ही तडजोड केली आहे आणि लबाडीचा स्वीकार करून सत्याचा अव्हेर केला आहे, अशाप्रकारे सैतानाला आमच्या मनांत प्रभावाचे स्थान आणि बचावाचे स्थान दिले आहे. "जोवर पाळकास ते दिसत नाही, तोवर ते माझ्यासाठी ठीक आहे," असा आपण विचार करू शकता. म्हणून, आठवड्यात ज्या गोष्टी आपण करता त्याविषयी आपणास काहीच चुकीचे वाटत नाही आणि रविवारच्या पहाटे "हालेलुय्याह" गातांना आपले मन आपणास दोष देत नाही! ही तटबंदी आहे, विचारशैली आहे जी आमच्या मनात हा विचार आणते की सर्वकाही चालते आणि आम्हास पापाप्रत सहिष्णू बनविते. आम्ही आमच्या जीवनांत सैतानाला प्रभावाचे स्थान देतो. ह्या तटबंदीद्वारे,

सैतानांच्या कार्यकलापांस आमच्यात खरोखर संरक्षण लाभते याचे कारण ती विचारसरणी जिचा आम्ही आमच्या मनात स्वीकार केला आहे आणि ज्यास मुभा दिली आहे. हे खरे आहे की आमच्या आत्म्यांत पवित्र आत्मा आधीच वस्ती करीत असल्यामुळे आम्हास दुरात्मा पछाडू शकत नाही. तथापि, ख्रिस्ती व्यक्ती दुरात्म्याच्या बंधनात असू शकते, त्याद्वारे पीडित, त्रस्त असू शकते, आणि त्याच्या मनाच्या अथवा शरीराच्या काही भागांत दुरात्म्यांचा कब्जा असतो — जेव्हा तो त्यांस सतत चुकीच्या विचारांद्वारे आणि वर्तनांद्वारे प्रवेश देतो. उदाहरणार्थ, जर आपण सतत अश्लील चित्र अथवा चित्रपट पाहत असाल, हे आपण कधी कधी महिन्यातून एकदा करीत असाल, पण ती नियमित साप्ताहिक सवय बनू शकते आणि लवकरच त्यावाचून आपले चालणार नाही. काय झाले आहे? आपल्या प्राणांच्या त्या क्षेत्रावर अशुद्ध आत्म्याचा कब्जा झाला आहे, ज्यामुळे आपल्या अंत:करणात अनियंत्रित अनैतिक आचरण घडून येत आहे. म्हणून आता ही नैमित्तिक सवय राहिलेली नाही — ते बंधन आणि तटबंदी आहे. नेहमीची सवय, अनावर वासना, अनिवार्य वर्तन ही अत्यंत संभाव्य क्षेत्रे आहेत जी दुरात्म्यांद्वारे प्रेरित असतात. पापमय सवयी संबंधित दुरात्म्याचे निवासस्थान बनतात, हे दुरात्मे विश्वासणाऱ्याच्या जीवनांत तटबंदी बनले आहेत आणि त्या व्यक्तीस बंधनात ठेवतात.

असे म्हणत असतांना, आम्ही प्रत्येक पापमय वर्तनासाठी सैतानाला दोष देऊन स्वत:च्या पातकांवर पांघरून घालण्याचा प्रयत्न करीत नाही. असे म्हणू नका, “सैतान ते माझ्याद्वारे करून घेत आहे.” आपण दार उघडले आणि शत्रूला प्रवेश दिला. आपण जबाबदार आहात आणि म्हणून त्यासाठी सैतानाला दोष देऊ नका. आपण

अनैतिक जीवनशैलीचे गांभीर्य समजून घेतले पाहिजे. जेव्हा व्यक्ती अनैतिक आचरण सुरू ठेवते, तेव्हा ती सैतानास प्रवेश देते की त्याने त्याच्या मनात, स्नेह विश्वात आणि शरीरात जागा मिळवावी. म्हणून आम्हाला आमच्या जीवनांत शत्रूला प्रवेश देण्याविरुद्ध स्वत:चा बचाव केला पाहिजे.

तटबंदी आमच्या मनातील विचारसरणी आहे जेथे आम्ही पापाप्रत सहिष्णू झालो आहोत, जेथे आम्ही तडजोड केली आहे आणि लबाडीचा स्वीकार करून सत्याचा अव्हेर केला आहे, अशाप्रकारे सैतानाला आमच्या मनांत प्रभावाचे स्थान आणि बचावाचे स्थान दिले आहे.

## आम्ही वासनेचे सामर्थ्य कसे नष्ट करावे?

## सत्याचा स्वीकार करा

म्हणा, “होय, मी सत्याचा स्वीकार करू इच्छितो.” सत्य काय आहे?

**ज्या कोणाचे काम जळून जाईल, त्याचा तोटा होईल, तथापि तो स्वत: तारला जाईल, परंतु जणू काय अग्नीतून बाहेर पडलेल्यासारखा तारला जाईल. तुम्ही देवाचे मंदिर आहा आणि तुम्हांमध्ये देवाचा आत्मा वास करितो हे तुम्हास ठाऊक नाही का?** (१ करिंथ. ३:१५,१६).

शरीर पवित्र असले पाहिजे. ते डोळ्यांच्या वासनेपासून आणि देहवासनेपासून मुक्त असले पाहिजे. आमच्या शरीरांत आणि मनात कोणतीही अनैतिक अथवा अशुद्ध गोष्ट प्रवेश करता कामा

नये. आमची शरीरे लैंगिक अनैतिकतेसाठी घडविण्यात आली नव्हती.

**अन्न पोटासाठी व पोट अन्नासाठी आहे; पण त्या दोहोंचाही अंत देव करील. पण शरीर जारकर्मासाठी नाही, तर प्रभुसाठी आहे; आणि शरीरासाठी प्रभु आहे. देवाने प्रभुला उठविले आणि तो आपल्या सामर्थ्याने आपल्यालाही उठवील. तुमची शरीरे ख्रिस्ताचे अवयव आहेत हे तुम्हास ठाऊक नाही काय? तर मग मी ख्रिस्ताचे अवयव नेऊन ते कसबिणीचे अवयव करावे काय? कधीच नाही! जो कसबिणीशी जडला तो व ती एकशरीर आहेत, हे तुम्हास ठाऊक नाही काय? कारण 'ती दोघे एकदेह होतील,' असे तो म्हणतो. परंतु जो प्रभुशी जडला तो व प्रभु एक आत्मा आहेत. जारकर्माच्या प्रसंगापासून पळ काढा. जे कोणतेही दुसरे पापकर्म मनुष्य करितो ते शरीराबाहेरून होते; परंतु जो जारकर्म करितो तो आपल्या शरीराबाबत पाप करितो. तुमचे शरीर, तुम्हांमध्ये वसणारा जो पवित्र आत्मा देवापासून तुम्हाला मिळाला आहे त्याचे मंदिर आहे हे तुम्हास ठाऊक नाही काय? आणि तुम्ही स्वत:चे मालक नाही; कारण तुम्ही मोलाने विकत घेतलेले आहा; म्हणून तुम्ही आपल्या शरीराने देवाचे गौरव करा** (१ करिंथ. ६:१३—२०).

आमच्यासाठी देवाची इच्छा ही आहे की आम्ही पवित्र असावे.

**कारण देवाची इच्छा आहे की, तुमचे पवित्रीकरण व्हावे, म्हणजे तुम्ही जारकर्मापासून स्वत:ला अलिप्त ठेवावे. देवाला न ओळखणाऱ्या परराष्ट्रीयांप्रमाणे कामवासनेने नव्हे, तर पवित्रतेने व अब्रूने तुम्हांतील प्रत्येकाने आपल्या देहावर ताबा कसा ठेवावा ते समजून घ्यावे** (१ थेस्सल..४:३—५).

**आम्हास कबूल करण्याची आणि पश्चाताप करण्याची आणि त्याचा त्याग करण्याची गरज आहे**

आपण सैतानासाठी जी दारे मोकळी केली, ती आपण बंद केली पाहिजेत. मंडळीत पश्चाताप करणे, अश्रू ढाळणे, ती पुसून टाकणे आणि दाराबाहेर पडणे, व सरळ ज्या गोष्टींपासून आम्हास सुटका प्राप्त करण्याची गरज आहे त्याच गोष्टींकडे परत जाणे सोपे आहे. मग आमचा पश्चाताप व्यर्थ ठरतो.

## देहवासना तृप्त करण्यासाठी तरतूद करू नका

**तर तुम्ही प्रभु येशू ख्रिस्ताला परिधान करा, आणि देहवासना तृप्त करण्यासाठी तरतूद करू नका** (रोम १३:१४).

आपण पश्चाताप केल्यानंतर ही खात्री करून घ्या की आपण प्रत्येक दार बंद केले आहे. सैतानाला आपल्या जीवनांत संधी देऊ नका. जर सकाळच्या बातमीपत्रामुळे आपले लक्ष अश्लीलतेकडे जात असेल, तर त्या वृत्तपत्राची वर्गणी बंद करा. आपण म्हणत असाल, “परंतु मला बातमी वाचायची आहे.” जगातील प्रत्येक गोष्ट जाणून घेऊन नरकात जाण्यापेक्षा अज्ञान राहून स्वर्गात जाणे बरे. जर आपल्या केबल टी व्हीमुळे आपण तासन्तास कोचवर पडून राहत असाल, तर त्याची वर्गणी बंद करा. आपण म्हणता की बातमीसाठी आपणास त्याची गरज आहे, पण जर आपण इतर सर्वकाही पाहात असाल, तर केबल टी व्हीच्या वर्गणीवाचून स्वर्गात जाणे अधिक उत्तम आहे. येशूने म्हटले, “तुझा उजवा हात तुला पापास प्रवृत्त करीत असेल तर तो तोडून टाकून दे; कारण तुझे संपूर्ण शरीर नरकात पडावे; ह्यापेक्षा तुझ्या एका

अवयवाचा नाश व्हावा हे तुझ्या हिताचे आहे” (मत्तय ५:३०). तो अक्षरश: शारीरिक अवयवांबद्दल बोलत नव्हता, तर त्या वस्तूंविषयी बोलत होता ज्या पापास प्रवृत्त करतात. ह्या गोष्टींपासून सक्तीने “दूर झाले पाहिजे.” शरीरासाठी तरतूद करू नका. एकदा पश्चाताप केल्यानंतर सैतानाला पुन्हा प्रवेश करण्याची संधी देऊ नका. अथवा आपला शेवट अशा स्थितीत होईल जी पूर्वीपेक्षा सात पटीने वाईट आहे. (जर आपण त्याविषयी गंभीर नसाल, तर पश्चाताप करू नका.)

## काही व्यवहारिक गोष्टी करा

हे समजून घ्या की काही क्षेत्रे अशी आहे जेथे आपणास विजय मिळविण्यासाठी नीतिमान लोकांच्या मदतीची, सहाय्याची आणि बळाची गरज आहे. ही गरज ओळखून विजयी जीवन जगण्यासाठी योग्य लोकांच्या संपर्कात राहण्यात काहीही चुकीचे नाही. आम्हाला एकमेकांची गरज आहे. ह्याच एका कारणामुळे आमच्या मंडळीत सेल ग्रूप्स असतात.

## आणखी काही व्यवहारिक गोष्टी ज्या आपण करू शकता त्या आहेत :

*स्त्रियांकडे वासनामय दृष्टीने पाहण्यास नकार द्या.*

**तू आपले चित्त तिच्या सौंदर्यास पाहून लोलुप होऊ नको; तिच्या नेत्रकटाक्षाला वश होऊ नको** (नीतिसूत्रे ६:२५).

*जे काही आपणाजवळ आहे त्यात संतुष्ट असा.*

**तुमची वागणूक द्रव्यलोभावाचून असावी; जवळ आहे तेवढ्यांत तुम्ही तृप्त असावे; कारण त्याने स्वतः म्हटले आहे, 'मी तुला सोडून जाणार नाही व तुला टाकणार नाही.'** (इब्री. १३:५).

**चित्त—समाधानासह भक्ति हा तर मोठाच लाभ आहे** (१ तीमथ्य. ६:६).

*अधर्म आणि जगीक वासनांचा नाकार करा. सभ्य, नीतिमान आणि धार्मिक जीवन जगा.*

**आपण अभक्तीला व ऐहिक वासनांना नाकारून सांप्रतच्या युगांत मर्यादेने, नीतीने, व सुभक्तीने वागावे** (तीतास पत्र २:१२).

*आत्म्याच्या प्रेरणेने चाला, म्हणजे आपण देहवासना पूर्ण करणार नाही.*

**मी तर म्हणतो, आत्म्याच्या प्रेरणेने चाला, म्हणजे तुम्ही देहवासना पूर्ण करणारच नाही. कारण देहवासना आत्म्याविरुद्ध आहे व आत्मा देहवासनेविरुद्ध आहे; ही परस्परविरुद्ध आहेत, ह्यासाठी की, जे काही तुम्ही इच्छिता ते तुमच्या हातून घडू नये. जे ख्रिस्त येशूचे आहेत त्यांनी विकार व वासना ह्यांच्यासह देहस्वभाव वधस्तंभावर खिळला आहे** (गलती ५:१६,१७,२४).

*आपले अंत:करण देवाच्या वचनाकडे लावा आणि आपण लोभापासून मुक्त व्हाल.*

**माझ्या मनाचा कल अन्याय्य लाभाकडे नको तर तुझ्या मार्गांत मला नवजीवन दे** (स्त्रोतसंहिता ११९:३६).

सैतानास नीतिमान जीवनाचे भय वाटते — असे जीवन जे पवित्रतेत आणि शुद्धतेत देवास पूर्णपणे समर्पित आहे. त्याला अशा व्यक्तीची भीती वाटत नाही जो अभिषिक्त आणि कृपादानेप्राप्त आहे, पण

त्यांच्या जीवनात पोसलेली पापे आहेत. खरे म्हणजे, त्याला अशा लोकांविषयी आनंद होतो कारण तो आता युक्तिपूर्वकरित्या त्यांचा "पाडाव करू शकतो" आणि त्यांच्या पतनाद्वारे सर्व ठिकाणच्या ख्रिस्ती लोकांचा जास्तीत जास्त नाश करील. तथापि, सैतानास नीतिमान जीवन अभेद्य वाटते — असा बचाव ज्यात तो शिरकाव करू शकत नाही.

वासनेचे सामर्थ्य याने तोडता येते :

**याद्वारे वासनेचे सामर्थ्य हाणून पाडा**

* सत्याचा स्वीकार करणे.
* पापाचा अंगीकार करणे, पश्चाताप करणे आणि त्याचा त्याग करणे.
* शरीराच्या वासनांची तरतूद न करणे.
* विजय प्राप्त करण्यासाठी नीतिमान लोकांची मदत, बळ, आणि सहाय्य प्राप्त करणे.
* स्त्री/पुरुषांविषयी पापवासना बाळगण्यास नाकार देणे.
* जे काही आपणाजवळ आहे त्यात संतुष्ट राहणे.
* अधर्म आणि जगीक वासनांचा नाकार करणे व गंभीर, नीतिमत्तापूर्ण आणि धार्मिक जीवन जगणे.
* आत्म्यानुसार चालणे म्हणजे आपण देहाच्या वासना पूर्ण करणारच नाही.
* आपले अंत:करण देवाच्या वचनाकडे लावणे आणि लोभापासून सुटका प्राप्त करणे.

## प्रार्थना, अंगीकार, पश्चाताप आणि पापाचा त्याग

*स्वर्गीय पित्या, मी तुझ्याजवळ येशू ख्रिस्ताच्या नावात येतो. मी कबूल करतो की मी माझ्या जीवनातील ती क्षेत्रे स्वत:जवळ राखून ठेविली आहेत जी मी पूर्णपणे येशू ख्रिस्ताच्या प्रभुत्वास समर्पित केलेली नाहीत — स्वार्थाची स्थाने, मत्सराची स्थाने, गर्वाची स्थाने, वासनेची स्थाने आणि पापाप्रत सहिष्णुता. आज, येशूच्या नावात, मी तुला विनंती करतो की मला क्षमा कर आणि येशूच्या बहुमूल्य रक्ताने मला शुद्ध कर.*

**(विशिष्ट नियमित पापे, आचरण, व्यसन यांची नावे घेऊन प्रभुसमोर कबूल करावी आणि पश्चाताप करावा).**

*पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने आणि येशूच्या नावात, मी माझ्या जीवनावरील सैतानाच्या प्रत्येक प्रभावास बांधून टाकतो. मी अशुद्धतेच्या आत्म्यांचा आणि विकृतीच्या आत्म्यांचा अव्हेर करतो आणि त्यांस माझ्या जीवनात कुठलेही स्थान देत नाही. मी वेश्यावृत्तीच्या आत्म्याचा अव्हेर करतो आणि माझ्या जीवनाच्या प्रभु परमेश्वरापासून दूर भटकण्यास नाकार देतो. मी प्रतिज्ञा करतो की मी प्रभु येशू ख्रिस्ताप्रत पूर्ण निष्ठा राखीन. माझ्या जीवनात देवाचे स्थान घेणाऱ्या कोणत्याही गोष्टीचे अनुसरण करण्यास मी नाकार देतो. मी मूर्तिपूजेच्या प्रत्येक स्वरूपाचा त्याग करतो आणि त्यांस हाणून पाडतो. मी खऱ्या व जिवंत परमेश्वराच्या कोणत्याही प्रतिरूपाची मुभा देण्यास नाकार देतो— पण आत्म्याने आणि खरेपणाने केवळ त्याची उपासना करण्याची निवड करतो.*

*मी बंधनाच्या आत्म्याचा अव्हेर करतो. येशूच्या नावात, येशूच्या*

*रक्ताद्वारे आणि पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने मी माझ्या जीवनातील पापाच्या प्रत्येक बंधनास तोडतो. मी प्रत्येक अनिवार्य सवय, अनावर इच्छा आणि व्यसनाचा नाश करतो. येशूच्या नावात मी मुक्त आहे, कारण ख्रिस्ताने मला बंधमुक्त केले आहे!*

*मी अवज्ञेच्या आत्म्याचा अव्हेर करतो आणि सत्याविरुद्ध अवज्ञेचा आणि बंडाचा नाकार करतो. मी सत्याचा स्वीकार करतो आणि स्वतःस देवाच्या वचनाच्या सत्याच्या अधीन करतो. मी ह्या जगाच्या आत्म्याचा नाकार करतो आणि ह्या जगास समरूप होण्यास नाकार देतो. पवित्र आत्म्याच्या मदतीने मी देवाच्या वचनानुसार चालण्याची निवड करतो. मी भ्रमिष्ट करणाऱ्या दुरात्म्यांच्या प्रभावाचा अव्हेर करतो आणि ह्या जगाच्या आकर्षणांस शरण जाण्यास नाकार देतो.*

*पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याद्वारे आणि देवाच्या वचनाद्वारे मी घोषणा करतो की प्रत्येक तटबंदी नष्ट झाली आहे आणि माझ्या जीवनातून त्याचा पाया नाहीसा झाला आहे. मी प्रभु येशूला संधी देतो की त्याने प्रत्येक क्षेत्रात त्याचे वचन व नीतिमत्व स्थापन करावे जेथे ह्या तटबंदींचे अस्तित्व आहे. देवाचे वचन, त्याचे सान्निध्य व त्याचे सत्य, माझ्या जीवनात एकमेव तटबंदी असेल. पवित्र आत्मा मला सर्व सत्यात, शुद्धतेत आणि पवित्रेत नेतो. येशूच्या नावात. आमेन!*

# ऑल पीपल्स चर्चसोबत भागिदारी

ऑल पीपल्स चर्च स्थानिक मंडळ्यांच्या रूपात संपूर्ण भारत देशात, विशेषत: उत्तर भारतात सुवार्ता गाजवीत आपल्या सरहद्दीपलीकडे सेवा करीत आहे. त्याचे विशेष ध्येय (अ) पुढाऱ्यांस स्थिर करणे, (ब) तरूणांस सेवेसाठी सुसज्ज करणे आणि (क) ख्रिस्ताच्या मंडळीची वाढ करणे आहे. तरूणांसाठी प्रशिक्षण सम्मेलन, ख्रिस्ती पुढाऱ्यांसाठी सभांचे संपूर्ण वर्षभर आयोजन केले जाते. याशिवाय, पुस्तकांच्या कित्येक हजारो प्रतींचे इंग्रजी आणि इतर अनेक भारतीय भाषांत विनामूल्य वितरण केले जाते, त्यामागे हेतू हा आहे की विश्वासणाऱ्यांस वचन आणि आत्म्यात वाढ करून द्यावी.

आम्ही आपणास निमंत्रण देतो की एका वेळेचे दान पाठवून किंवा मासिक आर्थिक दान पाठवून आर्थिकरित्या आमच्यासोबत भागिदारी करावी. संपूर्ण राष्ट्रात हे कार्य करता यावे म्हणून जी दानराशी आपण पाठवू शकता, त्यासाठी आम्ही आपले आभारी राहू.

आपण आपल्या देणग्या चेक/बैंक ड्रॉफ्टच्या द्वारे “ऑल पीपल्स चर्च, बेंगलोर” च्या नावावर आमच्या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवू शकता किंवा खालील माहितीच्या आधारे आमच्या बँक खात्यात टाकू शकता :

Account Name: All Peoples Church
Account Number: 0057213809
IFSC Code: CITI0000004
Bank: Citibank N.A., No. 5, M.G. Road, Bengaluru, Karnataka 560001

*कृपया लक्षात ठेवा: ऑल पीपल्स चर्चजवळ एफसीआरए परमिट नाही. या कारणास्तव केवळ भारतीय नागरिकांचे बँक अंशदान स्वीकार करता येणार नाही. आपली देणगी पाठवीत असतांना, स्पष्टपणे लिहा की आपण एपीसी सेवेच्या कोणज्या क्षेत्रासाठी दान पाठवू इच्छिता.*

त्याचप्रमाणे, आमच्यासाठी व आमच्या सेवाकार्यासाठी शक्य तेव्हा प्रार्थना करणे विसरता कामा नये.

**धन्यवाद आणि परमेश्वर देव आपणास आशीर्वादित करो!**

# विनामूल्य प्रकाशने

१. आपल्या जीवनासाठी परमेश्वराचा हेतू पूर्ण करणे
२. प्रामाणिकपणा
३. राज्याची स्थापना करणारे
४. मुळावर कुऱ्हाडीचा वार

वरील सर्व पुस्तके पीडीएफ आवृत्तीत विनामूल्य डाऊनलोडसाठी आमच्या चर्चच्या संकेतस्थळावर **apcwo.org/publications** उपलब्ध आहेत. यापैकी काही पुस्तके इतर भाषांतही उपलब्ध आहेत. ह्य पुस्तकांची विनामूल्य मुद्रित प्रत प्राप्त करण्यासाठी ई—मेल या डाकद्वारे आमच्याशी संपर्क करावा.

तसेच, विनामूल्य ऑडियो आणि विडियो संदेश, संदेशाचे नोट्स टी.वी. कार्यक्रम आणि इतर अनेक सामुग्रींसाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्यावी : **apcwo.org**

# ऑल पीपल्स चर्च

बँगलोर शहरात मीठ आणि प्रकाश ठरावे, आणि भारत देशात तसेच संपूर्ण जगातील राष्ट्रांत एक आवाज़ बनणे हा ऑल पीपल्स चर्च (एपीसी) चा दृष्टांत आहे.

एपीसीमध्ये आम्ही देवाचे संपूर्ण वचन कुठल्याही प्रकारची तडजोड न करता, पवित्र आत्म्याच्या अभिषेकाने व प्रकटीकरणाने सादर करण्याप्रत वचनबद्ध आहोत. आमचा विश्वास आहे की उत्तम संगीत, रचनात्मक सादरीकरण, बुद्धिमत्तापूर्ण तत्वसमर्थन, समकालीन सेवाकार्याच्या पद्धती, आधुनिक तंत्रज्ञान इत्यादी गोष्टी पवित्र आत्म्याची चिन्हे, चमत्कार, अद्भुत कार्ये, आणि पवित्र आत्म्याच्या कृपादानांद्वारे वचनाची घोषणा करण्याच्या देवाने नेमलल्या पद्धतीची जागा घेऊ शकत नाहीत (१ करिंथ २:४, ५; इबी. २:३, ४). आमचा विषय येशू आहे, आमची विषयवस्तु वचन आहे, आमची पद्धत पवित्र आत्म्याचे समार्थ्य आहे, आमचा आवेश लोक आहेत, आणि आमचे ध्येय ख्रिस्तासमान परिपक्वता आहे.

आमचे मुख्यालय बँगलोर येथे आहे, पण ऑल पीपल्स चर्चच्या भारतात कित्येक ठिकाणी शाखा आहेत. ऑल पीपल्स चर्चची वर्तमान यादी आणि संपर्क सूचना यासाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्यावी : : **www.apcwo.org/locations** किंवा या पत्त्यावर ई–मेल पाठवावा : **contact@apcwo.org**

# सप्ताहांत शाळा

बँगलोर येथे आठवड्याच्या शेवटी होणारे वर्ग जीवन आणि सेवेच्या विशिष्ट क्षेत्रांत विश्वासणाऱ्यांस प्रशिक्षित आणि सुसज्जित करण्यासाठी तयार करण्यात आले आहेत. हे वर्ग सोयीनुसार आठवड्यच्या शेवटी (शनिवार/रविवार), सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत घेतले जातात. आठवड्या अंती होणारे हे सर्व मंडळ्यांच्या व सर्व डिनॉमिनेशनच्या सर्व विश्वासणाऱ्यांसाठी आहेत, जे प्रशिक्षण प्राप्त करण्याची आणि सेवेसाठी तयार होण्याची आवड धरतात. खाली ह्या वर्गांची यादी दिलेली आहे जे यावेळी सुरू आहेत.

संदेष्ट्याची सेवा सप्ताहांत शाळा

रोग बरे करणे आणि मुक्ती सप्ताहांत शाळा

पवित्र आत्म्याच्या कृपादानांचे प्रकटीकरण या विषयावर सप्ताहांत शाळा

प्रार्थना आणि मध्यस्थी सप्ताहांत शाळा

आंतरिक आरोग्य सप्ताहांत शाळा

जीवनशैली सुवार्ताकार्य सप्ताहांत शाळा

परमेश्वर कार्य करीत आहे सप्ताहांत शाळा

शहरी मिशन मंडळी रोपण या विषयावर सप्ताहांत शाळा

ख्रिस्ती तत्व समर्थन (Christian Apologetics) या विषयावर सप्ताहांत शाळा

कृपया वर्तमान वेळापत्रक आणि ऑन लाईन पंजीकरणासाठी या वेबसाईटला भेट द्या :**apcwo.org/weekendschool**

# ख्रिस्ती पुढाऱ्यांच्या सभांचे आयोजन करा

ऑल पीपल्स चर्च पाळक, स्थानिक मंडळ्यांचे पुढारी, ख्रिस्ती संस्थांचे पुढारी आणि ख्रिस्ती सेवेत कार्यरत इतर लोकांसाठी आत्म्याने अभिषिक्त सुसज्जीकरण तसेच पुरविते. अभिषिक्त शिकवण, आत्म्याच्या मार्गदर्शनाने प्रेरित सेवा आणिं इम्पार्टेशनशिवाय, आमची टीम भाग घेणाऱ्यांसोबत वैय्यक्तिक संवाद आणि चर्चा करते. ख्रिस्ती पुढाऱ्यांची प्रत्येक सभा विशेषतः दोन किंवा तीन दिवसांची असते जी विशिष्ट विषयांवर केन्द्रित असते. त्यात भाग घेणारे तेथून नवीनीकरण, सामर्थ, अधिकार, प्रभाव तसेच प्रभावशीलतेसाठी सज्ज होऊन तेथून जातील. ख्रिस्ती पुढाऱ्यांच्या सभा विशेषतः स्थानिक मंडळी, ख्रिस्ती सेवा, मिशन संस्था आणि मंडळीच्या डिनॉमिनेशनल मुख्यालयात आणि पाळकांद्वारे आपल्या क्षेत्रात किंवा आपल्या नेटवर्क अथवा डिनॉमिनेशनच्या अंतर्गत आयोजित केल्या जातात. आयोजक संस्था सभेचा खर्च तसेच भाग घेणाऱ्यांस निमंत्रित करण्याचा खर्च पुरवील. ऑल पीपल्स चर्च आपल्या सेवा टीमला स्थानिक मंडळ्यांच्या महासभेत भाग घेणाऱ्यांच्या सेवेसाठी पाठवील.

काही विषय ज्यांत आमची टीम सामान्यतः सेवा पुरविते :

**संजीवन, आत्मिक—जागृती, देवाचे कार्य**
**सान्निध्य आणि गौरव**
**राज्याचे निर्माते**
**समतल भूमी**
**देवाचे घर**
**प्रेषित आणि संदेष्ट्याची सेवा**
**आरोग्यदान आणि मुक्तीची सेवा करणे**
**आत्म्याची कृपादाने**
**वैवाहिक जीवन आणि कुटूंब**
**पवित्र जनांस तयार करणे आणि व्यावसायिक ठिकाणांत परिवर्तन**

ख्रिस्ती पुढाऱ्यांच्या सभेसाठी विषयांच्या वर्तमान यादीसाठी कृपा करून ह्य संकेतस्थळास भेट द्या :**apcwo.org/CLC**

ख्रिस्ती सभांच्या कार्यक्रमांविषयी व त्यांच्या तारखांसाठी कृपया आम्हास खालील पत्त्यावर ईमेल करावा : contact@apcwo.org

# आपणास माहीत आहे का की देव आपणावर प्रीती करतो?

सुमारे २००० वर्षांपूर्वी, देव मानव म्हणून या जगात आला. त्याचे नाव येशू आहे. तो सिद्ध पापरहित जीवन जगला. येशू हा देहधारी परमेश्वर होता, म्हणून जे काही त्याने म्हटले आणि केले, त्याद्वारे त्याने देवास आमच्यावर प्रकट केले. तो जी वचने बोलला, तो देवाची वचने बोलला. त्याने जी कार्ये केली, ती देवाची कार्ये होती. येशूने पृथ्वीवर अनेक चमत्कार केले. त्याने रोग्यांस व क्लेशितांस बरे केले. त्याने आंधळ्यांचे डोळे उघडले, लंगड्यांस चालविले आणि प्रत्येक प्रकारचे रोग व आजार त्याने बरे केले. भाकरीच्या तुकड्यांस आश्चर्यजनकरित्या बहुगुणित करून त्याने भुकेल्यास अन्न दिले, वादळ शांत केले आणि इतर अनेक अद्‌भुत गोष्टी केल्या.

ह्या सर्व गोष्टी आम्हास प्रकट करतात की देव चांगला परमेश्वर आहे ज्याची इच्छा आहे की लोकांनी बरे, स्वस्थ, आरोग्यसंपन्न आणि आनंदित असावे. देव लोकांच्या गरजा पूर्ण करू इच्छितो.

तर, देवाने मनुष्य बनण्याचा आणि आमच्या जगात प्रवेश करण्याचा निर्णय का घ्यावा? येशू का आला?

आम्ही सर्वांनी पाप केले आहे आणि अशा गोष्टी केल्या आहेत ज्या आम्हास उत्पन्न करणाऱ्या देवासमोर अमान्य आहेत. पापाचे परिणाम आहेत. पाप हे देव आणि मानवातील एका मोठ्या भिंतीसारखे आहे जी पार करता येत नाही. पाप हे आम्हास देवापासून वेगळे करते. ज्याने आम्हास उत्पन्न केले आहे त्यास जाणण्याच्या आणि त्याच्यासोबत अर्थपूर्ण नाते स्थापन करण्याच्या

मार्गात ते आम्हास अडखळण आणते. म्हणून, आमच्यापैकी कित्येक जण इतर गोष्टींनी हे रिक्त स्थान भरून टाकण्याचा प्रयत्न करतात.

आमच्या पापांचा दुसरा परिणाम देवापासून सदाकाळसाठी अलग होणे होय. देवाच्या न्यायालयात, पापाचे वेतन मरण आहे. मृत्यू देवापासून दूर नरकात सार्वकालिक ताटातूट आहे.

पण, सुवार्ता ही आहे की आपण पापांपासून मुक्त राहू शकतो आणि देवाशी पुन्हा नाते स्थापन करू शकतो. बायबल म्हणते, “पापाचे वेतन मरण आहे, पण देवाचे कृपादान आपल्या प्रभु येशू ख्रिस्तामध्ये सार्वकालिक जीवन आहे” (रोमियों ६:२३). येशूने जेव्हा वधस्तंभावर जेव्हा आपला प्राण दिला, तेव्हा त्याने संपूर्ण जगाच्या पापांची किंमत चुकविली, मग तीन दिवसानंतर तो पुन्हा जीवंत झाला, त्याने अनेकांस स्वत:ला जीवंत दाखविले आणि मग तो स्वर्गास परतला. देव प्रीती आणि दयेचा देव आहे. त्याची अशी इच्छा नाही की कोणीही व्यक्तीने नरकात नाश व्हावे. म्हणून तो संपूर्ण मानवजातीस पापापासून आणि त्याच्या स्थायी परिणामांपासून मुक्त होण्याचा मार्ग दाखवावयास आला. तो पाप्यांस तारावयास — आपल्यासाख्या आणि माझ्यासारख्या लोकांस पापापासून आणि सार्वकालिक मृत्यूपासून वाचवावयास आला.

पापांची ही विनामूल्य क्षमा प्राप्त करण्यासाठी, बायबल आम्हास सांगते की आम्ही फक्त एक गोष्ट केली पाहिजे — प्रभु येशू ख्रिस्ताने वधस्तंभावर जे काही केले त्याचा स्वीकार करणे आणि संपूर्ण अंत:करणाने त्याच्याठायी विश्वास धरणे.

“त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला त्याच्या नावाने क्षमा मिळेल अशी साक्ष सर्व संदेष्टे त्याच्याविषयी देतात” (प्रेषितांची कृत्ये १०:४३).

“की येशू प्रभु आहे असे जर तू आपल्या मुखाने कबूल करशील आणि देवाने त्याला मेलेल्यांतून उठविले असा आपल्या अंत:करणात विश्वास ठेवशील तर तुझे तारण होईल” (रोम. १०:९).

जर आपण प्रभु येशू ख्रिस्ताठायी विश्वास ठेवला, तर आपण देखील पापांपासून क्षमा प्राप्त करू शकता आणि शुद्ध होऊ शकता.

प्रभु येशू ख्रिस्तामध्ये आणि वधस्तंभावर त्याने आपणासाठी जे काही केले आहे त्याच्यावर विश्वास करण्याचा निर्णय घेण्यात आपली मदत करण्यासाठी खाली एक सोपी प्रार्थना दिलेली आहे. येशूने आपणासाठी काय केले आहे त्याच्या स्वीकार व्यक्त करण्यात आणि आपल्या पापांपासून शुद्धता प्राप्त करण्यात ही प्रार्थना आपली मदत करील. ही प्रार्थना केवळ एक मार्गदर्शक आहे. आपण आपल्या शंब्दांत देखील प्रार्थना करू शकता.

प्रिय प्रभु येशू, आज मला कळले की वधस्तंभावर तू माझ्यासाठी काय केले. तू माझ्यासाठी मरण पत्करलेस : तू तुझे बहुमूल्य रक्त वाहिलेस आणि माझ्या पापांचा दंड चुकविलास, यासाठी की मला क्षमा प्राप्त व्हावी. बायबल मला सांगते की जो कोणी तुजवर विश्वास ठेवील, त्याला त्याच्या पापांची क्षमा केली जाईल.

आज, मी तुजवर विश्वास ठेवण्याचा निर्णय घेतो आणि वधस्तंभावर माझ्यासाठी मरण पत्करून व पुन्हा मेलेल्यांतून जीवंत होऊन जे काही माझ्यासाठी केलेस, त्याचा मी स्वीकार करतो. मी जाणतो की माझ्या सत्कृत्यांद्वारे मी स्वत:चे तारण साध्य करू शकत नाही, इतर कोणीही मनुष्य माझे तारण घडवून आणू शकत नाही. मी माझ्या पापांची क्षमा कमवू शकत नाही.

आज, मी आपल्या अंत:करणात विश्वास धरतो आणि माझ्या मुखाने हे कबूल करतो की तू मजसाठी मरण पत्करलेस, तू माझ्या पापांची किंमत चुकविलीस, तू पुन्हा मेलेल्यांतून उठलास, आणि तुझ्यावरील विश्वासाद्वारे, मला माझ्या पापांची क्षमा आणि शुद्धता प्राप्त होते. येशू, मी तुझे उपकार मानतो. तुजवर प्रीती करण्यात, तुला आणखी जाणून घेण्यात, आणि तुझ्याप्रत विश्वासू राहण्यात माझी मदत कर. आमेन.


नोट्स

## DOWNLOAD THE FREE APP!

*Search for*
"All Peoples Church Bangalore"
in the App or Google play stores.

Available on the App Store

ANDROID APP ON Google play




*A daily 5-minute video devotional.*
*A daily Bible reading and prayer guide.*
*5-minute Sermon summary.*
*Toolkit with Scriptures on various topics to build faith and information to share the Gospel.*
*Resources with sermons, sermon notes, TV programs, books, music and more.*

*IF YOU LOVE IT, TELL OTHERS ABOUT IT!*